कपिलगीता (अपूर्ण)

(हरिदास आचरेकरकृत टीकेसह)

केशव रावजी गोंधळेकर यांनी
[illegible] कापरवाडी जि. पुणे
येथे केला. ३१ मार्च, १९१०
(आवृत्ती ३ री)

पृष्ठे: १७४
आकार: ८½" × ५½"

V 891.461
Ach/kap
50471

THE LIBRARY

S. N. D. T.
WOMEN'S UNIVERSITY
BOMBAY.

WOMEN'S UNIVERSITY LIBRARY

24 APR 1972

॥ अथ कपिलगीता प्रारंभः ॥

T. WOMEN'S
LIBRARY
50471

मुद्रक
केशव रावजी गोंधळेकर,
जगद्धितेच्छु छापखाना पुणें.
प्रकाशक
केशव रावजी गोंधळेकर,
जगद्धितेच्छु छापखाना पुणें.
ता. ३१ मार्च सन १९१० शके १८३१
आवृत्ति ३ री.


कपिल महामुनि
ऋषिसिद्ध


पार्वती
शंकर

श्रीगणेशाय नमः ॥ ॐनमो गुरु अद्वया । अनंत अपार अव्यया । परात्परा सुखालया । आनंदकंदा ॥ १ ॥ आद्यंतमध्यरहिता । नामरूपगुणविरहिता । सर्वी सर्व तुझी सत्ता । व्यापूनि होसी निराळा ॥ २ ॥ चित्तचतुष्टया न कळे अंत । ह्मणोनि नामें तूं अनंत । वेदश्रुती वर्णितां तटस्थ । होऊनि ठाके अंतरीं ॥ ३ ॥ मौनेंच जाणिजे तुझी खूण । वाचेसी कथितां नये कथन । बोल बोलतां जाय विरोन । निजरूपीं तुझिया ॥ ४ ॥ होसी मीतूंपणावेगळा । न कळे तुझी अकळकळा । एकचि होऊनि सकळां । जीवमात्रीं वसतोसी ॥ ५ ॥ एक ह्मणतां दुजा होय । तोही तेथें विरोनि जाय । तुझी तूंचि जाणसी सोय । स्वसंवेद्या ॥ ६ ॥ वनस्पतीची करूनि लेखणी । समुद्रपात्रीं शाई भरुनी । पत्र करूनी सर्व मेदिनी । लिहितां अंत न सांपडे ॥ ७ ॥ शेष सहस्रमुखें शिणला । वर्णितां तुझिया स्वरूपाला । अंगसंगें सुखावला । शय्या होउनी स्वामिया ॥ ८ ॥ व्यास वाल्मीक वर्णिती । शास्त्रें पुराणें वाखाणिती । बहु कवि बोलीं बोलती । अनिर्वाच्य होसी तूं ॥ ९ ॥ तेथें मूढ मी मानव । काय शब्दीं करूं लाघव । तुझा तूंचि करिशी उद्भव । निमित्तमात्र करूनी ॥ १० ॥ हृदयीं तूंचि चालक । करणें तुझेंचि हें कौतुक । तेथें मी किमर्थ रंक । फुंज धरून वागावा ॥ ११ ॥

येऱ्हवीं मी अपुरता ठेंगणा । उंची कवळूं पाहें गगना । समर्थ तूंचि या स्वात्मनिधाना । श्रीगुरुराया ॥ १२ ॥ मसीपत्र तें कायी । परी थोर थोर वंदिती पाही । मान देऊनि निजाठायीं । स्वमस्तकीं वंदिती ॥ १३ ॥ तूंचि वदविता वदनीं । मी व्यर्थ करूं कां चिंतवणी । मीतूंपणा अससी ग्रासोनी । तोचि तूं सद्गुरु ॥ १४ ॥ तुझा स्वानंद तोचि गणपती । देतसे भाविका व्युत्पत्ती । आत्मानुसंधानीं स्फूर्ती । वाढवी सुख स्वानंदें ॥ १५ ॥ सन्मुख नव्हती वादवितंड । तयालागीं तूं होशी वक्रतुंड । भक्तालागीं अखंड । स्मरणमात्रें पावसी ॥ १६ ॥ स्वानंदें दोंदील थोर । ह्मणोनि ह्मणती लंबोदर । सर्व असे चराचर । उदरीं तुझिया स्वामिया ॥ १७ ॥ तुझा एक दंत अखंड । एकत्वें होसी उदंड । सकळ हें अंडांड । निर्मूनि अससी एकपणीं ॥ १८ ॥ प्रवृत्ति निवृत्ति कर्ण दोन । हालविसी समसमान । प्रकृतिपुरुषलक्षण । दावुनी सर्व चालविसी ॥ १९ ॥ नेत्रीं तुझिया देखणें । तेंचि विश्वरूप पाहणें । गुरुखूण ओळखणें । आत्मानुभवीं ॥ २० ॥ दूर करिसी भवविघ्न । ह्मणोनी ह्मणविसी विघ्ननाशन । भक्तचातकां कृपाघन । वृष्टि करिसी स्वानंदें ॥ २१ ॥ सकळ मंगळां मंगळ । ब्रह्मविद्येचा करिसी सुकाळ । देऊनि मोक्षादिक फळ । भोगविसी आत्मत्वीं ॥ २२ ॥ ऐशिया गुरुगजानना ।

विनवितों जीवींचिया जीवना । कृपा ओलावा घालीं मना । स्वानंदजळाचा ॥ २३ ॥ तुझिये अंगींची प्रकाशदीप्ति । तेचि विनवूं सरस्वती । सकळ असे जिची उत्पत्ति । दृश्यमात्र जें ॥ २४ ॥ त्रिगुण सर्व हेचि व्याली । विश्वरूप विस्तारा गेली । जीवरूपीं फळीं फळली । माया वेली हे ॥ २५ ॥ एक न लागतां घडी । सृष्टीची होय घडामोडी । ब्रह्मांडांच्या उतरंडी । मोडुनी सवें रचितसे ॥ २६ ॥ तेथें काय बोल बोलों बोलीं । बोलतां वाचा मौनावली । वेद-श्रुती तटस्थ जाहली । जाणोनि तुज ॥ २७ ॥ संत तुझे अवतार । सगुणरूप साकार । हो-ऊनि हृद्गत विचार । जाणसी तूं त्यांचिया ॥ २८ ॥ जे कृपेचे सागर । आंनदघनवृष्टिकर । निववितो त्रिविधताप थोर । शरण भावें आलिया ॥ २९ ॥ ते पाहतां निजदृष्टीं । सकळ आनंदाची होय वृष्टी । स्वानंद न समाये सृष्टीं । ईक्षणमात्रें करूनिया ॥ ३० ॥ जे हे चैत-न्य बीजाचे कोंभ । आनंदसमुद्रींचे कुंभ । अचळ अढळ स्वयंभ । चैतन्यमेरु ॥ ३१ ॥ नामें घेतां बहुत । नाहीं स्वरूपाचा अंत । केवळ अवतार भगवंत । त्यांचे चरणीं मन माझें ॥३२॥ पुनः पुनः करितों विनवणी । भाव धरुनी दृढ चरणीं । वदवा अनुभव रसिक वाणी । मति देउनी बालका ॥ ३३ ॥ हृद्गत होऊनि जाण । वाचेसि करविसी स्मरण । तुझाचि तुज

आलों शरण । श्रीगुरु स्वामिराजया ॥ ३४ ॥ नमूं श्रीगुरु दत्तात्रया । आदिगुरु सर्वमया । अचल अमळ अव्यया । स्वप्रकाशा ॥ ३५ ॥ तुझिया नामें सर्वसिद्धी । तूं कृपेचा उदधी । पाववीं आत्मकथन सिद्धी । राजयोगी समर्था ॥ ३६ ॥ आत्माराम हृदयींचा । तोचि श्रीगुरु आमुचा । भाव जाणोनि अंतरींचा । आज्ञा देसी बोलावया ॥ ३७ ॥ कपिल महामुनीश्वर । विभूति वर्णी यदुवीर । स्वानंदाचा गिरिवर । कैवल्यदानी जो ॥ ३८ ॥ सांख्यशास्त्र जयानें निर्मिलें । जेथूनि ज्ञान प्रगट झालें । तयाचीं वंदितां पाउलें । सहजी सहज कळतसे ॥३९॥ कपिलगीतारहस्य । गुरु सांगती ऋषिसिद्धांस । अद्भुत जियेचा प्रकाश । मौन बोलणें जेथींचें ॥ ४० ॥ सकलशास्त्रांचें प्रमेय । जें सकळगुह्यांचें गुह्य । उपनिषदांचें हृदय । विश्रामधाम ॥ ४१ ॥ करूं इच्छित असों टीका । धरूनि गुरुकृपेचा आवांका । आत्मानुभवकौतुका । गुरु बोलविता ॥ ४२ ॥ तेथें किमर्थ मी ह्मणे । आपीं आपण बोलें बोलणें । वायां गर्व कासया करणें । कवित्व ह्मणोनियां ॥ ४३ ॥ मुका वदनीं वेद पढे । अंधासि दृष्टि उघडे । पांगुळ सहज मेरु चढे । कृपासामर्थ्यें तुझिया ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ नत्वा श्रीगुरुपादाब्जं स्मृत्वा मोक्षार्थसिद्धिदं । तारकाभ्यंतरे पंच ब्रह्मतत्त्वं तदुच्यते ॥ १ ॥ टीका—नमितां श्रीगुरुपा-

दुका । मोक्षादिक फळें पावती देखा । जाणतां तारकाभ्यंतरपंचका । ब्रह्मतत्त्व जाणती ॥४५॥ तें सविस्तर कथन । करी मुनिराज कृपा करून । ऋषिसिद्धांचें प्रेम गहन । देखोनियां वदतसे ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ पंचब्रह्म पंचदेवं पंचस्थानेषु पंचधा । पंचमातृकाः पंचवाक्यं पंचशून्यं तथैव च ॥ २ ॥ टीका—पंच ब्रह्म पंच दैवत । पंच स्थानें निर्मित । पंचमातृका पंच वाक्यें हीं तेथ । पंच शून्यें निर्मिलीं ॥ ४७ ॥ ॥ श्लोक ॥ पंचावस्थाः पंचदेहाः पंच मात्राःसुसंस्थिताः । पंच वेदाः पंच गुणाः पंचपद्मास्तथा परे ॥३॥ टीका—पंच अवस्था पंच देह । पंचमात्रा असती पाहे । पंचवेद समर्थ हे । निर्मिले असती जाण पा ॥ ४८ ॥ पंचगुणांचा विस्तार । निर्मिला असे सविस्तर । पंचपद्मादि विचार । करितां सर्व सद्गुरु ॥४९॥ ॥ श्लोक ॥ पंच भूताः पंच क्रियाः पंचदिक् पंच वेदिकाः पंच कोणाः पंच ऋचः पंच प्रमाणसंज्ञकाः ॥ ४ ॥ टीका—पंचभूतें निर्मिलीं । पंचक्रिया पंचदिशा केली । पंचवेदी पंचकोणी जाहली । ऋचापंच प्रमाणादि ॥ ५० ॥ ॥ श्लोक ॥ पंचांगं च पृथग्वर्णं पंचमुद्रादिगुप्तकं । पंच कलाः पंच मार्गाः पंचधाऽकाशधाम च ॥ ५ ॥ टीका—पंचांग पंचवर्ण । पंचमुद्रा पंचगुप्त जाण । कलादि पंचमार्ग गहन । आकाशपंच उद्भव ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥

देहस्थपंचस्थानं च ब्रह्मांडस्थानपंचकं । सर्वे ब्रह्मांडनिलयाः पंचलोकनिवासिनः ॥ ६ ॥ टीका–देह पंच निर्मिले । ब्रह्मांडीं पंच केलें । पंच लोकादि वसविले । सामर्थ्यशक्तीनें ॥ ५२ ॥श्लोक॥ देहाभिमानिनः पंच पंचवाद्यमतःपरं । पंचपदी च गायत्री पंचायतनदेवताः ॥७॥ टीका–देहाभिमानी पंच । वाद्यपंच गायत्रीपदपंच । देवतादि पंच पंच । निर्मित आपुले स्वलीलें ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ पंचशक्तिसमायुक्ता विचारः पंचनिर्णयः । पंचाग्नि पंच आनंदाः पंच नामांतदीक्षकाः ॥ ८ ॥ टीका–पंचशक्ति निर्मिलिया । विचार पंचनिर्णया । पंचाग्नि पंच आनंद या । पंच नाम दीक्षण करितसे॥५४॥श्लोक॥पंचत्रिंशत् पंचकानि तारकाभ्यंतरेष्वपि। शतं चापि शतार्द्धार्धं शुद्धं श्रुत्वा गुरोर्मुखात् ॥ ९ ॥ टीका–पंचत्रिंशत् पंचकविचार । असे तारकाभ्यंतर । गुरुमुखें जाणतां सार । आत्मप्राप्ति पावती ॥ ५५ ॥ शत श्लोक अथवा शतार्ध ह्मणती । श्लोक श्लोकाची अर्थ शक्ति । गुरुमुखें विचार करिती । भवबंधन नाहीं तयां ॥५६॥ ॥श्लोक॥ न तस्य पुनरावृत्तिर्जन्ममृत्युभयं हरेत्। निजमोक्षार्थसंसिद्धि बंधमोक्षार्थदं शुभं ॥ १० ॥ इति श्रीपद्मपुराणे तारकाष्टके कपिलगीतायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ टीका–नसे तया पुनरावृत्ति । जे कपिलगीता वर्णिती । गुरुगम्य जाणोनि चित्तीं । अनुभव घेती स्वानंदें

॥ ५७ ॥ भोगिती मोक्षसंपदा । पावती निजात्मनिजपदा । स्वानंदें तृप्त होऊनि सदां । स्वात्मसुखें क्रीडती ॥ ५८ ॥ गुरुमाय बाळा बोलवित । आपुले स्वलीळें खेळवीत । तें ऐका देऊनि चित्त । समर्थ श्रोते सज्जन हो ॥५९॥ इति श्रीहरिदासविरचितायां कपिलगीताटीकायां प्रथमप्रसंग समाप्त ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमोजीप्रणवरूपा । विश्वात्मया विश्वबापा । तुझी झालिया कृपा । गुरुगम्य कळतसे ॥ १ ॥ जयजयाजी ओंकारबीजा । सर्वप्रकाश दिसतो तुझा । नाहीं तुजवांचून आणिक दुजा । भूमंडळीं विश्वात्मया ॥ २ ॥ प्रणवरूप जाणावें । तेजोमय ओळखावें । आपों आपणा पहावें । आत्मदृष्टीं ॥ ३ ॥ प्रथम केला सदर गोष्वरा । अध्याय चालला दुसरा । जाणोनी प्रमेय विचारा । तेथील अनुभव घेईजे ॥ ४ ॥ स्वरूप खूण जाणावी । चित्तीं स्थिरता धरावी । गुरुमूर्ती न्याहाळावी । ध्यानडोळां ॥ ५ ॥ **॥ श्लोक ॥ तारकं दंडकं चैव कुंडल्यं चार्धचंद्रकं । पंचमं बिंदुसंकाशं पंचब्रह्म सनातनं ॥ १ ॥ टीका**—तारकरूप दंडकरूप । कुंडलाकार जाण स्वरूप । अर्धचंद्र प्रकाशदीप । बिंदु जाण पंचम ॥ ६ ॥ पंच-

ब्रह्म यांसि ह्मणावें । अभ्यासें कळे आघवें । अभ्यासावांचूनि नव्हे ठावें । वाचाळपणें बोलतां ॥ ७ ॥ ॥ श्लोक ॥ ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च ईश्वरश्च सदाशिवः । पंचदैवं तु विख्यातं पंच-ब्रह्मस्वरूपवत् ॥ २ ॥ टीका—ब्रह्मा विष्णु रुद्र देव । ईश्वर आणि सदाशिव । पंचदैवतें स्वय-मेव । विख्यात असती ब्रह्मरूप ॥ ८ ॥ ॥ श्लोक ॥ त्रिकूटं श्रीहटं स्थानं गोल्हाटं चौटपी-ठकं । पुण्याद्रिर्भामरी गुंफा ब्रह्मरंध्राण्यनुक्रमात् ॥ ३ ॥ टीका—त्रिकूट श्रीहाट गोल्हाट । चौथें जाण औटपीठ । पुण्याद्री भ्रमरगुंफा मठ । ब्रह्मरंध्रें अनुक्रमें ॥ ९ ॥ ॥ श्लोक ॥ अकारश्च उकारश्च मकाराश्च त्रिमातृकं । इकारश्चैव एकारः पंचकं मातृसंज्ञितं ॥ ४ ॥ टीका—अकार उकार मकार । इकार आणि एकार । पंचमातृका प्रकार । ॐकार अंगीं वसताती ॥ १० ॥ ॥ श्लोक ॥ वैखरी मध्यमा वाचा पश्यंती च तथा परा । परात्परा च विज्ञेया वाचा पंचकसंज्ञिता ॥ ५ ॥ टीका—वैखरी आणि मध्यमा । पश्यंती परात्परेचा महिमा । द्यावया नाहीं उपमा । अनिर्वाच्य असतसे ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ अधःशून्यं चोर्ध्वशून्यं हि मध्यं सर्वं शून्यं शून्यमिहांतशून्यं । चतुःशून्यागोचरं यन्निशून्यं निनामशून्यं हि निरा-मयंच ॥६॥ टीका—अधःशून्य ऊर्ध्वशून्य सर्वशून्य मध्यशून्य चतुर्थ जाणिजे अगोचर शून्य ।

पांचवें निरामय तें ॥ १२ ॥ घेतां आत्मराज दर्शन । त्यांत अवघींच असती जाण । साक्ष वेदशास्त्र पुराण । पहातां सर्व कळतसे ॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥ जाग्रत् स्वप्नः सुषुप्तिश्च तुर्यावस्था च उन्मनी । साचैव सहजावस्था पंचावस्थाः प्रकीर्तिताः ॥ ७ ॥ टीका—जागृति स्वप्न सुषुप्ती । तुर्या अवस्था जाण चौथी । उन्मनी पांचवी शुद्ध मती । सहजीं सहज होतसे ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ स्थूलं सूक्ष्मं कारणं च महाकारणकं परं ॥ कैवल्यज्ञानदेहश्च पंच देहाः प्रकीर्तिताः ॥ ८ ॥ टीका—स्थूळ सूक्ष्म कारण चौथें होय महाकारण । पांचवें कैवल्य देह जाण । ज्ञानरूप जाणणें ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ऱ्हस्वमात्रा दीर्घमात्रा प्लुतमात्रा त्रिभेदतः । अर्धमात्राऽप्यनुच्चार्या मात्राःपंचकसंज्ञिताः ॥ ९ ॥ टीका—ऱ्हस्वमात्रा दीर्घ मात्रा । तृतीय ते प्लुतमात्रा । चतुर्थ जाण अर्धमात्रा । अनुच्चार्य पांचवी ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदो ह्यथर्वणः ॥ सूक्ष्मवेदो हि चाध्यक्षः पंच वेदाः प्रतिष्ठिताः ॥१०॥ टीका—ऋग्वेद आणि यजुर्वेद । अथर्वण सामवेद पांचवा असे सूक्ष्मवेद । अंतर्ध्वनी जाणावा ॥१७॥ ॥ श्लोक ॥ रजः सत्वं तमश्चैव शुद्धसत्वं चतुर्थकं ॥ निर्गुणं सगुणातीतं पंचमं सुप्रतिष्ठितं ॥ ११ ॥ टीका—रज सत्व

आणि तम चौथा शुद्धसत्त्व उत्तम । पांचवा निर्गुण निरुपम । अव्यक्तीं जो मेळवी ॥ १८ ॥
॥ श्लोक ॥ रक्तं श्वेतं तथा श्यामं नीलं सुनीलपंकजं ॥ पंचमं शुद्धपीतं च तस्यांते श्वेतमुज्ज्वलं ॥ १२ ॥ टीका—रक्त श्वेत आणि श्याम । नीळ सुनीळ उत्तम । शुद्धपीत परम । त्यांत श्वेत सोज्ज्वळ ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ पृथिव्यापस्तथा तेजो वायुराकाशमेव च ॥ पंच भूतानि कल्प्यंते पंच भूताः सुनिश्चिताः ॥ १३ ॥ टीका—पृथ्वी आप तेज वायो । आकाशादि पंचभूतांचा उदयो । विश्व रचावया सूदयो । जाहला असे जाणपां ॥२०॥ ॥ श्लोक ॥ सर्जनं पालनं चैव प्रलयश्च तृतीयकः ॥ सूर्यक्रिया चंद्रक्रिया क्रियाः पंचकसंज्ञिताः ॥१४॥ टीका—सर्जन पाळण संहारण । सूर्य चंद्र क्रिया जाण । पंचक्रियांचें लक्षण । कृपाळू मुनी वदतसे ॥ २१ ॥ दिशा व्यापक पंचकोण । सांगिजेल तयांचें लक्षण । असती व्यापक होऊन । कोण कैसे जाणपां ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ पूर्वेंद्रः पश्चिमदिशा वरुणः प्रासिद्धो । धर्मश्च दक्षिणदिशोत्तरदिक् कुबेरः । ऊर्ध्वा हि पद्मजननो जगतो विधाता । एवं दिशोऽथ पति-दैवतपंचकं च ॥ १५ ॥ टीका—पूर्वदिशे इंद्र जाण । पश्चिमे वसत वरुण । यम असे दिशा दक्षिण । कुबेर जाण उत्तरे ॥ २३ ॥ ऊर्ध्वदिशे चतुरानन । जो सृष्टि करी उत्पन्न । दिशा

अधिकारी होऊन । सामर्थ्यें असती सद्गुरूच्या ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ नैर्ऋत्यकोण निर्ऋती-
श्वरमीशकोणमाग्नेयकोणमधिदैवतमग्निदेवः । वायव्यकोणमधिदैवतवायुदेवश्चाधोदिशा
अथच दैवतमत्र विष्णुः ॥ १६ ॥ टीका—नैर्ऋत्य कोणीं नैर्ऋत्यनाथ । ईशकोणीं ईशदैवत ।
अग्निकोणीं अग्नि विख्यात । वायव्यकोणीं वायु दैवत । सामर्थ्यें शक्ती वसविले ॥ २५ ॥
अधोदिशा लक्ष्मीरमण । दैवत असे समर्थ जाण । जो सृष्टि करी पाळण । तोचि तो व्या-
पक असे ॥ २६ ॥ पंच मुखें महादेवाचीं । वेदीं वर्णिलीं असती साचीं । ऐका नावें तयांचीं ।
बोलिजेल यथामति ॥ २७ ॥ ॥ श्लोक ॥ सद्योजातं वामदेवाय चेति । तत्पुरुषायेति चेशा-
नमंत्रः ॥ अघोरेभ्योऽथ घोरेभ्य इति ब्रह्म । यजुःष्वीशानः पंचवक्त्रं पुरस्तात् ॥ १७ ॥
टीका—जो हा ईश्वर पंचवक्त्र । नामें पंच अति विचित्र । सद्योजात वामदेवाय नाममंत्र ।
तत्पुरुषाय बोलती ॥ २८ ॥ अघोरेभ्योऽथ घोरेभ्य इति ऐसें श्रुती वदती । पंचवक्त्र ख्याती ।
नामें असती वेदांतीं ॥ २९ ॥ वेदाब्धीमध्यें जे बुडती । तेचि जाणती शास्त्रप्रचीती । सद्गुरु
बोलवी जे रीतीं । तैशी वचनोक्ति येतसे ॥ ३० ॥ नकळे वेदशास्त्र रीती । आवडी करूनि
परम प्रीति । गुरुचरणीं वाक्यसंपत्ती । आपीं आपणा निवेदिली ॥ ३१ ॥ आतां पंचदेह

प्रमाण । ऐका तयांचें लक्षण । गुरुकृपें जाणोनि खूण । आपीं आपणा उमजणें ॥३२॥ श्लोक ॥ **सार्धत्रिहस्तो यदि स्थूलभोगो । ह्यंगुष्ठमात्रप्रमितं हि लिंगं । पर्वार्धमात्रं मसुरप्रमाणं प्रमाण-हीनं हि भवेत् प्रमाणं ॥१८॥** टीका—औट हस्त प्रमाण । स्थूळ देह असती जाण । लिंगदेह स्वरूपलक्षण । अंगुष्ठमात्र होऊनि असे ॥ ३३ ॥ तदर्ध जाण जें असे । मसुर प्रमाण चतुर्थ भासे । प्रमाणहीन होऊनि वसे । अलक्षलक्षीं लक्षिजे ॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ **पृथक् रक्तपीतं तथा शुभ्रवर्णं । तथा कर्बुरं श्यामवर्णादिभूतं । नीलं सुनीलं शुद्धपीतं सुशुभ्रं । तथा पंचमं पीतवर्णं पुरस्तात् ॥१९॥** ॥ टीका—रक्त पीत आणि धवल । श्याम कर्बुर नीळ सुनीळ । शुद्धपीत शुभ्र निर्मळ । त्यांत सुवर्णज्योतिर्मय जें ॥ ३५ ॥ पंच मुद्रा नामाभिधान । गुप्तपंच असती जाण । त्यांचीं नांवें कोण कोण । ऐका सांगेन तुह्मांप्रती ॥ ३६ ॥ ॥ श्लोक ॥ **खेचरी भूचरी चैव चाचरी च अगोचरी । उन्मनी चेति विख्याताः पंच मुद्राः प्रकीर्तिताः ॥ २० ॥** ॥ टीका—खेचरी भूचरी चाचरी । चौथी ते अगोचरी । उन्मनी पंचमी सुंदरी । पचनाम जाणिजे ॥३७॥ ॥श्लोक॥ **षण्मुखी चोन्मीलिनी च शांभवी चात्मभाषिणी । पूर्वबोधप्रबोधी च पंच गोप्या हि मुद्रिकाः ॥ २१ ॥** टीका—

षण्मुखी उन्मीलिनी । शांभवी आत्मभाषिणी । पूर्व बोधाप्रबोधखाणी । ज्ञानरत्नें मिरवती ॥ ३८ ॥ मुख्य जाणणें आत्मखूण । तेंच सर्व मुद्रांचें लक्षण । गुरुवचनें विश्वासोनि जाण । आत्मपंथें चालिजे ॥ ३९ ॥ ॥ श्लोक ॥ ऊर्मी चैवापि धूम्री च ज्योतिर्ज्वाला च-तुष्कला । कलातीता कलाः प्रोक्ताः पंच वै सुप्रतिष्ठिताः ॥ २२ ॥ टीका—जाण प्रमाण पं-चकळा । ऊर्मी धूम्री ज्योतिज्वाळा । आणीक ते चतुष्कळा । कळातीता पांचवी ॥ ४० ॥ ॥ श्लोक ॥ पिपीलिका विहंगश्च कपिमार्गो हि मीनकः । शेषमार्गो हि संख्यायां पंच मार्गाः पुरातनाः ॥ २३ ॥ टीका—पंचमार्ग सुगम । पिपीलिका कपी विहंगम । मीन शेष मार्ग उत्तम । पुरातन असती जे ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ घटाकाशमठाकाशमहदाकाशसं-ज्ञितं । चिदाकाशं निराकाशमाकाशपंचकं विदुः ॥ २४ ॥ टीका—जाणिजे पंच आकाश । घटाकाश मठाकाश । महदाकाश चिदाकाश । निराकाश पांचवें ॥ ४२ ॥ ॥ श्लोक ॥ ने-त्रं कंठोऽथ हृदयं मूर्धा स्थानान्यनुक्रमात् । शिखायां पंचमं स्थानं पंचस्थानं प्रकीर्तितं ॥ २५ ॥ टीका—सांगिजेल पंचस्थान । नेत्र कंठ हृदयस्थान । मूर्धास्थान शिखास्थान । अनुक्रमें सांगितलीं ॥४३॥ ॥श्लोक॥ सत्यवैकुंठकैलासमाश्रयो हि चतुर्थकः । निराश्रयःपंचमश्च पंच

लोकाः प्रतिष्ठिताः ॥ २६ ॥ टीका–सत्य वैकुंठ कैलास । आश्रय निराश्रय प्रकाश । करिती आत्मत्वीं विलास । लोक पंच असती हे ॥ ४४ ॥ ॥श्लोक॥ विश्वतैजसप्राज्ञाश्च प्रत्यगात्माभिमानिनः। निरंजनस्तदातीतः सोऽभिमानी तु पंचमः ॥ २७ ॥ टीका–पंचदेहीं अभिमान । विश्व तैजस प्राज्ञ जाण । प्रत्यगात्मा निरंजन । अभिमानी असती हे ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ तंतिवीणा वितंतश्च मृदंगं घनकांस्यकं । सुस्वरो वंशिकानादोऽनाहतो वाद्यपंचकं ॥ २८ ॥ टीका–पंचवाद्यें बोलती । तंतवीणा वितंती । मृदंग घनकांशादिक होती । वेणुनाद पांचवा ॥ ४६ ॥ मतांतरें बोलती । दश नादादि उत्पत्ति । अभ्यासें सर्व कळती । अंतर्ध्वनी जाणतां ॥ ४७ ॥ योगाभ्यासें मन । नादेंच होतसे लीन । योगी जाणती हे खूण । अनुभवाची ॥ ४८ ॥ गायत्रीपंचपदाख्यान । ऐकिजे तयाचें कथन । ज्ञानाचें जें विज्ञान । निजात्मप्राप्ती ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ गायत्र्याः प्रथमः पादो द्वितीयश्च तृतीयकः ॥ चतुर्थपादः ॐकारः पंचमः परमार्थकः ॥ २९ ॥ टीका–गायत्री असे पंचपदा । उपदेशीं प्रगटे त्रिपदा । तुर्यचरण चतुष्पदा । ॐकाररूप जो ॥ ५० ॥ पंचम पद विचार । जो होय परमार्थपर । योगियांचें निजसार । परमतत्त्व ॥५१॥

मौनेंचि तें जाणिजे । जाणतां तद्रूप होइजे । होणें न होणें विसरिजे । तयाचि माजीं ॥५२॥
॥ श्लोक ॥ गणेशो भास्करो विष्णु रुद्रशक्ती च शाश्वतं । वेदगर्भेषु पूज्यंते पंचायतन-
देवताः ॥ ३० ॥ टीका—ऐका पंचायतन दैवत । गणेश भास्कर लक्ष्मीकांत । रुद्र आणि
देवी विख्यात । श्रेष्ठ असती पुरातन ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ क्रियाशक्तिर्ज्ञानशक्तिरिच्छा-
शक्तिस्तथैव च ॥ आदिशक्तिः परा शक्तिः शक्तिः पंचविधा स्मृता ॥ ३१ ॥ टीका—
क्रियाशक्ति ज्ञानशाक्ति । तिसरी जाण इच्छाशक्ति । आदि आणि पराशक्ति । पंचनामें
जाणिजे ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ क्षरं चैवाक्षरं चैव कूटस्थं चात्मनिर्णयः ॥ क्षेत्रज्ञं पंचमं प्रोक्तं
विचारः पंचनिर्णयः ॥ ३२ ॥ टीका—क्षराक्षर कूटस्थ ह्मणती । स्वात्मनिर्णय प्रकाशकीर्ति ।
क्षेत्रज्ञ पांचवा बोलती । विचार पंच निर्णय हे ॥ ५५ ॥ वडवाग्निश्च मंदाग्निरुदराग्निस्त-
थैव च ॥ शोकाग्निश्चाथ कामाग्निर्ब्रह्माग्निः पंचकं स्मृतं ॥३३॥ टीका—नामें ऐका पंचाग्नि ।
वडवाग्नि मंदाग्नि कामाग्नि । शोकाग्नि आणि उदराग्नि । ब्रह्माग्नि होय पंचम ॥ ५६ ॥
॥ श्लोक ॥ विषययोगानंदौद्वावद्वैतानंदएवच । विदेहानंदो विख्यातो ब्रह्मानंदश्च पंचमः
॥ ३४ ॥ टीका—विषयानंद योगानंद । अद्वैतानंद विदेहानंद । पांचवा तो ब्रह्मानंद । पंच

आनंद जाणिजे ॥ ५७ ॥ ॥ श्लोक ॥ नामांतदीक्षा परमार्थनिष्ठा अहं च सोहं च ततश्च कोहं । शिवोऽहमस्मीत्यशिवं विचिंत्य अनामकोऽहं परिपूर्ण गुह्यः ॥ ३५ ॥ इतिश्रीपद्मपुराणे पंचत्रिंशद्धाक्ये कपिलागीतायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ टीका—नामांत जाणोनि दीक्षा । परमार्थी धरावी अपेक्षा । अहं सोहं परीक्षा । कोण मी हें जाणावें ॥ ५८ ॥ शिवोहमास्मि ऐसें ह्मणती ॥ जीव शिवरूप होती । ऐसें बोले वेदश्रुती । साक्षी होउनी आपण ॥ ५९ ॥ अनाम अरूप होय । परिपूर्ण निजात्म गुह्य । वेदांचें निज हृदय । परम तत्व जें ॥ ६० ॥ पंच पंचप्रमाण कथन । केलें असे नामाभिधान । द्वितीयाध्यायीं निरूपण । कथन केले यथामति ॥ ६१ ॥ एक लाधलिया सुवर्ण । अलंकार नामें बहुवर्ण । प्राप्त होती सहज जाण । यत्न नलगे फारसा ॥ ६२ ॥ जैसे बहु मार्ग चालती । शेवटीं नगरीं मिळतां एकचि होती । तैशीं नानामतें बोलती । निजात्म गांवा जावया ॥ ६३ ॥ वेद शास्त्रें पुराणें । यदर्थीं बोलती बोलणें । मुख्य आत्मखूण जाणणें । त्यांत सर्वही कळोनि न कळे ॥ ६४ ॥ पुढें तृतीय अध्याय विचार । जो हा सर्व सारांचा सार । आत्मज्ञानाचें भांडार । उघडलें असे जाणपां ॥ ६५ ॥ गुरु समर्थें वदविलें । बाळक स्वलीळें बोलविलें । भावें वंदितां पाउलें ।

तद्रूपता करीतसे ॥६६॥ श्रोते समर्थ विचक्षण। न ठेवावें दूषण। करणें सहज काळ हरण। यन्निमित्त बोलणें ॥६७॥ इतिश्री हरिदासविरचितायां कपिलागीताटीकायां द्वितीयः प्रसंगः समाप्तः ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ (श्रीगणेशंमुदावन्देशारदांत्र्यंबकेश्वरं । श्रीकृष्णंकुलपालांश्च भास्करादिनवग्रहान्) ॐ नमो सद्गुरु श्रीकृष्णनाथा सर्वव्यापक तुझी सत्ता । गुणातीता अनंता । आदिपुरुषा ॥ १ ॥ लीलाविग्रह श्रीकृष्णा । हरिशी भवजळ मृगतृष्णा । प्रताप सूर्यउष्णा । शीतउष्णातीत तूं ॥ २ ॥ देही विदेही जननी । तूंचि यशोदा देवकी दोन्ही । तूं जन्मसी आपण मनीं । बाळ मुकुंदा ॥ ३ ॥ निश्चय सद्भाव कारण । पिता वसुदेव नंद जाण । भावावांचूनि श्रीकृष्ण। नये उदराशीं सर्वथा ॥४॥ देह गोकुळीं खेळशी । चरित्रें विचित्रें दाविशी। हृदय अंगणीं रांगशी । आत्मच्छंदें ॥५॥ विकल्पदैत्य मारिशी । अविद्या पूतना शोषिशी । आत्मस्वधर्म वाढविशी । कीर्तीलागुनी आपुले ॥ ६ ॥ अनुहत मुरली वाजविशी । वृत्ती गोपिका भुलविशी । निजानंदें क्रीडशी । त्रिकूट राउळीं ॥ ७ ॥ नकळे तुझी आगम्यलीळा। उन्मनीछंदें खेळशी खेळा । रुक्मिणी आदिमायेचा सोहळा । भोगिशी भर्ता होऊनी ॥ ८ ॥ तोचि हरि आठवा । अवतार पूर्ण आठवा । पार नकळे आठवा। स्वरूपजलाचा ज्याचिया ॥ ९ ॥

सगुण निर्गुण तूंचि होशी । व्यक्त अव्यक्त अविनाशी । निरंजन निर्गुण ह्मणशी । ॐका-
ररूपा ॥१०॥ प्रसंग चालिला तिसरा । स्वरूपजळ उदधीच दुसरा । मुक्तमोतियांचा चारा ।
आत्मराजहंस सेविती ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ पार्वत्युवाच ॥ मृत्युकाले जगन्नाथ काशीपुर्यां
हि प्राणिनां । उपदेशः कथं तेषां तन्मे ब्रूहि महेश्वर ॥ १ ॥ टीका—पार्वती पुसे ईश्वरासी ।
मृत्युकाळीं प्राणियांसी । काशीपुरीं उपदेश करिशी । मुक्त होती कैशियापरी ॥ १२ ॥ ईश्वर
ह्मणे शैलनंदिनी । बहुविचक्षण सुलक्षणी । प्रश्न केला परमपावनी । संतोष होय आत्मिका
॥ १३ ॥ गुरुगम्य अनिर्वाच्य वचनीं । तें मी सांगेन तुजलागोनी । आत्मप्रिये वीर्य विश्व-
व्यापिनी । ऐकें चित्त देवोनियां ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ईश्वरउवाच ॥ ॐकारं बिंदुसंयुक्तं
नित्यं ध्यायंति योगिनः । अस्मिन् मध्ये स्थितं तत्त्वं दर्शयंति जगद्गुरुं ॥ २ ॥ टीका—
ॐकार जो बिंदुयुक्त । नित्य योगी ज्यातें ध्यात । उपरम तत्त्व जाणिजे त्यांत । समर्थ श्री-
गुरु दाविती ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ओमित्येव परं ब्रह्म सर्व तत्त्वानुग्राहकं । आब्रह्मस्तंब-
पर्यंतं सर्वानुग्रहकारणं ॥ ३ ॥ टीका—ॐइत्येकाक्षरं ब्रह्म । योगियांचें निजवर्म । आब्रह्म-
स्तंबपर्यंत परम । सर्वानुग्रहकारक जें ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ प्रथमं तारकं ब्रह्म द्वितीयं दंड-

ब्रह्मकं । तृतीयं कुंडलं ब्रह्म चतुर्थं ब्रह्म चंद्रकं ॥ ४ ॥ टीका–प्रथम जाण तारकब्रह्म । द्वितीय दंडक प्रमाण । तृतीय तें होय कुंडलब्रह्म । तुर्यब्रह्म अर्धचंद्र जें ॥ १७ ॥ ॥ श्लोक ॥ पंचमं बिंदुब्रह्माथ प्रणवे ब्रह्मपंचकं । वेदगर्भसमुद्भूतं तदेव यंनिरंजनं ॥ ५ ॥ टीका–पांचवें बिंदु प्रमाण । सर्वव्यापक असे होऊन । वेदगुह्य आत्मजीवन । निर्गुण निरंजन जें ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ तारकं च भवेद्ब्रह्मा दंडकं विष्णुरुच्यते । कुंडल्यं हि तथा रुद्रो अर्धचंद्रः स ईश्वरः ॥ ६ ॥ बिंदुः सदाशिवः साक्षात् प्रणवे पंच देवताः । निरंजनस्तदातीत उत्पत्तिस्थितिकारणं ॥ ७ ॥ टीका–तारकरूप तो चतुरानन । दंडकरूप लक्ष्मीरमण । कुंडलाकृती ईशान । रुद्रनाम विख्यात जो ॥ १९ ॥ अर्धचंद्र तो ईश्वरू । बिंदु सदाशिव सद्गुरु । त्हृदयव्यापक नकळे पारु । प्रणव पंचदैवत ॥ २० ॥ निरंजन असे तया अतीत । उत्पत्ति स्थिति जो करीत । व्याप्य व्यापक होउनी उरत । साक्षी मात्र होउनी जो ॥२१॥ कवण असे स्थळीं । सांगेन ऐका सकळीं । ऐकतांचि निधेल मळीं । भ्रांतिरूप जाण हें ॥२२॥ ॥ श्लोक ॥ ब्रह्मा त्रिकूटस्थानस्थो ह्यकाराक्षरसंज्ञितः । वाग्वैखरी ह्यवस्था तु जागृतिः स्थूलदेहकं ॥ ८ ॥ टीका–ब्रह्मा वसे त्रिकूटस्थानीं । जो सत्यलोकनायक धनी । उत्पत्ति करी

जो त्रिभुवनीं । तो ते स्थळीं वसतसे ॥ २३ ॥ त्रिकूट चक्रींची खूण । बोलेन तुमची आज्ञा प्रमाण ॥ मी तो असें केवळ अज्ञान । आज्ञा तुमची श्रीगुरु ॥ २४ ॥ ज्ञान अज्ञान म्हणणें । हें तों वृथाचि बोलणें । आपआपणा विसरणें । तेथें हारपे अवघें ॥ २५ ॥ धैर्य धरूनी गुरुचरणाचें । त्रिकूट पाहावें साचें । तरीच सार्थक जन्माचें । मुक्तीचें द्वार तेंचि असे ॥ २६ ॥ अकार अक्षर असे तेथ । वाचा वैखरी वसत । जागृती अवस्था वर्तत । स्थूळ देहीं जाणिजे ॥२७॥ **॥श्लोक॥ ऱ्हस्व मात्रा हि ऋग्वेदो रजोगुणः प्रकीर्तितः । एतत्तारकं विज्ञेयं रक्तपंकजमध्यगं ॥ ९ ॥ टीका**—ऱ्हस्व मात्रा ऋग्वेद । रजोगुण स्वतः सिद्ध । तारकसंज्ञा ब्रह्मानंद । रक्तपद्म मध्यें जो ॥ २८ ॥ **॥ श्लोक ॥ विष्णोस्तु श्रीहटस्थानमुकाराक्षरसंज्ञितं । दीर्घमात्रा मध्यमा च लिंगदेहस्तथैव च ॥ १० ॥ टीका**—श्रीहटचक्रस्थानीं । महाविष्णु प्रकाशखाणी । जो अवतार चरित्र धरून जनीं । उद्धार करी नाममात्रें ॥ २९ ॥ जो शास्त्रीं पुराणीं वाखाणिला । श्रुती तटस्थ बोलतांबोला । शेष शय्या होऊनि ठेला । विश्रांति पावला निजरूपीं ॥ ३० ॥ श्यामसुंदर सांवळा । दिव्यतेजाचा पुतळा । जो डोळियांचा निजडोळा । पीतांबरधारी ॥३१॥ चतुर्भुज आयुधें हातीं । दिव्यशंखचक्राची दीप्ति । माळा गळां

वैजयंती । तोडर चरणीं गर्जत ॥ ३२ ॥ सगुण रूपावांचून । निर्गुणीं न होय समाधान । सगुणींच असे निर्गुण । ओळखिजे गुरुखुणें ॥ ३३ ॥ बुद्धीचें असे नवनीत । मंथन करितां स्वहस्तीं होत । अन्य उपाय नचले तेथ । क्रिया पाहिजे जाणिलेली ॥ ३४ ॥ उकाराक्षर तेथें असे । दीर्घमात्रा मध्यमा वसे । लिंगदेह वासनात्मक कैसें । अंगुष्ठप्रमाण ह्मणती तया ॥३५॥

॥ श्लोक ॥ स्वप्नावस्था यजुर्वेदो गुणः सत्त्वं प्रकीर्तितः । एतदंडकं विज्ञेयं श्वेतपंकजमध्यगं ॥ ११ ॥ टीका—स्वप्नावस्था यजुर्वेद । सत्वगुण परम शुद्ध । दंडकरूप विष्णु मुकुंद । श्वेतपद्मीं विराजित ॥३६॥ **॥ श्लोक ॥ रुद्रस्य स्थानं गोल्हाटं मकाराक्षरसंज्ञितं । प्लुतमात्रा हि वक्तव्या तमोगुणः प्रकीर्तितः ॥ १२ ॥ कारणं देहकं प्रोक्तं पश्यंती वाक् प्रतिष्ठिता । सुषुप्त्यवस्थया युक्त सामवेदस्तथैव च ॥ १३ ॥ एतत्कुंडल्यं विज्ञेयं श्याम पंकजमध्यगं । सोमेश्वरस्य स्थानंच औटपीठेति निश्चितं ॥ १४ ॥ टीका**—गोल्हाट मंडळीं चंद्रमौळी । जेथें शुद्ध प्रभा असे ढवळी । ज्ञानदृष्टीं न्याहाळी । गुरुकृपा सामर्थ्यें ॥ ३७ ॥ काळाग्निरुद्र ह्मणती ज्याशी । जो ज्ञानार्णव प्रकाशराशी । ज्यातें वंदिती वेद आदिऋषी । समर्थ होय त्रिभुवनीं ॥ ३८ ॥ जो रुद्र ह्मणती धूर्जटी । वक्र पाहतां करूनि दृष्टी । सकळ भंगतसे सृष्टी ।

क्षणमात्र न लागतां ॥ ३९ ॥ भक्तजनांचें जीवन । वृष्टि करी कृपाघन । स्वानंदसुखें निववून । तृप्ति करी भाविकां ॥ ४० ॥ मकार अक्षर तेथें असे । प्लुतमात्रा जाण वसे । तमोगुण नांदतसे । कारण देह ॥ ४१ ॥ पश्यंती वाचा सामवेद । सुषुप्ती अवस्थेचा असे बोध । कुंडलाकृती प्रकाश शुद्ध । श्यामपंकज मध्यें जें ॥ ४२ ॥ श्रीसोमेश्वरस्थान । जें परम सौख्यनिधान । तेथें असे ईश्वर जाण । औटपीठ निर्णयें ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ पुण्यगिर्यर्द्धमात्रा च परा वाचा सदैव हि । तुर्यावस्था तथा देहं महाकारणमुच्यते ॥ १५ ॥ टीका—पुण्यगिरी अर्धमात्रा । तुर्या साक्षिणी विचित्रा । परा वाचा सुपवित्रा । महाकारणीं वसतसे ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ अथर्वणवेदयुक्तं दैवतं चेश्वरोमहत् । अर्धचंद्रमिदंप्रोक्तं नीलं सुनीलपंकजं ॥ १६ ॥ टीका—अथर्वण वेद असे । अर्धचंद्र प्रकाशे । नीळसुनीळ पद्म कैसें । सुप्रभाविराजित ॥ ४५ ॥ ॥श्लोक॥ सदाशिवस्य स्थानंतु भ्रमरीगुंफकाभिधं । परात्परः सूक्ष्मवेदः कैवल्यं ज्ञानदेहकं ॥ १७ ॥ टीका—सदाशिवाचें स्थान । भ्रमरगुंफा परमपावन । परात्पर सूक्ष्म वेद जाण । कैवल्यज्ञान हें असे ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ एतद्बिंदुरिति प्रोक्तं पीतपंकजमध्यगं । तारकं च भवेद्भूमिर्दंडकं जलमुच्यते ॥ १८ ॥ कुंडल्यं च तथा तेजो ह्यर्धचंद्रं च मारुतः । बिंदुश्चैव

तथाकाशः प्रणवः पंचभूतभृत् ॥ १९॥ टीका अनुच्चार मातृका । सगुणातीत निर्गुण देखा । बिंदु सूक्ष्म स्वरूप जें कां । पीत पद्म विराजित ॥ ४७ ॥ पंच स्थानें सांगितलीं । तेथें असती जीं निर्मिलीं । श्लोकपदीं जीं बोलिलीं । कपिलमहामुनीश्वरें ॥ ४८ ॥ एकची सर्व सद्गुरु । क्रीडा करिता असे ईश्वरु । दावूनी मायेचा पसारु । आपणामाजीं सांठवी ॥ ४९ ॥ इंद्र तोचि सदाशिव । दावित आपीं आपणा अभिनव । करूनि मायेचें लाघव । आपण म्हणवी अलिप्त ॥ ५० ॥ जाण ॐकारविस्तार । आपणची झाला चराचर । पंचभूतात्मक होऊनि विचार । करीत बीजरचणी हे ॥ ५१ ॥ तारकरूप मेदिनी । दंडक आप असे होऊनी । कुंडली जाण तेजाग्नि । अर्धचंद्र मारुत ॥ ५२ ॥ बिंदुरूपीं आकाशा । पंचभूतीं होय प्रकाशा । ॐकार विस्तारलासे शुद्धांशा । बीजरूपें सर्व हा ॥५३॥ ॥ श्लोक ॥ मृत्युस्थितिप्रसर्गित्वं सूर्यचंद्रात्मतेजसा । तारकं च भवेत्पूर्वे दंडकं पश्चिमे तथा ॥ २० ॥ कुंडल्यं दक्षिणे भागे अर्धचंद्रं तथोत्तरे । बिंदुरूर्ध्वादिशि प्रोक्तः प्रणवे पंच वै दिशः ॥ २१ ॥ टीका—उत्पत्ति स्थिति प्रलय । त्रिगुणात्मक हाचि होय । चंद्र आणि सूर्य । होऊनी आयुष्य हरितसे ॥ ५४ ॥ क्षण न लागतां घडी । विश्वखेळ मांडूनि सांडी । तोचि हृदयीं दृष्टि उघडी । परतोनि पाहे आ-

पणा ॥ ५५ ॥ ऐकिजे दिशारूप प्रणव । होऊनि असे स्वयमेव । बोलिजे तें अभिनव । सहजीं सहज येतसे ॥ ५६ ॥ तारकरूपें पूर्व उत्तम । दंडक जाण पश्चिम । कुंडली दिशा दक्षिण यम । स्वामी असे जेथींचा ॥ ५७ ॥ अर्धचंद्र ऊर्ध्व उत्तर । बिंदु दिशांतर । प्रणवपंच दिशाकार । होऊनी असे व्यापक ॥ ५८ ॥ ॥ श्लोक ॥ एवं देवं हि चात्मानं विज्ञाता स विचक्षणः । नैर्ऋत्यं तारकाकारमीशान्यं दंडकस्तथा ॥ २२ ॥ कुंडल्यमग्निदिक्चैव वायव्यमर्धचंद्रकं । बिंदुश्चोर्ध्वदिशा प्रोक्ता प्रणवे पंच वैदिशः ॥ २३ ॥ टीका—ॐकारगुह्यज्ञान । जाणती गुरुपुत्र विचक्षण । येरां नकळे तेथील खूण । गुरुकृपेवांचूनियां ॥ ५९ ॥ पंचदिशा सांगितल्या । प्रणवें ज्या व्यापिल्या । आणि पंच असती राहिल्या । त्याही व्यापुनी असतसे ॥ ६० ॥ नैर्ऋत्य होय तारकाकार । ईशानी दंडक विचार । कुंडली अग्निवैश्वानर । वायव्य जाण अर्धचंद्र ॥ ६१ ॥ बिंदु ऊर्ध्व दिशा जाण । दशदिशा प्रणवचि होय आपण । सगुण होऊनि पूज्यमान । सकळीं सकळ सर्वमुखीं ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ सर्वाकारमिहोच्येत सर्वगं सर्वतोमुखं । तारकं सद्योजाताय वामदेवाय दंडकं ॥ २४ ॥ कुंडल्यं तत्पुरुषाय ईशानायार्धचंद्रकं । अघोरेभ्यो बिंदुरिति प्रणवे मुखपंचकं ॥ २५ ॥ टीका—पंचमुख ॐकार । जाहला असे साकार । नामें

सांगेन ईश्वर । वदनें पांच शिवाचीं ॥ ६३ ॥ तारक सद्योजाताय । दंडक वामदेवाय । कुंडली तत्पुरुषाय । ईशान अर्धचंद्र हा ॥ ६४ ॥ अघोरेभ्यो हें नाम । पांचवें जाण उत्तम । श्रुति बोले सुगम । वर्णन स्वमुखें करूनियां॥६५॥ ॥श्लोक॥विश्वावस्थां समाहृत्य विश्वभोगपरायणः । तारकं चैव ऋग्वेदो यजुर्वेदो हि दंडकं ॥ २६ ॥ कुंडल्यं सामवेदोऽयमर्धचंद्रो ह्यथर्वणः । बिंदुश्च सूक्ष्मवेदोऽयंप्रणवो वेदबीजकं ॥ २७ ॥ क्षरं च अक्षरो देवः कूटस्थात्मा च क्षेत्रवित् । अधःशून्यं तारकं च ऊर्ध्वशून्यं च दंडकं ॥ २८ ॥ कुंडल्यं मध्यशून्यं च सर्वशून्यार्धचंद्रकं । बिंदुश्चैव महाशून्यं प्रणवो विश्वतोमुखः ॥ २९ ॥ टीका—विश्वावस्था व्यापून । असतसे जो सममसमान । भोग भोगुनि स्वानंदघन । क्रीडा करी स्वच्छंदें ॥ ६६ ॥ प्रणवरूपें आपण । वेदस्वरूप होऊन । करीतसे क्रीडन । आपल्या रूपी ॥ ६७ ॥ तारक तोचि ऋग्वेद । दंडक जाण यजुर्वेद । कुंडली होऊनि सामवेद । अर्धचंद्र अथर्वण ॥ ६८ ॥ बिंदु जो कां पंचम । तोचि वेद सूक्ष्म । क्षराक्षर व्यापूनि सम । कूटस्थ क्षेत्रीं असत जो ॥ ६९ ॥ पंचशून्य व्यापक । ऐका तेही कौतुक । तंतु पटीं जैसा सम्यक । एकाचि असे सर्व पटीं ॥ ७० ॥ अधःशून्यीं तारक । ऊर्ध्व शून्यीं होय दंडक । मध्यशून्यीं कुंडली देख । सर्वशून्य चंद्र जो॥७१॥बिंदु

जाणिजे महाशून्य । जो सकळीक असे व्यापून । विश्वतोमुखी होऊन । विस्तारा जातसे ॥७२॥

॥ श्लोक ॥ शून्यातीतः परात्परो अक्षरं ब्रह्म उच्यते । प्रणवः पररूपोऽयं कारणं ब्रह्मधारणं ॥ ३० ॥ एवं ब्रह्मात्मसंकाशं वर्धयेज्जगदुद्भवं । प्रथमं तारकं ब्रह्म द्वितीयं दंडरूपकं ॥३१॥ तृतीयं कुंडलाकारं चतुर्थमर्धचंद्रकं । पंचमं बिंदुसंकाशं प्रणवः शून्यरूपकं ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ शून्यातीत परात्पर । होऊनि विचरे निरंतर । जो हा होय अक्षर उच्चार । तोचि तो बोलिजे ॥ ७३ ॥ प्रणव परात्पररूप जाण । ब्रह्मासी आधार हाचि कारण । एवं ब्रह्म सनातन । जग उद्भव सर्व करी ॥ ७४ ॥ जें पंचब्रह्म आइका । सर्वगत असे जें का । सकल रसीं मिळोनि उदका । गुणसंबंधी भासत ॥ ७५ ॥ प्रथम ब्रह्म तारक । द्वितीय तें दंडक । तृतीय कुंडलाकृती देख । चतुर्थ जाण अर्धचंद्र ॥७६॥ पांचवें तें बिंदु जाण । जें लक्षिती सुलक्षण । प्रणव शून्य निरंजन । अव्यक्त अव्यय जो ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ अव्ययं चाद्भुतं ब्रह्म सहजाव्यक्तरूपकं । अव्यक्तोद्भवमाकाशमाकाशान्मारुतस्तथा ॥ ३३ ॥ मारुताज्जायते तेजस्तेजसापस्तथैवच । अद्भ्यश्च जायते पृथ्वी पृथ्व्या विश्वं च जायते ॥३४॥ विश्वगं ब्रह्म ज्ञातव्यं क्षराक्षरमनामयं । एवं ब्रह्म जगद्व्यासं नज्ञातं पशुमानवैः ॥ ३५ ॥ सुज्ञातं

सर्वमाचार्यैः सबाह्याभ्यंतरोदितं । दृश्यनाशे परं ब्रह्म चाखंडमव्ययं स्थितं ॥ ३६॥ एवं ते दीक्षिता लोकाः सर्वसंदेहवर्जिताः ॥ दीक्षया ब्रह्मरूपाश्च तत्वज्ञास्ते व्यवस्थिताः ॥ ३७ ॥

टीका—अव्यक्तापासून आकाश होत । आकाशीं होत मारुत । मारुतीं तेज जन्मत । तेजीं आप जन्मलें ॥ ७८ ॥ आपापासोनि पृथ्वी झाली । पृथ्वी सर्वभूतां प्रसवली । भूतीं ज्ञानकळा निर्मिली । क्षराक्षर सर्वही ॥७९॥ ऐसा होय जगद्व्यापक । ज्ञाते अज्ञान योनी अनेक । व्यापूनि सबाह्य अभ्यंतर देख । अलिप्त होउनी वर्तती ॥ ८० ॥ अखंड अव्यय निरुपम । शुद्ध जें हें परब्रह्म । दीक्षा उपदेशें सुगम । गुरुखुणें जाणणें ॥८१॥ सर्व संदेह टाकून । भावें जातां सद्गुरूस शरण । आपोआप जाणती खूण । प्रणवरूप निजबीज ॥ ८२ ॥ दीक्षा ब्रह्मस्वरूपाची । तत्वज्ञ जाणती साची । दृश्य दर्शिता अनुभवाची । गोडी घेती ब्रह्मरसीं ॥ ८३ ॥ पुनः पुनः तेंचि बोलिले ॐकार प्रणवीं जें व्यापिलें । श्रोतीं चंचळ न पाहिजे केलें । चित्त जें कां दीधलें असे ॥ ८४ ॥ जेविलेंचि मागुतीं जेवावें । अनुभविलेंचि अनुभवावें । श्लोकपदीं असे ह्मणूनि बोलावें । लागलें जाण सहजस्थितीं ॥ ८५ ॥ प्रणव बीजाचा विस्तार । सांगीतला सविस्तर । जो व्यापक होउनी चराचर । विस्तारा जाय ॥ ८६ ॥ ऐसें सांगतां ईश्वर । पार्वती पावली

चमत्कार । विनवितसे जोडोनि कर । आत्मनाथा स्वामिया ॥ ८७ ॥ ॥ श्लोक ॥ पार्वत्युवाच । कथं मात्राः कथं देवः कथं वर्णा वद प्रभो । पृथक् पृथङ्मातृकायां के के वर्णाः प्रतिष्ठिताः ॥३८॥ टीका—जयजयाजी ईश्वरा । तूंचि प्रणवरूप सारा । होऊनिया विस्तारा । सर्वरूपीं प्रगटसी ॥८८॥ प्रसन्न करूनि देवाधिदेवो । पार्वती पुसे अंतर्भावो । मातृका कोठें कोण ठावो । वर्ण कैसा प्रतिष्ठिला ॥८९॥ कोण दैवत कोठें वसे । मात्रा वर्ण कैसा असे । सांगाजी सविस्तर कैसें । प्राणवल्लभा माझिया ॥९०॥ ईश्वर ह्मणे वो अर्धांगी । प्राणवल्लभे जिवलगी । जाणोनि पुससी उगी । लोकोपकाराकारणें ॥९१॥ सांगेन ऐक चित्त देऊनि । सर्व ॐकाराची रचणी । मातृकादि सकळ उभवणी । सविस्तर सांगतों ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ईश्वर उवाच ॥ तारकं मूलभूतं स्यादकाराख्या च मातृका । ब्रह्मा तु दैवतं प्रोक्तं रक्तवर्णविराजितं॥३९॥ टीका—तारकरूप मूळ जें का । अकाराख्य असे मातृका । ब्रह्मा दैवत असे देखा । रक्तवर्ण विराजित ॥ ९३ ॥ ॥ श्लोक ॥ पृथग्वर्णं तथा देवि रक्तपीतं सुशोभितं । त्रयंसार्धं स्वहस्तानां प्रमाणं देहलक्षणं ॥ ४० ॥ टीका—पृथक् वर्ण सांगेन । ऐका तयांचें लक्षण । रक्त पीत वर्ण जाण । सुशोभित दिसतसे ॥ ९४ ॥ औटहस्त प्रमाण । स्थूळ देह असे जाण ।

पुनरपि करूनि विवरण । सांगों तुजला ऐक देवि ॥ ९५ ॥ ॥ श्लोक ॥ द्वितीयं दंडकं ज्ञे-
यमुकाराख्या च मातृका । विष्णुर्दैवतमाख्यातं श्वेतवर्णविराजितं ॥ ४१ ॥ टीका—द्वि-
तीय तें दंडकाकार । मात्रा उकाराक्षर । विष्णुदैवत समर्थ थोर । श्वेतवर्ण विराजित ॥ ९६ ॥
॥ श्लोक ॥ पृथग्वर्णं तथा देवि श्वेतकर्बुरराजितं । अंगुष्ठपर्वहस्तं च प्रमाणं देहलक्षणं ॥ ४२ ॥
टीका—पृथग्वर्ण जाण देवी । श्वेतकर्बुर अनुभवीं । अंगुष्ठप्रमाण तेथें भावी देह लक्षण जाणिजे
॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ तृतीयं चैव कुंडल्यं मकाराख्या च मातृका । रुद्रो दैवतमाख्यातं श्यामवर्ण-
विराजितं ॥ ४३ ॥ टीका—तृतीय तें कुंडल जाण । मकार मातृका कारण । रुद्रदैवत आपण ।
श्यामवर्ण विराजे ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ पृथग्वर्णपंचकं च राजत्येषां च भौतिकं । ते वर्णाः श्या-
मगर्भस्था ज्ञातव्याश्च मनीषिभिः ॥ ४४ ॥ टीका—पृथग्वर्ण पंचक । जाण असे पंचभौतिक ।
ते वर्ण श्यामगर्भस्थ देख । ज्ञानें करूनी जाणणें ॥ ९९ ॥ ॥ श्लोक ॥ पर्वार्धंच स्वहस्तश्च
प्रमाणं देहलक्षणं । चतुर्थमर्धचंद्रं च ईकाराख्या च मातृका ॥ ४५ ॥ टीका—चतुर्थ अर्ध-
चंद्र नेटका । ईकाराख्या असे मातृका । पर्वार्धलक्षण देह निका । जाण असे तेठायीं ॥ १०० ॥
॥ श्लोक ॥ ईश्वरो दैवतं प्रोक्तं नीलवर्णविराजितं । पृथग्वर्णत्रयं चैव नीलं सुनीलकं तथा

॥ ४६ ॥ टीका–ईश्वर दैवत विख्यात । नीलवर्ण विराजित । पृथग्वर्ण जाण तेथ । नीळ सुनीळ विलसतसे ॥ १०१ ॥ ॥ श्लोक ॥ पीतं तृतीयो वर्णस्तु शुद्धश्वेतश्चतुर्थकः । नीलगर्भस्य मध्यस्थं वर्णत्रयमुदाहृतं ॥ ४७ ॥ टीका–तृतीय वर्ण होय पीत । चतुर्थ जाणिजे श्वेत । नीळ गर्भ मध्यस्थ । वर्णत्रय जाणिजे ॥ १०२ ॥ ॥ श्लोक ॥ मसुरामात्रप्रमाणं शोभितं देहलक्षणं । पंचमं बिंदुसंकाशमेकाराख्या च मातृका ॥ ४८ ॥ टीका–मसुरामात्र प्रमाण । शोभत देह सुलक्षण । पांचवें बिंदु होय आपण । एकाराख्य मातृका ॥ १०३ ॥ ॥ श्लोक ॥ देवः सदाशिवो ज्ञेयः पीतवर्णो ह्यनुक्रमात् । पृथग्वर्णस्तु नैवात्र शुद्धस्फटिकदीपवत् ॥ ४९ ॥ टीका–दैवत जाण सदाशिव । पीतवर्ण अनुक्रमें स्वयमेव । पृथग्वर्ण नसे भाव । शुद्ध स्फटिकदीप जैसा ॥ १०४ ॥ ॥ श्लोक ॥ प्रमाणं न भवत्येव कैवल्यज्ञानदेहके ॥ ५० ॥ टीका–अप्रमाण भव दैवत । साक्षी स्वरूप तेंचि होत । ज्ञानकैवल्य देह तेथ । चैतन्यरूप जाणिजे ॥ १०५ ॥ ॥ श्लोक ॥ इदं सर्वशिरः पीतशिखं केवलराजितं । पीतःशिखाबिंदुरत्र ब्रह्मसायुज्यकारकः ॥ ५१ ॥ टीका–सर्वांहून जें श्रेष्ठ । पीतशिखा सुवर्ण चोखट । त्यांत बिंदु सूक्ष्म वरिष्ठ । ब्रह्मसायुज्यकारक जो ॥ १०६ ॥ ॥ श्लोक ॥ बिंदुगर्भस्य मध्यस्थं शुद्ध-

श्वेतं सुलक्षणं । सोऽहं मात्रा मुख्यबीजं सर्वांतर्गर्भचारि यत् ॥ ५२ ॥ टीका—बिंदुगर्भमध्यस्थ जाण । शुद्ध श्वेत मुलक्षण । सोहं मात्रा बीज उच्चारण । सर्वांतर गर्भ जो ॥ १०७ ॥ ॥ श्लोक ॥ सोऽहंबीजस्य मध्यस्थः श्रीरामः परमो महान् । सोऽहं राम इदं ज्ञात्वा अत ऊर्ध्वं न किंचन ॥ ५३ ॥ टीका—सोहंबीजमध्यस्थ । श्रीराम परम हृदयस्थ । ध्यान मी तयातें करीत । अखंड जाण स्मरणेंशीं ॥ १०८ ॥ ॥ श्लोक ॥ पार्वत्युवाच । सोऽहं तारकब्रह्मैव राममंत्रं वद प्रभो । एतच्छ्रवणमात्रेण कृतकृत्याऽस्मि सर्वदा ॥ ५४ ॥ टीका—पार्वती ह्मणे सदाशिवा । माझिया जीवींचिया जीवा । सोहं तारक मंत्र भावा । राममंत्र बोलिजे ॥ १०९ ॥ जयाचिये स्मरणमात्रेंकरोनी । प्राणी मुक्त होती तत्क्षणीं । सद्गुरुवाक्य पडतां श्रवणीं । कृतकृत्य जीव होय ॥ ११० ॥ ॥ श्लोक ॥ ईश्वरउवाच । न देयं यस्य कस्यापि प्राणाः कंठगता यदि । देयं सद्भक्तियुक्ताय शांताय समचेतसे ॥५५॥ टीका—ईश्वर ह्मणे आदिशक्ती । उत्तम केली प्रश्नोक्ती । जेणें जीव उरद्धरती । तोचि केला उपकार॥१११॥ सांगतों हें ऐक तुज । अश्रद्धीं न सांगिजे गुज । प्राणसंकटही होतां सहज । न कदापि बोलिजे ॥११२॥ अधिकारी जे होती । तेचि तेथें युक्त हो असती । जे शांत समदृष्टि सद्भक्ति

करिती । तयांसीच उपदेशिजे ॥११३॥ ॥श्लोक॥ गुरुभक्तिरतो नित्यं विरक्तो यः समाहितः॥ भक्तिर्ज्ञानं विरक्तिश्च हृदि तिष्ठेत्सनातनी ॥ ५६॥ टीका—गुरुभक्त आणि विरक्त । सार असार जो जाणत । आर्त ज्ञानी विवेकयुक्त । हृदयीं असे भूतदया ॥११४॥ ॥श्लोक॥ तस्मै देयं च देवेशि अन्यथा न प्रकाशयेत् । प्रकाशितं च दुष्टेऽपि निष्फलं जायते ध्रुवं ॥५७॥ टीका—तयासी उपदेश कारावा देवी । इतर वर्जावे अभावी । ओल नसतां बीज पृथिवीं । पेरिलें वृथा जातसे ॥११५॥ सर्व मंत्रांचें बीज । सर्व गुजांचें गुज । मोक्षकारक असे सहज । सर्व जीवमात्रांसि जें ॥११६॥ जेथें वेद मौनावले । चित्तचतुष्टया ठक पडिलें । मन मनपणा विसरलें । ऐसें जें का ॥११७॥ समुद्र न सांडी वेळा । शेष मस्तकीं धरी भूगोला । पृथ्वी वाहे भूतां सकळां । हे आज्ञा असे ज्याची ॥११८॥ सूर्य जयाचे आज्ञें फिरे । पर्वत असती स्थिर धरे । मेघ वृष्टि करोनि ओसरे । यथाकाळपरत्वें ॥११९॥ ॥ श्लोक ॥ अथ मंत्रं प्रवक्ष्यामि मोक्षदं सर्वदेहिनां । ॐहंसःसोहं तथा देवि इत्यादौपाठयेत्सुधीः ॥५८॥ पश्चाच्छ्रीरामरामाय नमश्चैवाभिनिश्चितं ॥ एवं च तारकं ब्रह्म राममंत्रमिति स्मृतं ॥ ५९ ॥ टीका—ऐशी सत्ता जयाची जे का । ऐकिजे तया रामतारका । स्मरणें पावन करीत लोकां । भावमात्र धरितां

पैं ॥१२०॥ अयं तत्त्व सोहं देवी। हीं अक्षरें आधीं जपावीं। पश्चात् श्रीराम राम ह्मणावीं। गुरु-
मुखें निश्चित ॥१२१॥ गुरुमुखेंवीण ह्मणों जातां। फलकारक न होय तत्त्वतां। शरण जाऊ-
नि गुरूसी पुसतां। आपोआप कळतसे ॥१२२॥ औषधवल्ली प्रगट दिसती। परि वैद्यावांचू-
नि नकळे युक्ति। तरीच रोग नासती। चिकित्सका ह्मातीं ॥१२३॥ तैसा सद्वैद्य श्रीगुरु। भवरो-
गाचा करी संहारु। सद्भक्तांचा करी उद्धारु। क्षण एक न लागतां ॥१२४॥ तें हें जाण तारक
ब्रह्म। जें निजाचें निजवर्म। राममंत्र परम सुगम। सांगितला तुजप्रती॥१२५॥ ॥श्लोक॥ अथ
मंत्राधिकारस्तु सर्वस्याऽत्र न संशयः ॥ ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रो वा ह्यंत्यजोऽपि वा
॥६०॥टीका—हा मंत्र जाण सर्वांस। उपदेश कीजे जनांस। ब्राम्हण क्षत्रिय वैश्य शूद्रांस।
चांडाळ आदि करोनियां॥१२६॥ ॥श्लोक॥ **षड्दर्शनादिमार्गेषु ब्राह्मदार्शे तथैवच ॥ वर्णेषु**
वर्णहीनेषु चांडालादिषु निश्चितं ॥६१॥ ॥टीका—षड्दर्शनादि करूनी। जे होती अदर्शनी। वर्ण
अथवा अवर्णी। अंत्यज होय ॥१२७॥ ॥श्लोक॥ **यस्य देहे वसेच्छ्रद्धा तस्य देयं शुभानने ॥**
मंत्रो देयः प्रथमतः क्षेत्रशुद्धयै सुनिश्चितं ॥६२॥ टीका—जयाचें शुद्ध असे अंतःकरण। श्र-
द्धायुक्त आवडी जाण। तयासि मंत्र सांगिजे कृपा करून। मम प्रिये शुभानने ॥ १२८ ॥

श्लोक॥ सप्तकोटिर्महामंत्रा ह्यसंख्या ह्युपमंत्रकाः ॥ एतांश्च सकलान् मंत्रान् न तावच्चेह ब्रूमहे ॥६३॥ टीका—सप्तकोटि महामंत्र । सामर्थ्यें थोर असती पवित्र । परंतु तारक कौतुक विचित्र । सर्वांहुनी श्रेष्ठ असे ॥ १२९ ॥ प्रणवाचें निजरूप । निर्गुण निरंजन स्वरूप । रूपातीत होय अरूप । ऐसें श्रुती बोलती ॥ १३० ॥ जो हा शब्दाचा अंत । ऐसें बोले सिद्धांत । ह्मणोनि नाम अनंत । अपार पार न कळे ज्याचा ॥१३१॥ मूळ मायेचें विश्रामधाम । पूर्ण चैतन्य पूर्णकाम । योगियांचा जो असे विश्राम । निजस्वरूप जाणिजे ॥ १३२ ॥ सूर्य सर्वांशीं सारिखा । दिसतसे समोर मुखा । तैसा बोधभानु भाविका । असे उदयो अस्तुवीण ॥१३३॥ ॥ श्लोक ॥ सर्वमंत्राधिकाः श्रेष्ठा पंचायतनमंत्रकाः ॥ गजाननाधिकतरा सूर्यविद्या विशिष्यते॥६४॥ सूर्यविद्याधिका देवि विष्णुविद्या विशिष्यते ॥ विष्णुविद्याधिका श्रेष्ठा शांभवी शिववल्लभा ॥ ६५ ॥ शांभव्या अधिका देवि शक्तिविद्या परा स्मृता ॥ एतच्छ्रेष्ठतरा विद्या एतच्छ्रेष्ठा न विद्यते ॥ ६६ ॥ सर्वविद्याशिरो ह्यस्माच्छ्रीविद्या हि न संशयः ॥ तस्मात् सा सर्वविद्यानां श्रीविद्या शिरसी प्रिये ॥ ६७ ॥ टीका—सर्व मंत्रीं वरिष्ठ । पंचायतनमंत्र श्रेष्ठ । ऐका नांवें स्पष्ट । अधिका अधिकोत्तर बोलती ॥ १३४ ॥ गजानन उपासना थोर । त्याहूनी

सूर्य अधिकोत्तर । असे श्रेष्ठ लक्ष्मीवर । विष्णु विद्या विशेष होय ॥ १३५ ॥ विष्णु अधिक जाण या । शांभवी शिवविद्या । याहूनि अधिक असे माया । देवी शक्ति जाणिजे ॥ १३६ ॥ शक्तीहूनि अधिक । विद्या नसे आणिक । सकळ हें जाण कौतुक । असे जियेचें ॥ १३७ ॥ त्याहूनि अधिक असे । शरीरीं श्रेष्ठ शिर जैसें । श्रीविद्या समर्थ विलसे । श्रेष्ठ सर्व मंत्रांचे ॥ १३८ ॥ ॥ श्लोक ॥ राजराजेश्वरी विद्या एतन्मुख्या न काचन ॥ सत्यं सत्यं पुनः सत्यं सत्यं सत्यं पुनः पुनः ॥६८॥ टीका—त्रिगुणांचें जें स्फुरण । तेंचि ही दिव्य प्रकाशमान । राजराजेश्वरी श्रेष्ठ जाण । सत्य सत्य त्रिवाचा ॥ १३९ ॥ ॥श्लोक॥ सत्यं सत्यं पुनः सत्यं त्रिर्वाचा कथयाम्यहम् । अस्याधिका सर्वरिता एतस्मिन् कथिता तव ॥ ६९ ॥ टीका—थोर असे इचा महिमा । पहातां नाहीं जिची सीमा । आदिशक्ति तेचि तूं उमा । सत्य सत्य त्रिवाचा ॥ १४० ॥ करितां इचें वर्णन । वाचेसि पडतसे मौन । आनंदवृष्टि चैतन्यघन । सत्य सत्य त्रिवाचा ॥ १४१ ॥ एकाहूनि एक अधिक । हेंचि मूळमायेचें कौतुक दाऊनि मिळे निर्गुण देख । प्रभा जैशी सूर्याची ॥ १४२ ॥ ॥ श्लोक ॥ एतदूर्ध्वं न कस्यापि निश्चितं कथितं शिवे ॥ भाष्यं मे हि पुनर्भाष्यं निश्चयेन ब्रवीम्यहम् ॥७०॥ टीका—तारकांचा अभिप्राय ।

मार्गें सांगितला असे सर्व। अलक्ष लक्षिजे ऊर्ध्व। लक्षातीत जाण शिव ॥ १४३ ॥ पुनः पुनः सांगतों तुज। बोलतां आनंद होय सहज। जें हें आमुचें हृदयगुज सांगितलें तुज देवी॥१४४॥

॥श्लोक॥ अस्य मंत्रस्य देवेशि नैव न्यासः षडंगकः॥ नैव ध्यानं भूतशुद्धिर्न च प्राणप्रतिष्ठितिः ॥७१॥ कवचं न न च स्तोत्रं न च दिग्बंधनादिकं ॥ सिद्धसाध्यसुसिद्धारिघटितार्थं न किंचन ॥७२॥ न यंत्रपूजनं चैव पद्धत्या पटलादिकं। सहस्रनामजप्यादि स्तवराजादिकं न च॥७३॥ न होमो न क्रिया यस्य धनर्णादि तथा न हि। तस्माद्घटितार्थमेवमुक्तत्वं सर्वदा प्रिये ॥७४॥ टीका—न लागती न्यास मुद्रा षड्वर्ग। ध्यान प्रतिष्ठा भूतशुद्धि सांग। कवच स्तोत्रादि अनेक। नाहीं दिग्बंधनादिक ॥१४५॥ सिद्ध साध्य असे तेथ। घटितार्थ पहाणें नलगे जेथ। यंत्रपूजादिक पदार्थ। कांहींच नलगे जेथें ॥ १४६ ॥ जैसा सोपा पायउतार। नलगे नाव आणिक विचार। तैसा हा तारकेश्वर। समर्थ जाण सर्वांसी ॥ १४७॥ स्तवराज सहस्रनाम। नाहीं क्रियादिक होम। धन ऋणादि नाम। कांहींच नसे खटाटोप ॥ १४८ ॥ सर्वांस अनुग्रहकारक। मोक्षदायक असे तारक। सर्वांस प्रीतिकर आत्मिक। पुनःपुनः गुरु बोलवी ॥१४९॥ अपूर्णासि कैंचें वाहन। विश्वाधारासी आसन। नित्य तृप्तासी जेवण। कैसें

जाण होतसे ॥१५०॥ येथें भावाचें असे बळ। तरीच पावे सुफळ। सद्भावावांचून केवळ। ज्ञान न होय सत्य तें ॥१५१॥ पवित्र आणि सुगम। जो माझा हृदयस्थ आत्माराम। अखंड मंत्र जपतां नाम। मुक्त सर्वदा होती प्रिये ॥ १५२ ॥ ॥ श्लोक ॥ अतःपरं निरूपणं नास्ति नास्ति कदाचन ॥ संपूर्णो हि प्रिये राम आत्मारामो हि मे हृदि ॥७५॥ टीका—अतःपर निरोपण नाहीं। पुनःपुनः सांगतों पाहीं। हे प्रचित घेऊनि देहीं। समतारक जाणावा॥ १५३ ॥ ॥ श्लोक ॥ पंचाक्षरं जपेत्पूर्वं मध्यें रामपदं स्मरेत्। अंते पंचाक्षरं जप्त्वा शिवेन समतां व्रजेत्॥७६॥ टीका—पंचाक्षरें आधीं जपावीं। मध्यें रामपदें स्मरावीं। अंतीं पंचाक्षरी ह्मणावी। गुरुमुखें कळों येती ॥ १५४ ॥ उघड हो न बोलावें। बोलणें लागे स्वभावें। गुरु प्रगट कैसें म्हणावें। ह्मण तेजास या ॥ १५५ ॥ ब्रम्हासि नाहीं पाठ पोट। तें गुप्त ना दिसे प्रगट। सभर भरलें असे घनदाट। आकाश जैसें व्यापकपणें ॥ १५६ ॥ तेथूनि तारकवर्णन। राहिलें असे कथन। पुढें त्रिपदमहिमान। बोलणें असे सहजस्थिती ॥ १५७ ॥ ॥ श्लोक ॥ तत्पदं शिवरूपाय त्वंपदं जीवरूपिणे ॥ असीत्येतत्तु रामाय त्रयस्यैक्यं न संशयः ॥ ७७ ॥ टीका—तत्पद शिवरूप जाण। त्वंपद जीवरूप जाण। दोहोंचें ऐक्य जें कारण। असिपद

जाणिजे ॥१५८॥ असि पद तोचि आत्माराम । सकळ हृदयविश्राम । जीवशिवांचें निजधाम । ऐक्य असे संशय नाहीं ॥ १५९ ॥ बहुत जरी साधनें केलीं । हातीं न येतां आत्मवल्ली । तरी व्यर्थचि तीं सर्व गेलीं । आत्मकळेवांचूनी ॥ १६० ॥ ॥ श्लोक ॥ एकेऽपि हेमकर्तारो जीर्णकायं पुनर्नवं । ऋद्धिं सिद्धिं प्रदातारो ब्रह्मज्ञान विशेषतः ॥ ७८ ॥ दिव्यौषधीरसरसायनधातुवादे । होरावशीकरणगारुडधन्ववादे । ताले च खड्गगुटिकाजलमंत्रवादे । सिध्यंति ते हरिशिवौ च यदि प्रसन्नौ ॥ ७९ ॥ कलाचतुष्टये युक्तं शिवं शिवं साक्षान्न संशयः । ज्ञात्वा गुरुमुखाद्ब्रह्म ब्रह्मैवाऽहं न संशयः ॥ ८० ॥ इति श्रीमत्पद्मपुराणे तारकब्रह्म राममंत्रग्रंथे शिवपार्वतीसंवादे कपिलगीतायां हृदयस्थगुह्यनिरूपणं नाम तृतीयोऽध्यायः ॥३॥ टीका—एकीं हेमक्रिया केली । एकीं पुन्हां काया निर्मिली । एकीं ऋद्धी सिद्धी साधिली । सामर्थ्यबळें ॥ १६१ ॥ औषधी दिव्य एकीं साधिल्या । होरारस रसायन धातुवादादि शिकल्या । वशीकरण कळा संपादिल्या । मंत्रबळें करोनियां ॥१६२॥ गारुडविद्या धन्ववादी । ताळ खड्ग गुटिकादी । मंत्रसामर्थ्यें सर्व सिद्धि । हरिहर शक्ति प्रसादें ॥१६३॥ सद्गुरुकृपेविण । गुह्य तत्त्व नकळे जाण । अवतार समर्थ रामादिकृष्ण । सद्गुरूसी शरण पैं गेले॥१६४॥

त्रिगुणातीत जो खरा । तोचि हा अध्याय तिसरा । बोलत असे निजात्म विचारा । गुह्य जें हें हृदयींचें ॥१६५॥ जाणे त्रिनेत्र सदाशिव । मोक्षलक्ष्मीचें गौरव । निज विश्रांतीचा ठाव । प्रसंग हा जाणिजे॥१६६॥त्रिपुटीव्यापक असे जो हा । तोचि जाणिजे अभिप्राय हा । आत्माराम हृदयींचा पहा । शिव जपे नित्य जो ॥१६७॥ मंत्र गुह्य आख्यान । यथामति केलें कथन । पुढें चतुर्थ सानुसंधान । ऐका सज्ञान श्रोते हो ॥१६८॥ हें गुरुकृपेचेंचि नवल । नव्हे केवळ कवित्व बळ । व्युत्पत्ति पद पदांतर केवळ । शब्दसंगती कळेना ॥१६९॥ ऐसा असे परम मूढ । परी जें असे हृदयींचें गूढ । बोलिलों तुमचे कृपें उघड । आज्ञा समर्थ श्रीगुरूची ॥ १७० ॥ गुरु बाळका बोलवी । हृदयीं बुद्धि उद्भवी । आत्माराम गोसावी समर्थ जो का त्रिभुवनीं ॥ १७१ ॥ इति श्रीहरिदासआचरेकरोपनामभक्तेन विरचितायाः कपिलगीताटीकायाः तृतीयः प्रसंगः समाप्तः ॥ श्रीमत्कृष्णार्पणमस्तुः ॥ ॥ ॥ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्लोकः ॥ पार्वत्युवाच ॥ विहंगो वाहनं यस्य त्रिकचा यस्य भूषणं । सालपा वामभागस्था स देवः शरणं मम ॥ १ ॥ टीका—ॐनमो गुरु त्रिगुणात्मका । गुणातीत तूं व्यापका । हृदयभुवनदीपका । प्रकाश तुझा विश्व हें ॥ १ ॥ ब्रह्मा विष्णु शंकर ।

होसी तूंचि गुरु ईश्वर । गुणपरत्वें विस्तार । रचिसी तूं सर्व हा ॥२॥ सत्यलोक वैकुंठ कैलास । निर्मूनि करिसी विलास । तोचि तूं हृदयीं निवास । व्यापक अससी सद्गुरु ॥ ३ ॥ ब्रह्मा होऊनि त्रिकूटस्थानीं । अससी तूं कैवल्यदानी । अनंत अपार तुझी करणी । वेद जाणोनि मौनावले ॥ ४ ॥ विष्णु होऊनि श्रीहटीं । राज्य करिसी वैकुंठीं । तुझी बोलों जातां गोष्टी । वाचे मिठी पडतसे ॥ ५ ॥ दिव्य ज्योतीची कळा । तेचि मोक्षलक्ष्मी बाळा । हें विश्व जियेचा उमाळा । येत जात असतीच असे ॥ ६ ॥ गोल्हाटमंडळीं अससी । तोचि तूं कैलासवासी । वसवूनि दशवे खिडकीशीं । उपदेश करिसी निजमंत्र ॥ ७ ॥ सूर्याची जैशी दीप्ति । तैशी तुझी प्रभा पार्वती । होऊनि असे आदिशक्ती । हरिहरां अंगीं ॥ ८ ॥ गरुड वृषभवाहन । तेचि दोन्ही मन पवन । ऐक्य स्वरूपीं होऊन । सेवा करिती शिष्यरूपें ॥ ९ ॥ अनुहत शिंगी पावा । वाजतां मानसीं परम विसावा । काय सांगों अभिनवा । अनुभवी जाणती ॥ १० ॥ अनुभवावांचूनि हा प्रमेय । सहसा गम्य न होय । भावें धरितां श्रीगुरुपाय । आपेंआप कळतसे ॥ ११ ॥ श्रीगुरुस्वामी त्रिगुणात्मया । हृदयीं विसाविया माझिया । कृपा करूनि समर्था या । अनुभवपथा चालवीं ॥ १२ ॥ भावें येतां शरण । कृपा केली सायुज्जदान । माय बाळका

जीवन । सहज घाली कृपाळुत्वें ॥ १३ ॥ तूं तो कृपेचा सागर । स्वानंदघन परम उदार । वृष्टि करितां चातक थोर । बिंदुमात्रें संतोषे ॥ १४ ॥ काय करूं नमन । जेथें बोलतां हारपलें मन । तेंचि तुझें परम स्थान । मौन बोलणें जेथींचें ॥ १५ ॥ मागें प्रसंग जाहला तिसरा । तारकउपदेश निजात्मसारा । संवाद जाहला पार्वतीशंकरा । निजात्मगुह्य बोलणें ॥ १६ ॥ चतुर्थ अध्याय चालिला । ऐका तेथील कौतुक बोला । जेणें संतोष होय मानसाला । ऐकतांचि अभिप्राय ॥ १७ ॥ नवविध भक्तीचें लक्षण । कैसें आहे कोण कोण । सांगेन नामाभिधान । सविस्तर करूनियां ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ परीक्षिच्छ्रवणं चक्रे कीर्तनं नारदः शुकः ॥ स्मरणं शिवप्रऱ्हादौ लक्ष्मीश्च पादसेवनं ॥ २ ॥ टीका—परीक्षितीनें केलें श्रवण । नारद शुक करिती कीर्तन । स्मरण शिव प्रऱ्हाद जाण । पादसेवन करी रमा ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ अर्चनं पूजनं ध्यानं पृथुराजादिभिः कृतं ॥ वंदनं तूद्धवाक्रूरौ दास्यं तार्क्ष्यहनूमतौ ॥ ३ ॥ टीका—अर्चन पूजन ध्यान । पृथुराजादि करिती निष्ठा धरून । उद्धवाक्रूर करिती वंदन । दास्य हनुमंत गरुड जाणिजे ॥ २० ॥ ॥ श्लोक ॥ सख्यमर्जुनकर्तव्यंबलेश्चात्मनिवेदनं । भक्तिं नवविधां कृत्वा कैवल्यं प्राप्यते परं ॥ ४ ॥ टीका—सख्य केलें अर्जुनें ।

आत्मनिवेदन बळीनें। सांगितलीं नवविध लक्षणें। कैवल्यदायक परम जीं ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ **श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं ॥ अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनं ॥ ५ ॥ टीका**—श्रवण कीर्तन विष्णुस्मरण । चौथें तें पादसेवन । वंदन दास्य सख्य जाण । आत्मनिवेदन नववी हो ॥ २२ ॥ नव वाटा निर्मिलिया । मोक्षपदासि चालालिया । मिळणी मिळतां एकत्वा आलिया । निजात्मअनुभवीं ॥ २३ ॥ मुख्य निष्ठा थोर जाण । सद्भाव हाचि कारण । तेथेंचि ठसावें सगुण निर्गुण । मन स्थिर जाहलिया ॥ २४ ॥ मन स्थिर होतां जाण । सर्व भक्तीचें येतें लक्षण । जरी जाणोनि आदिस्थान । सुख पावे तये स्थळीं ॥ २५ ॥ मन एकाग्र व्हावया । करिती तपादि सामग्रिया । ब्रह्मचारी संन्यासी होऊनियां । त्यजिती जाण संसार हा ॥ २६ ॥ एकीं मौनमुद्रा धरिली । एकीं पंचाग्नि धूम्रपानें केलीं । एक नागवीं उघडीं झालीं । सैरावैरा फिरताती ॥ २७ ॥ ॥ श्लोक ॥ **वेदांतन्यायमीमांसातर्कन्यायादिकं तथा । चार्वाकादीनि शास्त्राणि षड्दर्शनमपि स्मृतं ॥ ६ ॥ टीका**—जाणून षड्दर्शनें निर्मिलीं । वेदांत न्याय मीमांसा केलीं । तर्क नैय्यायिक चार्वाकादि झालीं । निजात्मसुख जाणावया ॥ २८ ॥ षड्दर्शनें यासि ह्मणिजे । अधिकारी नामें ऐकिजे । बोलणें लागलें सहजें ।

श्लोकपदीं कथिलें असे ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ कापालिकश्च जैनश्च जंगमो ब्राह्मणस्तथा । संन्यासी च तथा सोऽपि षड्दर्शनधराः स्मृताः ॥ ७ ॥ टीका—कापालिक जंगम जैन । संन्यासी आणि ब्राह्मण । सहावा चार्वाक जाण । षड्दर्शनां जाणिती ॥ ३० ॥ ॥ श्लोक ॥ शैवाः शाक्तास्तथा सौर गाणपत्यास्तथैवच । जैनाश्च वैष्णवाः प्रोक्ताः षड्दर्शनमयाः स्मृताः ॥ ८ ॥ टीका—शैव शाक्त आणि सौर । गाणपत्य जाण गणेश्वर । जैन वैष्णव नाम विचार । असती हे पुरातन ॥ ३१ ॥ श्लोकपदीं पहावें । श्रोतीं दूषण न ठेवावें । अंतर पडलें तरी कृपाळुत्वें । सांभाळिजे समर्थपणें ॥ ३२ ॥ मन स्थिर करावें । ह्मणोनि लागलें बोलावें । टीकेचे निमित्तें करूनि चालावें । आत्मकथन आवडीं ॥ ३३ ॥ मन स्थिर जरी झालें । सर्व प्रमेय त्यांत आलें । भावें वंदितां गुरूचीं पाउलें । स्थिर होय तत्क्षणीं ॥ ३४ ॥ प्रकृतिरूप जाणिजे मन । निर्मित देवतादि षड्दर्शन । गुणपरत्वें बंधन । करूनि ठेवित स्वइच्छें ॥ ३५ ॥ माया दावणी केली । तीस ही पेंढी निर्मिली । गुणपरत्वें गोंविली । ठायींच्या ठायीं जाणिजे ॥ २६ ॥ मायेचें विचित्र करणें । गुप्त ठेविलें असे ठेवणें । दृश्यरूप पदार्थ दाखवणें । सत्ता जाण तयेची ॥ ३७ ॥ ज्ञानावांचूनि स्वरूपप्राप्ती । न होय जाण

कोणे युक्ती । नाना तीर्थें व्रतें करिती । प्राप्त न होय ज्ञानकळा ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ हस्तः पवित्रो यदि दानपुण्यं पादौ पवित्रौ यदि तीर्थयात्रा ॥ वाक्यं पवित्रं यदि रामनाम हृद्यं पवित्रं यदि ब्रह्मनिष्ठा ॥ ९ ॥ टीका—हस्त पवित्र करितां दान । पाद पवित्र तीर्थ-यात्रेकरून । वाक्य पवित्र स्मरणें जाण । रामनामें करूनियां ॥ ३९ ॥ ब्रह्मनिष्ठेवांचून । हृदय पवित्र नव्हे जाण । जरी जाणिजे गुरुखूण । तरीच सार्थक जन्मा वें ॥ ४० ॥ गुरुगम्य प्राप्तीचें लक्षण । सांगेन तुझिये कृपेंकरून । समर्थ बोलिले जें वचन । सत्य विश्वासें मानिजे ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ ज्ञानं विरागो नियमो यमश्च स्वाध्यायवर्णाश्रमधर्मकर्म ॥ भक्तिः परेशस्य सतां प्रसंगो मोक्षस्य मार्गं प्रवदंति संतः ॥ १० ॥ टीका—शास्त्रप्रतीति पाहून । वैरा-ग्ययुक्त होय तें ज्ञान । वृत्तीसि नियम इंद्रियांसि दमन । नित्यानित्यविचार हा ॥ ४२ ॥ वर्णाश्रमधर्म । यथाविधि आचरणें कर्म । नित्य नैमित्तिक नेम । चाले निष्ठायुक्त जो ॥ ४३ ॥ भक्ति श्रद्धायुक्त करणें । परात्पर दृष्टि जाणणें । स्वतां आत्मप्रतीति अनुभवणें । मोक्षमार्ग यया ह्मणती ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ शैवाः पाशुपता महाव्रतधाराः कालीमुखा जंगमाः ॥ शाक्ताः कौलकुलार्चनादिनिरताः कापालिकाः शांभवाः ॥ येऽज्ञाः कृत्रिममंत्रतं-

त्रनिरतास्ते तत्त्वतो वंचिताः । तेषामल्पमिहैकमेव हि फलं सत्यं न मोक्षः परः ॥ ११ ॥ ॥ टीका–शैव पशुपत उत्तम । काळीमुख जंगम । शाक्त कौळ कुळार्चन कर्म । कापालिक शांभव ॥ ४५ ॥ यज्ञादिककर्म । मंत्रतंत्रादि परम । करितां न पाविजे मोक्षधाम । सत्यज्ञानाविण कैं तें ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ चार्वाकाश्चतुराः स्वधर्मनिपुणा देहात्मवादे रताः । नानातर्ककुतर्कभावसहिता निष्ठापरास्तार्किकाः ॥ वेदार्थप्रतिपादकाः सुकुशलाः कर्तेति नैय्यायिकास्तेषां स्वल्पफलं भवेतु सततं सत्यं न मोक्षः परः ॥ १२ ॥ टीका–चार्वाकादिक चतुर । स्वधर्मकर्मी पुण्य थोर । नाना तर्ककुतर्की तत्पर । देहात्मवादीं प्रवीण जे ॥ ४७ ॥ निष्ठायुक्त तार्किक । वेदार्थपरमप्रातिपादक । कुशळ कर्ते नैय्यायिक । न मोक्ष सत्यज्ञानाविण ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ कर्माकर्मविकर्मबोधजनकाः कर्मार्थमीमांसकाः सांख्यास्त्यागपराः सदा विविदिषासंन्यासिनः स्नातकाः ॥ योगांगाष्टकबोधकप्रतिभटाः पातंजला न्यायका योगज्ञानमिदं प्रबोधजनकं सत्यं न मोक्षः परः ॥ १३ ॥ टीका–कर्माकर्मांची बोधक । मीमांसा कर्मार्थप्रातिपादक । सांख्य त्याग परावर वोळख । सकळ जाणती संन्यास ही ॥ ४९ ॥ पातंजलि न्यायातें कथिती । अष्टांगा सकळ जाणती । योगज्ञानाची सर्व युक्ती ।

जे बोधिती जनांप्रती ॥ ५० ॥ ॥ श्लोक ॥ वेदांती बहुतर्ककर्कशमतिश्चाद्वैतसंबोधको । नानावादविवादिनो न निपुणा विज्ञानबोधात्मकाः ॥ कर्तारं प्रवदंति चैव यवनाः पापे रता निर्दया । विप्रा वेदरताः समत्वविरता सत्यं न मोक्षः परः ॥ १४ ॥ टीका—वेदांती बहुत तर्क बोलती । द्वैत अद्वैत प्रतिपादिती । नाना वाद विवाद कथिती । ज्ञानविज्ञानयुक्त जे ॥ ५१ ॥ वेदोक्ताचा गर्भार्थ । सकळीं समता ही कळत । सर्व गोष्टींचा मथितार्थ । जाणे जरी ॥ ५२ ॥ अंतरीं होय निर्दय । नकळे गुरुचरणप्रमेय । मोक्ष तयांसि न होय । सत्यज्ञानावीण कदा ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ शून्यार्थप्रतिपादका लघुगुरोर्बोधाज्जिनाः श्रावका नानातीर्थनिषेवकाः श्रुतिपराः स्मृत्यर्थसंबोधकाः । चंडाश्चंडविचंडजल्पकमहाभेदाः सदा वैष्णवाः । सर्वे वै प्रपतंति दुःसहतरे सत्यं न मोक्षः परः ॥ १५ ॥ टीका—शून्यार्थप्रतिपादक । लघुगुरुबोधें जिन श्रावक । नानातीर्थस्नातक । पवित्र हो का ॥ ५४ ॥ श्रुति स्मृति तीर्थ जाणिती । चंडाचंड वितंड जल्पती । वैष्णवदीक्षा चालविती । लोकांकरवीं ॥ ५५ ॥ ॥ श्लोक ॥ प्राणापाननिरोधनार्थनिरताः संस्थाप्य ते शेषका वायुं पूरककुंभकं प्रतिदिनं तं रेचकं वा हठात् । जिव्हादोहनकर्मिकाः सुरसिका लंबायनालंबिका योगांगैश्च विभूषिताश्च सततं

सत्यं न मोक्षः परः ॥ १६ ॥ टीका–प्राणापानसाधन । पूरक कुंभक रेचक जाण । हठयोग जिव्हादोहन । रिद्धि सिद्धि साधिल्या ॥ ५६ ॥ लंबिकायोग साधिती । योगयागादि जाणती । जंव नाहीं आत्मप्रतीति । न मोक्ष सत्यज्ञानाविण ॥ ५७ ॥ ॥ श्लोक ॥ यं शैवाः समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदांतिनो । बौद्धा बुद्ध इति प्रमाणपटवः कर्तेति नैय्यायिकाः । अर्हन्नित्यथ जैनशासनरताः कर्मेति मीमांसकाः । सोऽयं वो विदधातु वाछितफलं सत्यं न मोक्षात् परं ॥ १७ ॥ टीका–वेदांती ब्रह्म जाणत । बोधाबोधप्रमाणयुक्त । नैय्यायिक कुकर्मी रत । तर्कमीमांसीं निपुण जरी ॥ ५८ ॥ ॥ श्लोक ॥ सौराःसूर्यमुपासते च सततं शाक्ताश्च शक्तिं तथा । गाणेशेषु परं गणेशभजनं विष्णुं भजेद्वैष्णवः । शैवानां शिवपूजनं परमकं विप्रे च सर्वात्मकं । नानादैवतवांछितार्थवरदं सत्यं न मोक्षात् परं ॥ १८ ॥ टीका–सौर सुर्योपासना करिती । शाक्त शक्तीतें भजती । गाणपत्य गणपती । वैष्णव श्रीमहाविष्णु ॥ ५९ ॥ शैव शंभूतें पूजिती । विप्र ब्रह्मरूप अर्चिती । नाना दैवतीं फळ इच्छा वांछिती । न मोक्ष सत्यज्ञानेंविण ॥ ६० ॥ ॥ श्लोक ॥ नानाचित्रविचित्रवेशशरणा नानामते भ्रामका । नानातीर्थनिषेवका जपपरा मौनास्थिता नित्यशः । सर्वे चोदर सेवकास्त्वभि

मता वादे विवादे रता । ज्ञानान्मुक्तिरिदं वदंति मुनयस्त्वप्राप्य सा दुर्लभा ॥ १९ ॥ टीका–नाना चित्र विचित्र वेष रचिती । नाना मतें स्थापिती । नाना तीर्थें सेविती । जपमौनादिक करीत ॥ ६१ ॥ जनीं कीर्ति वाढविती । स्वर्गादि विषयभोग इच्छिती । तया नाहीं आत्मप्राप्ती । न मोक्ष सत्यज्ञानेंविण ॥ ६२ ॥ नाना शास्त्रें पढीनला । देव तीर्थें बहु फिरला । आपणा न जाणतां शिणला । मुक्त न होय निश्चयें ॥ ६३ ॥ वधू सर्व अलंकार करी । नाहीं कुंकू गळसरी । तरी ते शोभा नसे खरी । विटंबनाचि जाणिजे ॥ ६४ ॥ अलंकार कांहींचि नसतां । एक कुंकूंचि भाळीं असतां । तेणें ते शोभे पतिव्रता । श्रेष्ठ मानिती सुवासिनी ॥ ६५ ॥ एक आत्मज्ञान जाणावें । तरीच सफळ होय आघवें । अनुभवावांचोनि न होय ठावें । निजात्मस्वरूप आपुलें ॥ ६६ ॥ ॥ श्लोक ॥ ज्ञानमात्रेण मुच्यंते नानासाधनवर्जिताः । साक्षात्कारपरं ज्ञानं प्राप्यते गुरुराजतः ॥ २० ॥ टीका–गुरुगम्य ज्ञान झालिया । सर्व साधनें लागती पाया । साक्षात्कार पावोनियां । प्राप्त होय निजतत्त्व ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ शाश्वतानंदशांतत्वं पूर्णरूपस्वरूपकं । तुष्टत्वं चाचलत्वं च षडैश्वर्यादि प्राप्यते ॥ २१ ॥ टीका–शाश्वतानंद शांत । पूर्णस्वरूप पावत । अखंड संतुष्ट असत । षडैश्वर्य प्राप्त

होय ॥ ६८ ॥ तो वेगळेपणें नुरे । थेंबुटा सागरीं जैसा विरे । तोचि तो होऊनि सरे । आत्म-
सिंधु ॥ ६९ ॥ सूर्य दुसरा न होय । प्रकाशीं पाहतां एकचि सोय । आत्मत्वीं एकपणाहि न
साहे । तेथें दुजें कोण उरे ॥ ७० ॥ मनासि नाहीं मनपण । तेथें दुजें उरे कोण । उरणें न
उरणें ग्रासून । तेंचि तें उरतसे ॥ ७१ ॥ जेथें आठव ना विसर । निद्रा ना जागर । ऐसा
जो का असे विचार । तेंचि तें जाणिजे ॥ ७२ ॥ षडैश्वर ह्मणणें । हें तों मूळमायेचें करणें
सत्तारुप होऊनि असणें । आत्मलीलें ॥ ७३ ॥ आकाशासी सांधा नाहीं । तैसें आत्मत्वीं
असे पाहीं । घटमठादि उपाधि जरी कांहीं । तरी तें पाहतां तेंचि असे ॥ ७४ ॥ बहु काय
७ बोलूं बोलणें । मौनेंचि जाणिजे तेथील खुण । पुढील कौतुक असे सांगणें । मुनिऋषि संवाद
हा ॥ ७५ ॥ ॥ श्लोक ॥ ऋषिसिद्ध उवाच ॥ जलस्नानाद्बहिः शुद्धिरंताः शुद्धि कथं
भवेत् । योगिनां च कुतः स्नानं कृपालो कपिलोच्यतां ॥ २२ ॥ टीका—ऋषिसिद्ध पुसे
मुनीप्रति । स्वामी कृपा केली परमप्रीती । सांगीतली शास्त्रसाधनव्युत्पत्ती । निजात्मज्ञानेंवीण
जी ॥ ७६ ॥ योगियांचें कैसें स्नान । सांगिजे मजला कृपा करून । जेणें शुद्ध होय अंतःकरण ।
भ्रांतिमळ नासे जेणें ॥ ७७ ॥ कपिल ह्मणती ऋषिसिद्धासी । एको सांगों स्नानविधीसी ।

जेणें संतुष्ट होइजे मनासी । खूण जाणोनिया ॥ ७८ ॥ देहीं नाडी ज्या होती । त्याचि तीर्थें होऊनि असती । सांगों ऐका त्याची रीती । खूणमात्र जाणिजे ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ कपिल उवाच ॥ वामनासापुटे ईडा पुटे दक्षे च पिंगला । गांधारी वामकर्णे च हस्तिनी दक्षिणे तथा ॥ २३ ॥ टीका—वामनासापुटीं इडा असे । दक्षिणपुटीं पिंगला वसे । गांधारी वामकर्णी प्रवेशे । हस्तिनी कर्णी दक्षिणी ॥ ८० ॥ ॥ श्लोक ॥ सुषुम्ना चांगदा प्रोक्ता जिव्हाग्रे च सरस्वती । वामनेत्रे चक्षुषातु दक्षिणेऽलंबुषा मता ॥ २४ ॥ टीका—वामनेत्रीं चक्षुषा जाण । अलंबुषा चक्षु दक्षिण । सुषुम्ना अंगदा प्रमाण । जिव्हाग्रीं सरस्वती वसे ॥ ८१ ॥ ॥ श्लोक ॥ कुहुर्गुदस्था संप्रोक्ता शंखिनी लिंगसंस्थिता । मूत्रद्वारे वारुणी स्यात् सर्वांगे च पयस्विनी ॥ २५ ॥ टीका—कुहू नाडी गुदस्थानीं । लिंगस्थानीं असे शंखिनी । सर्वी वसे पयस्विनी । वारुणी मूत्रद्वारीं वसे ॥ ८२ ॥ ॥ श्लोक ॥ नाड्यो द्वादश संप्रोक्ताः शरीरे सुव्यवस्थिताः । व्याप्नुवंति दशद्वारं चराचरनियामकाः ॥ २६ ॥ टीका—द्वादश नाडी मुख्य असती । सव शरीरीं व्यापक होती । दशद्वारीं विचरती । चराचरीं जाणिजे ॥ ८३ ॥ ॥ श्लोक ॥ इडा भागीरथी गंगा पिंगला यमुना नदी । सुषुम्ना गं-

डकी प्रोक्ता कृष्णावेण्यौ सरस्वती ॥ २७ ॥ टीका–इडा तेचि भागीरथी । पिंगला यमुना ह्मणती । सुषुम्ना गंडकी विख्याती । सरस्वती कृष्णावेण्यादी ॥ ८४ ॥ ॥ श्लोक ॥ कुहूश्च नर्मदा ज्ञेया तापीस्याच्छंखिनी तथा । गांधारी चापि कावेरी वारुणी गौतमी तथा ॥ २८ ॥ टीका–कुहू तेचि नर्मदा जाण । तापी शंखिनी प्रमाण । गांधारी कावेरी नामाभिधान । वारुणी तेचि गौतमी ॥ ८५ ॥ ॥ श्लोक ॥ ताम्रपर्णी सुषानाडी सिंधुर्ज्ञेया च हस्तिनी । गोमती लंबुषा चैव पूर्णा पूर्णपयस्विनी ॥ २९ ॥ टीका–सुषा नाडी ताम्रपर्णी । सिंधुनदी ते हस्तिनी । पूर्णा पूर्णपयस्विनी । लंबुषा गोमती जाणिजे ॥ ८६ ॥ ॥ श्लोक ॥ इति नाडी नदी प्रोक्ता शरीरे वर्तते सदा । पवनं च तुरीयंच सर्वतः स्नानमुच्यते ॥३०॥ टीका–ऐशा नाडी नदी होती । शरीरीं सर्वदां वर्तती । साक्षी तूर्या पवनगती । स्नान कीजे ऊर्ध्वपंथें ॥८७॥ योगपंथें चालतां । कळेल तेथील योग्यता । अनुभवेंवीण व्यवस्था । नकळे जाण कदा काळीं ॥ ॥ ८८ ॥ मन पवनाचे मिळणीं । होय सुखाची परम धणी । तूर्या होउनी साक्षिणी । स्वानंदरती भोगिती ॥ ८९ ॥ हा जाणिजे मनपवनखेळ । जो स्वानंदसुखाचा कल्होळ । सच्चिदानंद केवळ । भोग जाणिजे तेथींचा ॥ ९० ॥ चंद्रसूर्या बुजावणी । मग क्रीडती उन्मनी ।

50171

अंतर बाह्य व्यापूनी । वस्तु दिसे सर्वही ॥ ९१ ॥ तयासी सर्व तपें घडलीं । सकळ तीर्थीं स्नानें केलीं । व्रतें तयासी सर्व जाहलीं । राजयोगी समर्थ तो ॥ ९२ ॥ तूर्या भोगलक्षण । ऐकिजे तयाची खूण । जेणें होय समाधान । गुरुगम्य जाणोनी ॥ ९३ ॥ **॥ श्लोक ॥ गंगायमुनयोर्मध्ये बालरंडां तपस्विनीं । बलात्कारेण गृण्हीयात्तद्विष्णोः परमं पदं ॥ ३१ ॥** ॥ टीका—गंगायमुनेमध्यें नारी । भ्रतारेंविण असे सुंदरी । बलात्कारें जो भोग करी । तो पावे विष्णुपदा ॥ ९४ ॥ हें जाणती अनुभवी । वसती जे निरंजनगांवीं । समर्थ राजयोगी गोसावी । आत्मप्रवीण जे ॥९५॥ हे असे योगखूण । न कळे अभ्यासावांचून । सांगिजेल स्नानाचें लक्षण । कोणकोणा प्रकारींचें ॥ ९६ ॥ **॥ श्लोक ॥ जलस्नानं मलत्यागि भस्मस्नानाद्बहिः शुचिः । मंत्रस्नानाच्छुचिश्चान्तर्ज्ञानस्नानात्परं पदं ॥ ३२ ॥** टीका—जळस्नानें मळ जाय । भस्मस्नानें बहिःशुचि होय । अंतरशुचि मंत्र पाहे । श्रुति साक्ष बोलती ॥ ९७ ॥ ज्ञानीं स्नान करणें । तेंचि कैवल्यपद पावणें । सर्व तीर्थींचीं स्नानें । त्यांत येती ॥ ९८ ॥ गंगासागरादि संगम । तेथें पावती विश्राम । सकळांचें निजधाम । ज्ञान होय जाण हें ॥ ९९ ॥ ज्ञानगंगेसि जे नाहती । त्यांसि नाहीं पुनरावृत्ती । धन्य धन्य तेंचि होती । ज-

न्मोनियां संसारीं ॥ स्वरूपजळीं मन बुडालें । प्रकाशघन दृष्टीशीं देखिलें । तेंचि तयासी स्नान झालें । आत्मतीर्थीं जाणिजे ॥ १०१ ॥ स्नान होतां तत्क्षणीं । जन्ममरणाची होय धुणी । ऐशीच आहे कौतुककरणी । महिमा जाण तेथील ॥ १०२ ॥ आर्द्रतेवांचूनि जळ । भरलें असे प्रबळ । आकाश जैसें पुष्कळ । व्यापक जाण असतसे ॥ १०३ ॥ शरीर तेथें नाहीं भिजत । पाठीं पोटीं उपेलत । ऐसे जे कां हें जाणत । धन्य तेची त्रिभुवनीं ॥ १०४ ॥ बहुत फेरे फिरोनि श्रम । नरदेह पर्वकाळ आला उत्तम । जाणोनि जो आत्मसंगम । स्नान करी निजउगमीं ॥ १०५ ॥ लक्ष हेचि दक्षणा । आत्माराम ब्राह्मणा । देऊनियां समाधाना । आपीं आपण होइजे ॥ १०६ ॥ अहंदेह तर्पण । शुद्धक्रियें करूनि आचमन । आत्मारामीं पूजन । सोहंमंत्रें करावें ॥ १०७ ॥ मन हेंचि तुळशीदळ । सुमन शुद्ध परिमळ । अर्पूनियां निर्मळ । ब्रह्मरूपीं समर्पण ॥ १०८ ॥ तेथें पूजन गंगेचें कौतुक । हरपोनि जाय त्रिपुटी देख । ऐसें ज्ञानगंगेचें कौतुक । तद्रूपता करितसे ॥ १०९ ॥ **॥ श्लोक ॥ अंतःस्नानविहीनस्य बहिः-स्नानेन किं फलं । मलयाचलसंभूतो न वेणुश्चंदनायते ॥ ३३ ॥** टीका—ज्ञानस्नानावांचून । वरकड काय प्रयोजन । वेदशास्त्र मानुनी प्रमाण । पूर्णगर्भ जाणिजे ॥ ११० ॥ व्यु-

त्पत्ती करूनी ज्ञान होय । तरी कां धरावे सद्गुरुपाय । गुरुकृपेविण निजात्म सोय । नकळे जाण सर्वथा ॥ १११ ॥ अंतरीं न घेइजे सुवास । असूनियां जवळपास । वेळूस चंदनाचा वास । लागेल काय सांग पां ॥ ११२ ॥ पाषाण उदकीं घातला । अंतरीं न जाय भिजला । बहुकाळ जरी असला । तरी तोचि तो ॥ ११३ ॥ महाकल्पाच्या अंतीं । तेहि स्वरूपीं मिळती । परी न चुके पुनरावृत्ती । क्लेश बहु भोगीत ॥ ११४ ॥ **॥ श्लोक ॥ मंत्रस्नानाच्छुद्धचित्तः सचांतःशुद्धिमाप्नुयात् । अंतर्बहिश्च शुद्ध्यर्थं ज्ञानस्नानं च मोक्षदं ॥ ३४ ॥** टीका—मंत्रस्नानें मनशुद्धि होत । अंतर्बाह्य शुद्धज्ञान करित । नाहीं त्याहुनी समर्थ । मोक्षपददायक जें ॥ ११५ ॥ अग्नीस नाहीं पोळणेंपण । तैसें ज्ञानियासी नसे पापपुण्य । दोहींचेही भक्षीं असे होऊन । अलिप्तपण जाणिजे ॥ ११६ ॥ सूर्य जैसा घटांतरीं । एकचि वसे सर्वांतरीं । तैसा व्यापक चराचरीं । एकात्मता जाणोनी ॥ ११७ ॥ **॥ श्लोक ॥ वटबीजेऽपि सूक्ष्मेऽपि मायया गुणयुक्तया । यदास्ति सर्वतो वृक्षः कुत आयाति तद्वद ॥ ३५ ॥** टीका—हे सर्व मायेचे कूसरी । वटबीजाचियेपरी । विस्तार हा सर्व करी । सत्य जाण त्या निश्चयें ॥ ११८ ॥ सागरीं जैशा लहरी । उठती त्याचिया त्याजवरी । ऐशी प्रतीति जया अंतरीं । ईश्वर जाण

तोचि तो ॥ ११९ ॥ ॥ श्लोक ॥ तथैवाभ्यंतरे शुद्धे बहिः शुध्यंति तत्क्षणात् । बीजवृक्षादि न्यायेन सर्वत्रैक्याच्छुचिर्भवेत् ॥ ३६ ॥ टीका–गुरुकृपा जरी होय । तत्क्षणीं अज्ञान जाय । सर्वत्र तो सुलभ पाहे । पवित्र होय निर्मळ ॥ १२० ॥ ॥श्लोक॥ नैकतत्त्वस्वरूपं चेदुत्पन्नं ज्ञानमञ्जति । अहं ममेति चाज्ञानभ्रमतो ह भ्रमेद्वृथा ॥ ३७ ॥ टीका–आत्मज्ञानावांचून । सर्व कर्म निरर्थक जाण । मृगजळीं मृग पावे शीण । तैसें होय ॥ १२१ ॥ स्वरूपीं ऐक्य ना होय । अन्यथा ज्ञानगर्वें जाय । अहंपणें भ्रांती ठाय । घेऊनियां भ्रमतसे ॥ १२२ ॥ ॥श्लोक॥ दुर्लभो विषयत्यागी दुर्लभं तत्त्वदर्शनं । दुर्लभा सहजावस्था सद्गुरोः करुणां विना ॥ ३८ ॥ टीका–दुर्लभ तो विषयत्यागी । दुर्लभ तो तत्त्व जाणता योगी । दुर्लभ तो सहजावस्था भोगी । उन्मनीरमण होऊनियां ॥ १२३ ॥ गुरुकृपेवीणें । निजात्मखूण न बाणे । धन्य तयांचें जिणें । गुरुकृपा होय ज्यांसी ॥ १२४ ॥ ॥ श्लोक ॥ ऋषिसिद्ध उवाच । कथं भगवतो ज्ञानं शुद्धमत्यंतमुद्भवेत् । तत्रोपायं मुने ब्रूहि मयि तेऽनुग्रहो यदि ॥ ३९ ॥ टीका–ऋषिसिद्ध म्हणे मुनिराया । स्वामी समर्था गुरु आत्मया । सकळ जीवांच्या विसाविया । विश्रामधामा ॥ १२५ ॥ शुद्धज्ञान होय जेणें । परमपद प्राप्त होणें । ऐसें बोलिजे कृपावचन । स्वामी उदारा चिद्घना ॥ १२६ ॥ ॥ श्लोक ॥

कपिल उवाच। जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यादिप्रपंचो यत्प्रकाशितः। तद्ब्रह्माहमिति ज्ञात्वा सर्वबंधात्प्रमुच्यते ॥ ४० ॥ टीका—मुनी ह्मणती शिष्यटिळका । प्रश्न केला बहु नेटका । जेणें परोपकार होय लोकां । विश्वासें फळ पावती ॥ १२७ ॥ जागृती स्वप्न सुषुप्ती अवस्था । सर्व देहीं ज्याची प्रकाशसत्ता । अहं ब्रह्म जाणतां तत्त्वतां । भवबंधापासूनि मुक्त होय ॥ १२८ ॥ ॥ श्लोक ॥ त्रिषु धामसु यो भोगो भोक्ता भोग्यंच यद्भवेत् । तेभ्यो विलक्षणः साक्षी चिन्मात्रोऽहं सदाशिवः ॥ ४१ ॥ टीका—त्रिपुटीं व्यापक होत जो हा । भोग भोगुनी उरतसे पहा । तोचि चिन्मात्र साक्षी देहा । होऊनियां वर्ततसे ॥ १२९ ॥ आकाश व्यापक सर्वी असे । घटमठादि सर्वी प्रकाशे । लिप्त न होय असोनि सरिसें । साक्षी होऊनी वर्तत ॥ १३० ॥ घटाकाश मठाकाश ह्मणती । उपाधियोगें नामें पडती । घट जाला भंगला ह्मणती । आकाश जैसें तैसेंचि ॥ १३१ ॥ घट जन्मतां नाहीं घातलें । भंगा जातां न होय नासलें । आकाशीं आकाश संचलें । आहे तैसेंचि असतसे ॥ १३२ ॥ ॥ श्लोक ॥ एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा । सर्वाध्यक्षःसर्वभूताधिवासःसाक्षी चेता केवलो निर्गुणश्च ॥४२॥ टीका—एकचि आत्मा सर्वांठायीं । सर्वव्यापक सर्वांदेहीं । असोनियां अलिप्त पाहीं ।

निर्गुण निरंजन जो ॥१३३॥ मायेनें अपूर्व केलें । नरदेह उत्तम निर्मिलें । आत्मरूप बिंबलें । निजात्मसत्तें ॥१३४॥ बहु कळा निर्मिल्या । नाडी कोठड्या उदंड केल्या । त्रिगुणशक्ती विस्तारल्या । देहामाजीं ॥ १३५ ॥ ॥ श्लोक ॥ पिंगला द्वादशादित्या इडेंदुः षोडशांशभाक् । पंचान्तःकरणानि स्युः प्राणानां पंचकं तथा ॥ ४३ ॥ ज्ञानेंद्रियाणि पंचैव पंचकर्मेंद्रियाणि वै । विषयाः पंच वै प्रोक्ता विकल्पानांच पंचकं ॥ ४४ ॥ विकाराः षण्मतास्तेन देहस्यात्मप्रवर्तनं । एवं गुणास्तु सर्वत्र कलाकाष्ठाचतुर्थकं ॥ ४५ ॥ टीका–पिंगला नाडी द्वादशकळा । तोचि सूर्य होय सोज्वळा । इडा जाण कळा सोळा । तोचि होय चंद्रमा ॥१३६॥ अंतःकरणपंचक प्राणपंचक । ज्ञानकर्मेंद्रियदशक । विषयपंच विकल्पपंचक । षड्विकार निर्मिले ॥ १३७ ॥ ऐसे गुण सर्वत्र केले । जीवमात्रीं असती संचले । त्यांत नर देह उत्तम निर्मिलें । अभ्यासें कळे निजतत्त्व ॥ १३८ ॥ येथें एक असे आशंका । स्थावरा पाषाणादिकां । तत्त्वें इंद्रियें पंचका । कोठें असती ॥ १३९ ॥ तरी एक आत्मा जेथें असे । तेथें सर्व सत्ता वसे । कोठें कैसें कोठें कैसें । होऊनियां वर्ततसे ॥ १४० ॥ नरदेहीं ज्ञानकळा घातली । आपआपणाशीं ओळखी केली । अभ्यासावांचूनि साधिली । न होय जाण ज्ञानकळा ॥१४१॥

॥ श्लोक ॥ इक्षुदंडे शर्करा च श्रीखंडे च सुवासितं । क्षीरे यथाऽऽज्यं प्राप्तव्यं तिले तैलं तथाऽऽत्मनां ॥ ४६ ॥ टीका–इक्षुदंडाची शर्करा करितां । बहुत यत्नें येतसे हाता । चंदन श्रमूनी उगाळितां । सुवास उत्तम येतसे ॥ १४२ ॥ दुग्धीं विरजण घालिजे । त्यातेंचि दहीं असें ह्मणिजे । तेंचि घुसळितां नवनीत होईजे । नवनीतसार घृत जाण ॥ १४३ ॥ तीळ घाणियां घालितां । वैराग्यलाटीं मर्दितां । तैल निघे तत्त्वतां । सार जें कां ॥ १४४ ॥ तैसा अभ्यास करावा । विकल्प आळस दवडावा । आत्माराम ओळखावा । निजदृष्टीं ॥ १४५ ॥ अभ्यासपदें चालिजे । तरीच मोक्षगांवा पाविजे । पाउलां पाऊलीं जातां सहजें । होय आटोपिला ॥ १४६ ॥ अभ्यासावांचूनि निश्चित । न होय आत्मधन प्राप्त । पार्थासी सांगे भगवंत । श्रीगीतेमाजीं ॥ १४७ ॥ ॥ श्लोक ॥ अभ्यासेन विनाऽऽप्राप्यो गुरुवाक्येन निश्चितः । स्वात्मा च हृदि पद्मे हि विज्ञेयो ज्योतिरात्मकः ॥ ४७ ॥ टीका–गुरुवचनीं निश्चय धरूनी । अष्टांगहृदयीं जाणोनी । ज्योतिरूप पाहूनि नयनीं । निजात्मछंदें असिजे ॥ १४८ ॥ अष्टपद्माचा विचार । ऐकिजे सांगेन सविस्तर । सूक्ष्महृदय जें सार । त्यांतचि आणिक ॥१४९॥ पद्में आठ असती जाण । त्यांत नववें सूक्ष्म लहान । समर्थ बोलती कपिलवचन । ऐका स-

ज्ञान श्रोते हो ॥ १५० ॥ श्लोक ॥ प्रथमं तु शिरःपद्मं नेत्रपद्मं द्वितीयकं । तृतीयं कर्ण-
पद्मं च मुखपद्मं चतुर्थकं ॥ ४८ ॥ टीका—प्रथम तें शिरपद्म । द्वितीय होय नेत्रपद्म । तृती-
य तें कर्णपद्म । मुखपद्म चतुर्थ तें ॥ १५१ ॥ श्लोक ॥ पंचमं करपद्मं वै षष्ठं चरणपद्मकं ।
सप्तमं नाभिपद्मं च हृत्पद्मं चाष्टमं स्मृतं ॥ ४९ ॥ टीका—पांचवें करपद्म जाणिजे । सहावें
चरणकमल बोलिजे । सातवें नाभीकमल बोलिजे । आठवें तें हृदयपद्म ॥ १५२ ॥ श्लोक ॥
अष्टपद्मात्परं ब्रह्म सूक्ष्मं हृदयपंकजं । चक्रातीतं परस्थानं सूक्ष्ममोंकारसंज्ञितं ॥ ५० ॥
टीका—आठ पद्मांहूनि परम पद्म । सूक्ष्म जें हृदयविश्राम । चक्रातीत असे सुगम ॐकार मूळ-
बीज जें ॥ १५३ ॥ श्लोक ॥ हृत्पद्मकर्णिकामध्ये शुद्धविज्ञानतत्परं । अंगुष्ठमात्रममलं
पश्यंत्येकांतमीश्वरं ॥ ५१ ॥ टीका—तयामध्यें निरंतर । शुद्ध विज्ञान तत्पर । अंगुष्ठप्रमाण
विचार । रूप ईश्वर लक्षिजे ॥ १५४ ॥ श्लोक ॥ रात्रौ स्थूलं च विश्रांतं मध्ये दीपस्य
स्थापनं । सार्धहस्तत्रिकच्छेद्यं तत्र तिष्ठेच्च लोकयन् ॥ ५२ ॥ टीका—रात्रीं स्थूळ विश्रांत-
होत औट हस्त प्रमाण युक्त । मध्यें दीप आत्मज्योत । साक्षी होउनी वर्तत जें ॥ १५५ ॥
॥ श्लोक ॥ लोक्यमानस्य दीपस्य मध्ये नीलं च दृश्यते । नीलमध्ये तथा पश्येद्यो वै

द्रष्टा स उत्तमः ॥ ५३ ॥ टीका—तया दीपावलोकनेंकरून । मध्यें नील बिंदु दिसत जाण । जरी तैसा दिसों येईल पूर्ण । देखणा तोचि उत्तम ॥ १५६ ॥ कीजे तया अवलोकन । तेंचि जाण निजस्थान । पाहिजे नयनीं नयन । लावूनियां स्थिरत्वें ॥ १५७ ॥ श्लोक ॥ तत्रैव पश्यतो यस्य निमेषोन्मेषवर्जितं । यदा दृष्टिः स्थिरा भूयात् सोऽतर्लक्षी तदोच्यते ॥ ५४ ॥ टीका—तेथें स्थिर करोनि चित्त । निमेषउन्मेषवर्जित । दृष्टि तेथें स्थिर होत । अंतर्लक्ष्य तया ह्मणिजे ॥ १५८ ॥ श्लोक ॥ अंतर्लक्ष्यंविहीनस्य बहिर्लक्ष्यं निरर्थकं । लक्ष्यालक्ष्यस्य वै लक्ष्यलक्षितं स्वयमात्मनि ॥ ५५ ॥ टीका—अंतर्लक्ष्यावांचून । बहिर्लक्ष्य किमर्थ कारण । अलक्ष्यलक्षी लक्ष्य लक्षून । निजात्मदृष्टी जाणिजे ॥ १५९ ॥ येथें मन पाहिजे स्थिर । तरीच हा साधेल विचार । मनकल्पना अनिवार । आवरितां न आवरती ॥ १६० ॥ श्लोक ॥ यथा वारि मरुद्भूतं नानाकारं । विलोक्यते तथैव कल्पना यस्य चिद्ब्रह्माणि स मुह्यति ॥ ५६ ॥ टीका—उदक वायूनें हालत । नाना तरंग तेथें उठत । तैशा कल्पना मनःकल्पित । अनेक प्रकारें ॥ १६१ ॥ चित्त स्थिर न होय । न करितां उपाय । अधिकाधिक होत जाय । संकल्प विकल्प जाण पां ॥ १६२ ॥ तरी यासी एकचि उपाय । अंतरीं आठवावे गुरुपाय । तरीच हें

स्थिर होय । जरी गुरु कृपा करी ॥ १६३ ॥ लय विक्षेप बहुत होती । नेत्रपातीं चंचल हालती । अंधकार दिसे नेत्रांप्रती । मन होय चंचल ॥ १६४ ॥ साधकें तेथें धरून धीर । अभ्यास कीजे निरंतर । होईल जाण साक्षात्कार । मुक्त होइजे तत्क्षणीं ॥ ६५ ॥ श्लोक ॥

दृष्टिद्वयसमत्वेन गुरुलब्धेन यो युतः । ज्ञातव्यस्तेन वै सूर्यश्चित्तं स्थिरमिदं यतः ॥ ५७ ॥

टीका—दृष्टिद्वय करूनि एक । गुरु नेत्रीं दावील कौतुक । पाहतां तूर्या प्रकाशक । मन स्थिर सहज होय ॥ १६६ ॥ येऱ्हवीं नाना करितां साधनें । मन स्थिर नव्हे कवणें गुणें । तीर्थें तपें उपोषणें । व्रतें बहु केलीं जरी ॥ १६७ ॥ अनुष्ठानें मोक्ष होय । तरी कां सेवावे गुरुपाय । त्याचे कृपेवांचून निजात्मसोय । न होय जाण कल्पांतीं ॥ १६८ ॥ श्लोक ॥ **मीनः स्नानरतः फणी पवनभूड्मेषस्तु पर्णाशनो । नैराश्यं ह्यपि चातकः प्रतिदिने शेते बिले मूषकः । भस्मोद्धूलितविग्रहः खलु खरो ध्यानानुरक्तो बकः सर्वेषां फलमेव नाऽस्ति सकलं ज्ञानप्रधानं तपः ॥ ५८ ॥**

टीका—स्नानें जरी मोक्ष होय । तरी जळीं मीन नसतात काय । सर्प पवन भक्षूनि राहे । मेष पर्णें खाय सदा ॥ १६९ ॥ मूषक असती एकांतविवरीं बक विरक्त ध्यान धरी । गर्दभ लोळे राखेभीतरीं । चातक असे निरासिक ॥ १७० ॥

नानाउदकें स्नानें केलीं । वायुपर्णादि भक्षिलीं । एकांतस्थानें वसविलीं । ध्यान धरुनी ॥ १७१ ॥ अंगीं राख उधळिली । उपोषणें बहुत केलीं । आत्मज्ञानाविणें व्यर्थ झालीं । अभ्रें पोकळ गगनीं जैशी ॥ १७२ ॥ ज्ञानायेवढें तप । जें पावन परात्पररूप । सायुज्य-मुक्तीचें स्वरूप । परम पवित्र धाम जें ॥ १७३ ॥ आपीं आपणा पाहतां । त्रिभुवनीं न-सांपडे पंडितां । ठक पडलें जवळी असतां । नवल कैसें ॥ १७४ ॥ आपली आपणा भेटी होय । तरीच ज्ञानाची पावे सोय । आणिक करितां उपाय । न होय गुरुकृपेविण ॥ १७५ ॥ जें 'अ' काराचें स्थान । जें जीवाच जीवन । जें पूर्ण चैतन्यघन । मोक्ष निजधाम ॥ १७६ ॥ जें स्वरूप अनंत अपार । व्यापक जें चराचर । वेद श्रुती करिती विचार । नेति नेति म्हणूनियां ॥ १७७ ॥ ज्ञान ऐसें बोलणें । शब्दीं बोलों जातां उणें । ज्ञान अज्ञान हारपणें । ऐसें कांहीं असत जें ॥ १७८ ॥ ज्ञान ऐसें बोलावें । तरी अज्ञानें कोठें रहावें । द्वैतची हारपे आघवें । तेथें अवघें वोसरे ॥१७९॥ जेथें आनंदही विरे । मी कोण हें न स्मरे । स्मरण विस्मरण स्मरे । तेंचि तें जाणिजे ॥ १८० ॥ जें उघडें ना झांकलें । जें शून्य ना उजळलें जें स्थूळ ना धाकुलें । सांगिजे कैसें ॥ १८१ ॥ उंच ना जें खुजट । तयासि नाहीं पाठ पोट ।

आवघें सभर घनदाट ॥ अणुरेणुहूनि असे ॥ १८२ ॥ तेंचि तें किती बोलावें बोलें । परी शब्दींचि खुणें जाणविलें । श्लोकपद असे अंतरलें । मार्ग ऐका सांगिजेति ॥ १८३ ॥

॥ श्लोक ॥ मार्गं मानुष्यमीनं च त्रिषु लोकेषु दुर्लभं । यः पठेत्सततं भक्त्या स मुक्तो भवसागरात् ॥ ५९ ॥ टीका—मनुष्यमार्ग आणि मीन । त्रैलोक्यीं दुर्लभ जाण । नित्य भक्ति-युक्त करितां साधन । भवबंधापासूनि मुक्त होती ॥ १८४ ॥ पिपीलिका कपी विहंगम । हेही पथ चालती सुगम । मतांतरी बोलती परम । मार्ग पुरातन असती हे ॥ १८५ ॥ मोक्षपथासी जावया । वाटा सर्व निर्मिलिया । साधकें सामर्थें आपुलिया । येईल तैसें अभ्यासिजे ॥ १८६ ॥ मुख्य येथें निश्चय कारण । भावयुक्त भक्तीचें लक्षण । तरीच होय साधन । पंथाचें ययां ॥ १८७ ॥ भक्तीं चालतां इये पंथीं । जन्ममरणाची चुके गुंती । येणें न होय पुनरावृत्ती । भवदुःख भोगावया ॥ १८८ ॥ नवविध भक्तीचें लक्षण । मागें केलेंसे कथन । मुख्य ज्ञानीं भक्ति कारण । भगवान् श्रीगीतेंत बोलती ॥ १८९ ॥ ज्ञानियांचें लक्षण । जेथें हारपे जीव-शिवपण । ते एक जाणती खूण । आत्मानुभवी जे ॥ १९० ॥ आत्मत्वीं जडे मन । तेंचि सर्वभक्तीचें लक्षण । तोचि एक मुक्त जाण । जन्मूनियां संसारीं ॥ १९१ ॥ ॐकाराचें

रूप । अनुभवी जाणिजे स्वरूप । त्रिगुणात्मक होऊनि अमुप । तेजोमय प्रकाशे ॥ १९२ ॥
॥ श्लोक ॥ अष्टांगं च चतुष्पादं त्रिस्थानं पंच देवताः । ॐकारं यो न जानाति ब्रह्म-
विष्णुशिवात्मकं ॥ ६० ॥ टीका—अष्टांग चतुष्पाद होत । त्रिस्थानें पंच दैवत । ॐकार-
रूप न जाणत । ब्रह्मविष्णुशिवात्मक जो ॥ १९३ ॥ श्लोक । ॐकारं पितृरूपेण गायत्रीं
मातरं तथा । पितरौ यो न जानाति स विप्रश्चान्यवीर्यजः ॥ ६१ ॥ टीका—ॐकार पितृ-
रूप असे जाण । गायत्री मातृरूप पवित्र पावन । पिता माता न जाणता ब्राह्मण । न होय
तो सूर्यवीर्य ॥ १९४ ॥ श्लोक । इदं तीर्थमिदं तीर्थं भ्रमंति तामसा जनाः । आत्मतीर्थं
न जानंति कथं मोक्षः शृणु प्रभो ॥ ६२ ॥ टीका—नानातीर्थें फिरती । तामसां नव्हे
विश्रांती । आत्मतीर्थ देहीं न जाणती । मोक्ष होईल कैसेनी ॥ १९५ ॥ श्लोक ॥ ज्ञानं
भागीरथी गंगा तत्र विश्राम्यतां मनः । प्रातःप्रभृति संध्यातं संध्यांतः प्रातरंतरं ॥ ६३ ॥
यत्करोमि जगन्नाथ तदस्तु मम पूजनं ॥ ६४ ॥ टीका—काया क्षेत्र काशीपुरी । आत्मा
विश्वेश्वर हरी । ज्ञानगंगा भागीरथी सुंदरी । मना विश्रांति करी तेथें ॥ १९६ ॥ प्रातःकाळा-
पासूनि सायांत । सायंकाळापासूनि प्रात । यत्करोमी जगन्नाथ । होतसे मम पुजन ॥ १९७ ॥

जाणतां याचें वर्म । सहज ब्रह्मार्पण होय कर्म । हृदयस्थ असे आत्माराम । जाणतां खूण त्याची हे ॥ १९८ ॥ कर्माधीन शरीर । चालत असे तदनुसार । वटपत्रन्यायें विचार । वायुवेगें उडे जैसें ॥ १९९ ॥ ज्ञानियाचें तैसें देहें । असोनि तेथें कांहींच नोहे । अलिप्तपणें तेथें राहे ॥ असोनियां संसारीं ॥ २०० ॥ श्लोक ॥ **मनश्चित्ततुरंगाभ्यां शरीरं स्यंदनायते ।**
कालचक्रेण वै याति पूर्वकर्म च सारथिः ॥६५॥ टीका-मन चित्त तुरंग दोन्ही । शरीर हें रथ जाणोनि । काळचक्र फिरतसे निशिदिनीं । पूर्वकर्म सारथी ॥ २०१ ॥ पूर्वकर्मानुसार । होतसे बुद्धीचा विचार । अनेक जन्मसंस्कार । तरीच होय आत्मप्राप्ति ॥ २०२ ॥ श्लोक ॥
यद्दिने पतितो बिंदुर्मातृगर्भे सुनिश्चितं । तद्दिने लिखितं सर्वं हानिमृत्युसुखोत्तरं ॥६६॥
इति श्रीपद्मपुराणे सिद्धांतसारे कपिलऋषिसंवादे राजराजेश्वरयोगकथनं नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ टीका—मातृगर्भाच्या ठायीं । बिंदु पडला जे समयीं । तद्दिनीं अक्षर घातलेंसे पाहीं । हानि मृत्यु सुखोत्तम ॥ २०३ ॥ सुख सत्वगुण चतुर्थ हा । तोचि अध्याय चतुर्थ हा । समाप्त जाहला असे पहा । बोधरूप प्रत्यक्ष जो ॥ २०४ ॥ पुढें पंचम निरूपण । चालिलें असे सुलक्षण । पांचवा जो निर्गुण । नाहीं उपमा द्यावया ॥ २०५ ॥ प्रमेय जाणोनि श्लोकींचें । अर्थ

यथामति बोलिलों वाचें । न्यून पूर्ण पदपदांतराचें । समर्थ श्रोतीं सांभाळिजे ॥२०६॥ संस्कृतीं नाहीं ज्ञान । परी आत्मकथेची आवडी गहन । निमित्त टीकेचें करून । केली मनसमजाविशी ॥ २०७ ॥ श्रीगुरु माउली बाळकासी । बोल बोलवी आत्मसंतोषीं । जेणें संतोष होय मानसीं । आपुल्याचि ॥ २०८ ॥ इति श्रीकपिलगीताटीकायामध्यायश्चतुर्थः समाप्तः ॥ ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॐनमो गुरुरामचंद्रा । स्वरूपजीवनसमुद्रा । दिव्यप्रभा कोटिचंद्रा । उपमा नये योजितां ॥ १ ॥ पूर्णप्रताप स्वामींद्रा । हृदयविसांविया श्रीगुरु रुद्रा । लक्ष्यीं अलक्ष्यीं तुझी मुद्रा । निजनयनीं देखती ॥ २ ॥ आत्माराजयोगींद्रा ॥ हृदयभुवनैकनरेंद्रा । सकळकल्याणशुभभद्रा । तूंचि अससी आत्मया ॥ ३ ॥ भावदशरथवीर्यजन्मासी । ज्ञानभक्ति कौसल्येचे कुशीं । नवविधा त्याचि नवमासीं । उदरा येसी विदेही तूं ॥ ४ ॥ आत्मसिंहासनीं बैससी । निजात्मसोहाळे भोगिसी । सूर्यवंश प्रकाशराशी । प्रभा तुझी विश्व हें ॥ ५ ॥ सत्य वचन चालविशी । निरंजनवनाप्रति जाशी । राहूनियां पंचवटिकेसी । कौतुक दाखविशी आत्मिका ॥ ६ ॥ लक्ष्य तोचि लक्ष्मण । सुमित्र होय सुलक्षण । जाणोनियां अनुभवखूण । आपीं आपण संतोषिजे ॥ ७ ॥ भरत आणि शत्रुघ्न । तेचि रविशशी दिव्य मान । समत्वीं

असती मिळून । आत्मराशी ॥ ८ ॥ देह अयोध्यापुरीं अससी । एकछत्री राज्य करिसी । वसो-
नियां सर्वमानसीं । व्यापक होसी आत्मा तूं ॥ ९ ॥ तुझी जे परम दीप्ति । अर्धांगीं तेचि
सीता सती । विराट्स्वरूपा मूलप्रकृति । आदिमाया ॥ १० ॥ वायुसुत हनुमंत । तोचि
मनपवनांचा अंत । निज निजाचा विश्रांत । परमसखा ॥ ११ ॥ संत सज्जन अ-
वतार । तेचि असती सर्व वानर । तुझ्या स्वरूपीं निरंतर ॥ असती ऐक्यविचारें ॥ १२ ॥
ओढूनियां प्रणव धनु । छेदिसी अहंदेही रावणु । सायुज्यमुक्ति प्रकाशमानु । देउनी स्वरूपीं
मेळविसी ॥ १३ ॥ त्रिकूटाचळ घेउनी लंका । स्थापिसी बिभीषण आत्मसखा । भोगूनियां
आत्मसुखा । निज कौतुक दाखविसी ॥ १४ ॥ तो तूं हृदयस्थ आत्माराम । सद्गुरु होसी
परम विश्राम । वाचेसी बोलवूनी नाम । निजात्मकथन चालविसी ॥ १५ ॥ तुझे कृपेचें
ऐसें करणें । बोलविशी हें बोलणें । साधू जाणती ह्या खुणे । आत्मानुभवी जे ॥ १६ ॥ गुरूनें
आज्ञा दिधली । वाचे बोल निजात्मा बोली । जेणें होय वृत्ति संतोषली । आत्मिकांची
॥ १७ ॥ जो निर्गुण पांचवां । निजबीजाचा ठेवा । जेथूनि विश्व उद्भवा । विस्तारा जाय
॥ १८ ॥ जो परमामृतउदधी । जो आप आपणां सिद्धि । कामधेनु निधि । आत्मचिंतामणी

॥ १९ ॥ जो कल्पनातीत कल्पतरु । भवार्णवींचा तारु । परात्पर परमेश्वरु । विश्रामधाम ॥२०॥ सकळीं सकळांचें जीवन । योगियांचें ध्येय ध्यान । नयनाचा निज नयन । प्रत्यक्षाकार जो ॥ २१ ॥ जो बुद्धीचा होय बोधक । आत्मविलास करी कौतुक । बोलणें जेथें अलौकिक । अभिनव असे ॥ २२ ॥ जे हे मुक्तिमोतियांची खाणी । बोलों जातां तटस्थ वाणी । परमामृताची धणी । निजात्मकळा ॥ २३ ॥ पाहतां दिसे आत्मठसा आत्मदर्शनाचा आरसा । गुरुमुखें ओळखा कसा । आपणामाजीं ॥ २४ ॥ अध्यायाचें वर्णन । करावयास हेंचि कारण । जेथें पाहतां आत्मदर्शन । प्रत्यक्ष दिसे भाविकां ॥ २५ ॥ सिद्ध साधक संतोषती । आत्मिकांलागीं बहु प्रीती । गुरुगम्य जाणतां चित्तीं । परम सुख बाणतसे ॥ २६ ॥ मी तों केवळ मंदमति । न कळे वेदपुराणांची व्युत्पत्ति । गुरु बोलवी वचनोक्ति । तदाज्ञेनें बोलतसें ॥२७॥ पद पदांतर प्रमेय । करणें जाणिजे अनुभव सोय । व्युत्पत्ति वृथा कामा नये । अनुभवेंवीण ॥ २८ ॥ चतुर्थाध्यायीं कथन । बोलिलें असे निरूपण । एका अनुभवज्ञानेंविण । वृथा होती सर्वही ॥ २९ ॥ आतां काय बोलावें फार । जें हें साराचें सार । मुक्तमुमुक्षूंचें भांडार । असे जाण पंचमीं ॥ ३० ॥ द्वात्रयासि नाहीं उपमा । न कळे पार ज्याची सीमा ।

विश्वास धरी तो मोक्षधामा । तात्काळ पावे समर्थ जो ॥ ३१ ॥ श्रोते समर्थ साधुजन । अखंड जया आत्मचिंतन । कृपा करून घाल जरी अवधान । तरीच प्रमेय पिकेल ॥ ३२ ॥ वसंतसमयीं जैसी वल्ली । भारे दाटे प्रफुल्ली । फळोनियां स्वानंदफळीं । उल्हासे जगीं ॥ ३३ ॥ तैशी तुम्ही संत वसंत । घालितां कृपाजीवनामृत । उन्मेषवेली विस्तारा जात । अनुभव फळें पिकोनिया ॥ ३४ ॥ पंचमींचें वर्णन । करावया धैर्य न धरी मन । परंतु तुमचे कृपासामर्थ्यें करून । बोलवाल तैसें बोलिजेल ॥ ३५ ॥ ऐका मुनिऋषिसंवाद । जेणें होय परमानंद । जो परमामताचा स्वाद । चाखों जातां तन्मय ॥ ३६ ॥ जो परम प्रवीण बहुश्रुत । ज्ञानविज्ञानयुक्त । ऋषिसिद्ध परमभक्त । श्रीमुनीप्रती पुसतसे ॥ ३७ ॥

श्रीगणेशायनमः॥ सूत उवाच ॥ श्लोक ॥ प्रणम्य दंडवद्भूमौ स्तुत्वा चारुचरित्रकं । अर्चित्वा पादपद्मं च पुनः प्रश्नं करोति च ॥ १ ॥ टीका—चरणीं करूनि प्रणिपात । साष्टांग भूमीं घाली दंडवत । कर जोडोनि विनवित । नम्र होऊनि ॥३८॥ करूनि पादप्रक्षाळण । सद्भावें करी पूजा अर्चन । एकाग्र करूनि मन । वदनीं स्तुति करितसे ॥३९॥ अगा कृपेच्या सागरा । आनंदघन उदारा । निजांचिया माहेरा । विश्रामधामा ॥४०॥ मागें सांगितलें कथन । जेणें मनाचें होय

समाधान । चतुर्थाध्यायीं केलें श्रवण । शुद्ध ज्ञान होय जें ॥ ४१ ॥ पुन्हां पुन्हा तेंचि सांगिजे । अमृतें जेवितां पुरे न ह्मणजे । हें तों परमामृत श्रेष्ठ जें । सेवितातीं महामती ॥ ४२ ॥ अमर अमृत सेविती । त्यांचीहि असे परिमिती । नाहीं चुकत पुनरावृत्ती । होती जाती इंद्रादिक ॥ ४३ ॥ **श्लोक ॥ चतुर्योगस्य व्याख्यानात्कष्टात्कष्टं भवेन्महत् । कदाचित्प्राप्यते मृत्युः पुनर्जन्म भवेध्रुवं ॥ २ ॥ टीका**—चतुर्योगाची ख्याती । करितां कष्ट बहुत होती । कदाचित् होय मृत्युप्राप्ती । पुनर्जन्म निश्चयें ॥ ४४ ॥ **श्लोक ॥ नानायोनिगतः पश्चात्प्राप्यते नरजन्म हि । नरो नारायणः साक्षात् कैवल्यं ब्रह्म शाश्वतं ॥ ३ ॥ टीका**—नानायोग तपसामर्थ्यें । नरदेह प्राप्त होय अवचितें । परम दुर्लभ वांछिते । ज्यातें सुरवरादिकरूनि ॥ ४५ ॥ नरनारायणस्वरूप । जें केवळ ब्रह्मरूप । ज्योतिस्वरूप दीप । पूर्णप्रकाशाचा ॥ ४६ ॥ नरदेहासारिखें रत्न । सांपडलें बहु न करितां प्रयत्न । येथें जो न करी यत्न । निजात्मधनप्राप्तीचा ॥ ४७ ॥ येथें जेणें आळस केला । तेणें आत्मलाभ दवडिला । जन्ममरणप्रवाहीं पडला । येरझार न चुके कदा ॥ ४८ ॥ **श्लोक ॥ राजराजेश्वरो योगः शिवेन महता पुरा । लोकोपकारहेतोवै पार्वतीं प्रतिबोधितः ॥ ४ ॥ टीका**—राजराजेश्वरयोग । देवीप्रती सांगे

शिव आत्मलिंग । लोकोपकाराकारणें चांग । बोध करी निजात्म जो ॥ ४९ ॥ श्लोक ॥ **भगवद्बोधितःपार्थस्तथा चोद्धव आत्मना । एवं त्वं शाधि मां दीनं नित्यानित्यविवेकतः** ॥ ५ ॥ टीका—भगवान् सांगे पार्थाप्रती । उद्धवा बोधी भागवतीं । तेवीं मज उद्धरीं दीनाप्रती । नित्यानित्यविवेकें ॥ ५० ॥ श्लोक ॥ **तत्पदं त्वंपदमसीत्येतच्चोक्तं तृतीयकं । विस्तरेण प्रबोद्धव्यं यथार्थं दृष्टिगोचरं** ॥ ६ ॥ टीका—तत्पदत्वंपद आख्यान । असिपद तृतीय जाण । प्रबोधा विवेक हा विस्तारेंकरून । यथा दृष्टिगोचर ॥ ५१ ॥ जैसा तळहातींचा आरसा । प्रत्यक्ष दिसे डोळसा । उशीर नलगे पाहतां जैसा । आपीं आपणां ॥५२॥ श्लोक ॥ **तदा नश्यति संतापोजन्मकोटिसहस्रजः । निमेषोन्मेषयोर्मध्ये जीवन्मुक्तो भविष्यति** ॥ ७ ॥ टीका—पाहतां हरे त्रिविध ताप । जन्ममरणाचें तुटे माप । निमिषोन्मेषामध्यें स्वरूप । जीवन्मुक्त होतसे ॥ ५३ ॥ श्लोक ॥ कपिल उवाच ॥ **अयं प्रश्नो महाश्रेष्ठः श्रेष्ठस्यास्योत्तरं महत् । नाधिकारविहीनस्य शिष्यस्योपदिशेत्कदा** ॥ ८ ॥ टीका—कपिल ह्मणती शिष्याशिरोमणी । प्रश्न केला थोर चिंतामणी । श्रेष्ठा श्रेष्ठ जो पुरवी धणी । निजात्मसुखाची ॥ ५४ ॥ तरी चित्ताचें अवधान दीजे । जेणें आत्मसुख पाविजे । सहज आपीं आप जाणिजे ।

आत्मदृष्टी ॥ ५५ ॥ अनधिकारी शिष्यासी । सर्वथा न सांगे उपदेशासी । बीज पेरितां खड-
कासी । व्यर्थ होय श्रम जैसा ॥ ५६ ॥ श्लोक ॥ ऋषिसिद्ध उवाच ॥ सर्वेषामपि लोकानां
के वा ज्ञानाधिकारिणः । वद तल्लक्षणं सर्वं यथा संशयनाशनं ॥ १ ॥ टीका—ऋषी ह्मणे
मुनिराया । सर्वजनामध्यें अव्यया । कवण असे अधिकारिया । सांगिजे लक्षणें तयाचीं
॥ ५७ ॥ तांदुळांतूनि खडा काढिजे । तैसें अनधिकारीगुण निवडिजे । जेणें संशयनिवृत्ति
होइजे । मानसींची ॥ ५८ ॥ श्लोक ॥ कपिल उवाच ॥ गुरुभक्तिरतो नित्यं सत्यवादी
जितेंद्रियः । विप्रश्च वेदवक्ता च शास्त्रषट्कस्य पारगः ॥ १० ॥ टीका—कपिलमुनि सांग-
ती । शिष्यलक्षणें वचनोक्ति । जे उत्तम अधिकारी होती । लक्षणें तयांची ॥ ५९ ॥ नित्य
गुरुभक्तिरत । सत्यवादी जितेंद्रिय होत । विज्ञानवेदवक्ता शास्त्रार्थ जाणत । सर्वदर्शक होई
जो ॥६०॥ श्लोक ॥ नित्यानित्यविवेकी च इहामुत्रविवार्जितः ॥ तितिक्षोपरतिःशांति र्मुमु-
क्षोस्तस्य लक्षणं ॥ ११ ॥ टीका—जाणे नित्यानित्यविवेक । स्वर्गादिविषय मानी नर्क ।
तितिक्षा शांति अंगीं सम्यक । मुमुक्षुलक्षणें जाण हीं ॥ ६१ ॥ श्लोक ॥ कुर्वतः सर्वकर्माणि
अर्चतः सर्वदेवताः । अटंतः सर्वतीर्थानि फलं नेच्छंति सर्वथा ॥ १२ ॥ टीका—विरक्त

सर्व कर्मांचे ठायीं । करूनि अलिप्त असे पाहीं । साक्षमात्र होउनी देहीं । वर्ते जो सहज-स्थिती ॥ ६२ ॥ सर्व देवता असे पूजित । एक मानी सर्व भगवंत । द्वैतभाव चित्तीं न धरित । ऐक्य मानी विश्वासें ॥ ६३ ॥ अटन सर्व तीर्थीं करी । फळइच्छा कांहीं न धरी । निर्हेतुक कर्म करी । परोपकारी पवित्र जो ॥ ६४ ॥ **श्लोक ॥ कामः क्रोधस्तथा लोभो मोहो मात्सर्य-मेव च । दंभोऽहंकार इत्येतैर्जाग्रत्स्वप्नैश्च वर्जितः ॥ १३ ॥** टीका—काम नसे विषयाचा । सर्व विषय ईश्वर ज्याचा । निर्धार ऐसा मनाचा । दृढ असे ज्याचिया ॥ ६५ ॥ लोभ नसे देहाचा जया । चित्त इच्छित निजात्मठाया । आत्मस्वधनाची असे माया । साधनाभ्यासीं दृढ जो ॥ ६६ ॥ मोहभ्रांति जया नाहीं । विरक्त होउनी असे पाहीं । उदासीन असत देहीं । वैराग्ययुक्त जाणिजे ॥ ६७ ॥ मत्सर नसे कोणाशी । निर्वैर होउनी सर्वांशीं । दया उपजे मानसीं । आत्मत्व सर्व जाणोनियां ॥ ६८ ॥ दंभ अहंकार जयासी नसे । निरहंकृती वर्त-तसे । जागृती आणि स्वप्नदशे । न देखे दुजें मानसीं ॥ ६९ ॥ अनधिकारीयांचीं चिन्हें । सांगतों ऐक तींही लक्षणें । जीं अयोग्य ऐकूनि त्यजणें । अकारण जीं ॥ ७० ॥ **श्लोक ॥ निंदको वंचको धूर्तः खलो दुष्कृतितामसौ । एते नारकिणः प्रोक्तास्तानेतान्परिवर्ज-**

येत् ॥ १४ ॥ टीका—जो अखंड निंदा करी । वाचेशीं न स्मरे श्रीहरी । परदोष मुखें उच्चारी । हाचि नित्यनेम जया ॥ ७१ ॥ श्लोक ॥ अभक्ते वंचके धूर्ते पाषंडे नास्तिके नरे । मनसापि न वक्तव्यं गुरुगुह्यं कदाचन ॥ १५ ॥ टीका—वंचक असे सर्वांशीं । विश्वास नाहीं मानसीं । माता पिता श्रेष्ठ यांसी । वंचन करितां न चुके जो ॥ ७२ ॥ धूर्त असे बहु कुशल । शब्दलाघव जाणे सकल । परी अंतरीं असे कुटिल । कोळसा जैसा ॥ ७३ ॥ जो परम नष्ट खळ । दुष्कृती तामसी वोंगळ । नर्कसाधनमूळ । निर्मिला असे दुष्कर्मी ॥ ७४ ॥ जो अभक्त गुरुवंचक । पाषांडी शठ नास्तिक । तो वर्जिला सहज देख । गुरुगुह्य कदां न वदावें ॥ ७५ ॥ पुनःपुन्हां उत्तमाचीं । लक्षणें येथें सांगावयाचीं । आवडी होय मनाची । माझिया बरवी ॥ ७६ ॥ श्लोक ॥ शांतो दांतः क्षमी शूरः सर्वेंद्रियसमन्वितः । असक्तो ब्रह्मज्ञानेच्छुः सदा साधुसमागमः १६ ॥ टीका—शांत दांत क्षमा सर्व । हृदयीं वसती स्वयमेव । जया मानसीं वोलावा । ज्ञानजीवनाचा ॥ ७७ ॥ शौर्य थोर प्रताप । अद्भुत धृतीचें रूप । धैर्य धरूनि स्वस्वरूप । पहावा अधिकारी तोचि एक ॥ ७८ ॥ सर्व इंद्रियें समन्वित । ब्रह्मज्ञानीं बहु आसक्त । सदा संतसंगती असत । आत्मचर्चा आवडे जया ॥ ७९ ॥

श्लोक ॥ साधुबुद्धिः सदाचारी योऽभेदः सर्वदैवते । आशापाशविनिर्मुक्तस्त्वेते मोक्षाधिकारिणः ॥ १७ ॥ टीका—सद्बुद्धि असे मानसीं । सदाचारी स्वधर्मेंसी । अखंड चालणें जयासी । निजपथें आपुलिया ॥ ८० ॥ सर्व दैवतीं अभेदता । एकचि जाणे तत्त्वतां । द्वैतभेद नुपजे चित्ता । जयाचिये कदाकाळीं ॥ ८१ ॥ आशापाश न धरी । एक आत्मत्वाचीच आस करी । निजध्यास जया हाचि अंतरीं । तोही होय मोक्षाधिकारी ॥८२॥ तया उशिर नलगे प्राप्त होतां । गुरुवचनेंचि पावे तदात्मता । वेळ नलगे दीप उजळितां । स्नेह वाती असतां हे ॥८३॥दीप जरी उजळणें । तरी स्नेह वाती सिद्ध करणें । तैशीं जाणोनि अधिकारलक्षणें । पात्र पाहोनि उपदेश कीजे ॥८४॥ चिन्हें श्रीगुरु बोलवीत । तोचि हृदयीं असे नांदत । सूत्रकर्म प्रमाणें चालवीत । अधिकारपरत्वें ॥ ८५ ॥ लोहजाती धातू असेल । तरीच परिस-स्पर्शें सोनें होईल । तेथें दगड लाविता निर्फल । परिस त्यास काय करी ॥ ८६ ॥ लोह लोहपाषाणींच जन्मत । तो पाषाण विरळा असत । आणिक दगड बहुत होत । परंतु त्यांत लोह नसे ॥ ८७ ॥ अधिकारी तोच होत । ज्याचे पोटीं लोह असत । अभ्यासें होत प्राप्त । तेथील प्रमेय ॥ ८८ ॥ प्रथम असावी आर्तभक्ती । तरीच शेवटीं होय ज्ञानप्राप्ती । ज्ञानावांचूनि गती । न होय

कधीं प्राणियां ॥ ८९ ॥ श्लोक ॥ अनेकजन्मसंस्काराच्छ्रीगुरोश्च कृपावशात् । प्रत्यक्षश्च परोक्षश्च विवेकः प्राप्यते बुधैः ॥ १८ ॥ टीका—अनेक जन्मांचें संचित । तरीच सद्गुरुकृपा होत । प्रत्यक्षपरोक्ष जाणत । विवेकज्ञान ॥ ९० ॥ मुख्य असावी भक्ती । प्रेम आवडे चित्तीं । तरीच परावरप्राप्ती । होईल जाण निश्चयें ॥ ९१ ॥ सर्वलक्षणांचें लक्षण । गुरुभक्ति मुख्य कारण । शुद्ध असावें अंतःकरण । तरीच गुरुकृपा होय ॥ ९२ ॥ श्लोक ॥ भिद्यते हृदयग्रंथिच्छिद्यंते सर्वसंशयाः । क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥ १९ ॥ टीका—हृदयग्रंथि भेदितां । छेदित सर्व संशयता । सर्व कर्मीं अलिप्तता । तरीच प्राप्त परावर ॥९३॥ श्लोक ॥ दृष्टात्परं प्रवक्ष्यामि सर्वसिद्धांतविस्तरं । वेदांते च प्रकाशं यत्तत्त्वं श्रेष्ठमनुत्तमम् ॥ २० ॥ टीका—दृष्टांत नाहीं योजितां । सर्व पाहतां सिद्धांता । वेदांतीं पूर्ण प्रकाशता । तत्त्व श्रेष्ठ उत्तम जें ॥ ८४ ॥ श्लोक ॥ गोपितः सर्वशास्त्राणां विस्तरः कथ्यते मया । सर्वेषामधिकं तत्त्वं दृष्टांतरं च दृश्यते ॥ २१ ॥ टीका—गोप्य जें सर्वशास्त्रांचे ठायीं । विस्तारें सांगतों ऐक नवाई । सर्वांहून श्रेष्ठ होई । दृष्टांत नाहीं योजितां ॥ ९५ ॥ प्रतिपदे चंद्र उगवत । लहान रेषा न न्याहाळत । देखणा खुणें दावित । येराप्रती ॥ ९६ ॥ डाहाळीवरूनि पहा

ह्मणती। तैसे दृष्टांत तेथें साहती। शब्द खूण सांगती। तैशापरी जाणिजे ॥ ९७ ॥ जेथें तर्क न चाले। मनाचे मनपण जेथें गेलें। वाचा जेथें पांगुळे। ऐसें का आहे जें ॥ ९८ ॥ जें शास्त्राचें गुह्य। जें वेदांचें हृदय। आपीं आपली सोय। जाणत जें ॥ ९९ ॥ तें वाचे काय बोलिजे। परी सहज मनाची कर्मणूक कीजे। कपिल महामुनि बोलिजे। संस्कृतवाणी शुद्ध हे ॥१००॥ तें भोळेयांस काय ठावें। ह्मणोनि प्राकृत लागे बोलावें। आत्मकथन स्वभावें। गोड लागे चित्तासी ॥ १ ॥ जैसें विहिरीचें पाणी। दूर असे नये तृषाक्रांतालागोनि। तैशी जाण संस्कृत वाणी। गोड असे प्राकृत ॥ २ ॥ तयासी उपाय कीजे। तरीच तें पाविजे। श्रमावांचूनि न येइजे। हातासी जाण सर्वथा ॥ ३ ॥ उदक पाहतां एकचि होय। परी पाट वनीं या उपाय। क्षण न लागतां तृषा जाय। जीवें जीवन प्राशितां ॥ ४ ॥ तैसें हें शास्त्रगुह्य। प्रमेय पाठीं लाविलें जाय। जें सांगती मुनिराय। तें म्यां सहज कथन केलें ॥ ५ ॥ धुळींत सांपडे रत्न। तें न त्यागी जेंवीं विचक्षण। संस्कृत अर्थ तेंचि प्राकृत जाण। भेद मात्र वाणीचा ॥ ६ ॥ श्रोतीं दूषण न ठेवावें। सहज बोलिलों स्वभावें। तुमचे कृपेच्या बोलावें। बोलवा तैसें बोलत असें ॥७॥ अनुसंधान अंतरलें दुरीं। म्हणोनि कोपावे ना चतुरीं। पद संगतीवांचूनि वैखरी।

न जाय जाण सर्वथा ॥८॥ बीजावीण वृक्षासी । जाइजे केवीं विस्तारासी । तैसें बोलणें वाचेसी । बीजमूळ जाणिजे ॥ ९ ॥ जें वेदशास्त्रीं गुप्त असे । तें म्यां सांगितलें सविस्तारां कैसें । जें कां श्रेष्ठत्वासी वसे । दृष्टांत नाहीं द्यावया ॥ १० ॥ श्लोक ॥ ज्ञातव्यमंतरंगस्थं बहिरंगं च पश्यति । प्रत्यक्षं चैव पश्यंति दृष्टांतरं च दृश्यते ॥ २२ ॥ टीका—अंतरंगज्ञान होय । तरी बहिरंग उमटे जाय । प्रत्यक्ष नयनीं तो पाहे । दृष्टांत जाण प्रवर्ते ॥ ११ ॥ जो हा समर्थ ॐकार । जयाचा सर्व विस्तार । त्याचा कैसा विचार । अनुभवसिद्ध जाणिजे ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ प्रथमं नादलुब्धश्च बिंदुश्चैव तदुच्यते । तृतीयं च कला प्रोक्तं ज्योतिरूपं च पश्यति ॥२३॥ टीका—प्रथम नादलुब्ध असे । द्वितीय बिंदु प्रकाशे । तृतीयकळा उल्लासे । ज्योतिरूप प्रकाश. हा ॥ १३ ॥ श्लोक ॥ अकारं नादरूपं च ह्युकारं बिंदुरूपकं । मकारं तु कला प्रोक्ता ओंकारं ज्योतिरेव हि ॥२४॥ टीका—अकार तो नादरूप । उकार होय बिंदु-स्वरूप । मकार जाण काळादीप । ॐकार ज्योतिस्वरूप जो ॥ १४ ॥ येथें मन पाहिजे लाविलें । तरीच हें होय साधिलें । जेणें मन जाण समजाविलें । तें ऐका सज्जन हो ॥१५॥ मनाची एक खोडी । देखिला ठाव न सोडी । पुनःपुन्हां तेच गोडी । घेवोनियां उठतसे

॥ १६ ॥ प्रपंचीं अथवा परमार्थीं । मनास विषयीं होय रती । तरी जाणिजे तृप्ती । मान-
साची ॥ १७ ॥ निर्गुणमनाशीं गमन । होतां विषयीं असे कोण । अनुहतध्वनी होतां श्रवण ।
भुले जाण तद्योगें ॥ १८ ॥ श्लोक ॥ **लुब्धो नागस्वरैः सर्पो घंटानादैः कुरंगकः । पतंगो
लुभ्यते दीपैर्मनो नादेन लुभ्यते ॥ २५ ॥ टीका**—नागस्वरें भुले भुजंगम । घंटानादें कुरं-
गम । दीपयोगें जैसा पतंगम । मन नादें भुलतसे ॥ १९ ॥ अंतरध्वनी ऐकोन । मन
होतसे तल्लीन । मग सहज स्वरूपदर्शन । अभ्यासें करून होइजे ॥ २० ॥ ॥ श्लोक ॥
**पतंगमीनहरिणगजालयोप्यतिक्रमाः । इंद्रियांणि मनुष्यस्य भज्यंते किमु चिंतया ॥२६॥
टीका**—पतंग मीन हरण । गज आणि भ्रमर जाण । पंचविषय पंचप्राण । भुलोनि जाति तद्रूपीं
॥ २१ ॥ शब्दस्पर्शरूपरसगंध । विषय पंच प्रसिद्ध । पांच स्थळीं पंच लुब्ध । होउनी देहा
अर्पिती ॥ २२ ॥ इंद्रियाचा भोगविषय होत । विषयांचे ठायीं होती विरक्त । तेथेंचि
होऊनि तृप्त । परम आनंद पावती ॥ २३ ॥ विषय आनंदभोग । हाचि इंद्रियांचा योग ।
तयांचाचि इच्छिती संग । सर्वकाळ संवसारीं ॥ २४ ॥ विषयींच सर्व भुलविले । इंद्रियादिक
थोर दादुले । विषयींच निर्विषय झाले । धन्य ते जाण संवसारीं ॥ २५ ॥ इंद्रिय श्रेष्ठ मन

असे । मन जाय तेथें सर्व येती अनायासें । नादविषयीं गुंततां कैसे । इंद्रियें चेष्टती कैसेनी ॥ २६ ॥ श्लोक ॥ यथा चुंबकपाषाणः सूचिका च पृथक् तथा । उभयोर्दर्शने योगो मोहितं तत्र लिप्यते ॥ २७ ॥ टीका—लोहो चुंबकसंनिधानें । चाले तयाचे वेधनें । मन वेधें अंतरध्वनीनें । आत्मस्वरूपीं तल्लीन होय ॥ २७ ॥ श्लोक ॥ तथैव च मनुष्याणामात्मा च हि पृथक् तथा । मानसं तत्र लीयेत इंद्रियैः किं विचेष्टयते ॥ २८ ॥ टीका-तैशी आत्मनिष्ठा धरूनी मन अखंड असतां अनुसंधानीं । इंद्रियें स्थिर होऊनि । मन होय उन्मन ॥ २८ ॥ श्लोक ॥ तद्देह आत्मभावेन मानसं लक्ष्यते सदा । इंद्रियादि स्थिरं यस्य तन्मनो ह्युन्मनो भवेत् ॥ २९ ॥ टीका—साधकें तैसें करावें । मनासी तेथें गोंवावें । मग इंद्रियें कैशीं निजस्वभावें । चेष्टती कवणेपरी ॥ २९ ॥ श्लोक ॥ घृते कृता च प्रातिमा चोष्णेनैव विलीयते । लवणं जलविक्षिप्तं लवणत्वाद्विलीयते ॥ ३० ॥ टीका—घृताची पुतळी केली । उष्ण लागतां सहज विघुरली । लवण पडतां जैसें जळीं । लवणत्वा मुके जेवीं ॥ ३० ॥ श्लोक ॥ तथैव स्वात्मभावेन ह्युन्मनस्त्वं मनो व्रजेत् । दृश्यते त्वग्यदृष्ट्या चित्तं तत्र लयं गतं ॥ ३१ ॥ टीका—तैसें नादब्रह्म मिळोन । मन होतसे उन्मन । पाहतां चक्षू अग्नि ल-

क्षोन । चित्ताचा तेथें लय होय ॥ ३१ ॥ श्लोक ॥ शर्करा जलसंयुक्ता शर्करात्वं हि गच्छति । सगुणं ध्यायतो नित्यं निर्गुणत्वं तथोच्यते ॥३२॥ टीका—शर्करा जळीं घालितां । शर्करात्व विरे तत्वत्तां । सगुण जाण लक्षितां । निर्गुण लक्ष्य होतसे ॥ ३२ ॥ श्लोक ॥ फलस्य कारणं पुष्पं फलात्पुष्पं विनश्यति । ज्ञानस्य कारणं कर्म ज्ञानात्कर्म विनश्यति ॥ ३३ ॥ टीका—फळाचें कारण पुष्प होत । फळ वाढतां पुष्प नासत । ज्ञानाचें कारण कर्म समर्थ । ज्ञानीं कर्म सहज उडे ॥ ३३ ॥ श्लोक ॥ पानीयचोरन्यायोऽयं भांडं यज्जलपूरितं । यस्याधश्छिद्रदशकमूर्ध्वमेकं तुच्छिद्रकं ॥ ३४ ॥ टीका—पाणीचोरन्यायें । रंधें असतां स्थिर होय । ऊर्ध्व छिद्र तें कळ होय । तेणें स्तब्ध अवघें ॥ ३४ ॥ श्लोक ॥ छिद्रमूर्ध्वमिदं सूक्ष्मं तथापि जलरोधकं ॥ मुक्तेऽस्मिन् भाण्डभेदश्च जलस्यापि च निष्क्रमः ॥ ३५॥ टीका—ऊर्ध्व छिद्र सोडितां । सर्व वाहती पहातां । उदक जाण क्षण न लागतां । पात्र होय भग्न तें ॥ ३५ ॥ तैसें मन एक धरावें । मग सहज उगी असती स्वभावें । इंद्रियसामर्थ्य आघवें । मना आधीन जाण पां ॥ ३६ ॥ श्लोक ॥ प्राप्तकाले च विप्रर्षे मानसं भयमाप्नुयात् । तत्सर्वं कथयिष्यामि सावधानं शृणुष्व च ॥ ३६ ॥ टीका—प्रथमदशेच्या ठायीं । मानसा भय उप-

जतां पाहीं । सर्व सांगेन ऐक तेंही । साधनें करूनि प्राप्त होय ॥ ३७ ॥ दृष्टांत ऐक सांगेन । स्वरूपप्राप्तीचें लक्षण । भूमिकापरत्वे साधन । करावें कैसें ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ **स्त्रीणामादौ यथा भीतिः पुरुषस्यादिसंगमे । तथाऽसां चित्तविक्षेपः प्राप्तानां स्वामिमंदिरं ॥ ३७ ॥**

टीका—प्रथम यौवनस्त्री जैशी ॥ भय बहुत असे मानसीं । नूतन रती पुरुषासी । प्राप्त होतां ॥ ३९ ॥ मंदिरीं प्रवेश करितां । चित्तीं वाटे विक्षेपता । सर्व लोक मग तीस बोधितां । भय उडतसे मानसीं ॥ ४० ॥ ते जाणिजे प्रथम भूमिका । मनासी न धरवे आवांका । परी धीर धरोनि नेटका । प्रवेश कीजे ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ **पुरुषस्याऽल्पसंगेन गतायाता तु सोच्यते । लज्जाभीती यदा नष्टे तस्याः संश्लिष्टता च सा ॥ ३८ ॥** टीका—पुरुषीं अल्प संपर्क होतां । तेथें सुख भय वाटे चित्ता । मन किंचित् स्वरूपीं लागतां । गतायाता त्यासी म्हणिजे ॥४२॥ पुरुषीं निर्भय चित्त झालें । लज्जा भय सर्व फिटलें । रतिसुखीं चित्त गुंतलें । ते जाण संश्लिष्टता ॥ ४३ ॥ श्लोक ॥ **पुरुषं तु वशीकृत्य गृहिणी गृहमुच्यते । तदा सुलीनता प्रोक्ता सर्वसिद्धिविधायिनी ॥ ३९ ॥** टीका—पुरुषप्राप्ति जाहली याची खूण । गृहिणी गृहमुच्यते हें वचन । तेचि भूमिका जाण सुलीन । प्राप्तदशा म्हणती हे ॥४४॥ येथें

वृत्ति होय लीन। तुर्याभोग भोगून । मन होतसे उन्मन । निज ठायीं ॥४५॥ सुलीनता मनासी पावे। तंवपर्यंत साधन करावें । सर्वसिद्धींचें फळ पावावें । अविनाश जें ॥४६॥ आत्मसुखाचें क्रीडन । मन जेथें होय समाधान । आपीं आपणा जाणवे खुण । अनुभवियांप्रती ॥ ४७ ॥

॥ श्लोक ॥ शरीरं भुवनं यस्य हृदयं रतिमंदिरं । आत्मा च पुरुषः प्रोक्तो मानसं प्रकृतिस्तथा ॥ ४० ॥ टीका—शरीर हें भुवन सुंदर । हृदय तेंचि रतिमंदिर । आत्मा पुरुष प्रीतिकर । मन तोंचि प्रकृती ॥ ४८ ॥ मन आत्मत्वीं क्रीडतां । सहज पावे तदात्मता । निरतिसुखीं रततां । परमानंद पावत ॥ ४९ ॥ किंचित् रातिसुख आनंद । संसारीं शिणोनि भोगिती स्वाद । सेवितां वाटे गोड कंद । बचनाग जसा ॥ ५० ॥ विषयसुखासी भुलोनि । तेचि हाव सर्वांलागुनी । जैशी उडी गिळितां मीनीं । परिणामी होय संकट ॥ ५१ ॥ सवें चोराची संगत जैशी । कापट्य वसे मानसीं । कोणी नसतां आसपाशीं । वाटमार्गें नागवितो ॥५२॥ तैसा नव्हे आत्मभोग । जो सच्चिदानंद अभंग । शाश्वत अखंड अव्यंग ॥ अपार पार न कळे ज्याचा ॥ ५३ ॥ जो आनंदाचा विसावा । जो सुखाचा सांठोवा । जिवीं जिवाचा वोलावा । आत्मभोग ॥ ५४ ॥ नरदेहासी येऊन । न घेई जो आत्मदर्शन । तरी

वृथा जाण जन्मोन । निष्कारण होय ॥ ५५ ॥ जैसा अदैवाचा उदीम । करी कष्ट होय श्रम । फळप्राप्ति नसे सुगम । व्यर्थ होय व्यापरी ॥ ५६ ॥ जैसें गगनीं येत आभाळ । वृथा वायां पोकळ । सृष्टि न होय सुफळ । जीवनीं जैशी ॥ ५७ ॥ त्याहुनी पशु बरा । जो न करी आत्मविचारा । पशु ऋतुकाळीं भोगी दारा । नर रमे नित्य गमनीं ॥ ५८ ॥ स्त्री गरोदर जरी झाली । तरी न सुटे कामभुली । ऐशी वासना असे गुंतली । जाणों मूर्ख होतसे ॥ ५९ ॥ नरदेह अवचट लाधला । विषयभोगीं जन्म व्यर्थ गेला । संसारीं जाय वृथा शीणला । अंतीं एकला जातसे ॥ ६० ॥ धन्य तोचि एक जगीं । जो आपीं आपणा भोगी । रंगोनियां निजात्मरंगीं । सुफळ होय जन्म त्याचा ॥ ६१ ॥ दूर अंतरलें अनुसंधान । मागें केलें जें कथन । स्त्रीदृष्टांतें भूमिका साधन । सांगितल्या असती ॥ ६२ ॥ चारी जाणिजे साधनभूमिया । पायरिया केल्या असती सुरेखा । चढावया ब्रह्मगिरी मस्तका । राजयोगींद्रस्थान जें ॥ ६३ ॥ **श्लोक ॥ विक्षेपता गतायाता संश्लिष्टता सुलीनता । एवं हि प्रोच्यते सद्भिर्भूमिकानां चतुष्टयं ॥ ४१ ॥ टीका**—प्रथम जाण विक्षेपता । दुसरी ते गतायाता । तिसरी होय संश्लिष्टता । सुलीनता होय चतुर्थ ते ॥ ६४ ॥ पाइरिया बांधो-

नियां वाट । करावी जावया नीट । तैसें साधन कीजे चोखट । आत्मपंथाचें ॥ ६५ ॥ **श्लोक ॥ आरंभे श्रवणं कृत्वा मनसा च विचारणं । निदिध्यासनमभ्यासः साक्षात्कार-स्तदा भवेत् ॥ ४२ ॥ टीका**—आरंभीं श्रवण करावें । तेंचि मनीं धरावें । निजध्यासीं असावें । अखंडाकार ॥ ६६ ॥ नित्य अभ्यासीं असतां । साक्षात्कार होय अवचितां । हाचि विश्वास मानुनी चित्ता । भजनीं तत्पर असावें ॥ ६७ ॥ **श्लोक ॥ एवं क्रमेण बोद्धव्यं विचार्यं च पुनःपुनः । अकस्माद्गुरुसंतोषात् साक्षात्कारश्च तत्क्षणात् ॥ ४३ ॥ टीका**—अनुक्रमें बोध जाणोनि मना । विचारणा करावी पुनः पुन्हां । अकस्मात् गुरु संतोषवी जाणा । आत्मदर्शन होईल ॥ ६८ ॥ **श्लोक ॥ मृदा नूनं भवेद्भाण्डं पुनस्तत्र मृदेव च । एवं ब्रह्म-रतो लोकः संसारेण न लिप्यते ॥ ४४ ॥ टीका**—मृत्तिकेचा घट निर्मिला । अग्निसंसर्गें उत्तम जाहला । पुनरपि मृत्तिका होय या बोला । सत्य मानिजे ॥ ६९ ॥ येऱ्हवीं मृत्तिकेचा खरा । ज्ञाना-ग्निसंसर्गें जाहला पुरा जीव । तैसा आत्मविचारा । पावत असे ज्ञानयोगें ॥७०॥ पाहतां कुंभ मृत्तिका एक । तैसेंच आत्मयाचें कौतुक । उपाधी कारणमात्र देख । आत्मत्वीं भिन्न नसे ॥७१॥ जो परब्रह्मीं होय मिळाला । तेचि जन्ममरणापासून चुकला । समुद्रीं शेंबुटा जैसा पडियला । न निवडे वेगळे

पणें ॥ ७२ ॥ तो सर्व व्यवहार करित । करूनि सर्व आलिप्त । त्रिगुणीं असोनि कर्मातीत । वर्तणें असे तयाचें ॥ ७३ ॥ काय वचनें बोलों बोली । जयासी आत्मसिद्धि न जाहली । तेणें वृथा शिणविली । जन्मोनि माय बापुडी ॥ ७४ ॥ **श्लोक ॥ पठित्वा वेदशास्त्राणि ब्रह्मज्ञानविवर्जितः । न नष्टविषयासंगः पठित्वा किं प्रयोजनं ॥ ४५ ॥ टीका**—वेदशास्त्र पठण करित । व्युत्पत्तिज्ञान सर्व जाणत । ब्रह्मज्ञान न जाणत । व्यर्थ होती श्रमचि ते ॥७५॥ जैसे मयूरपिच्छाचे डोळे । सुंदर दिसती चांगले । देखणें नसोन आंधळे । शोभिवंत दिसती ॥ ७६ ॥ कारण तेंचि दिसत । जेणें सर्व प्रकाशत । तें लहान किंचित् असत । तयावांचूनि व्यर्थ तें ॥ ७७ ॥ जनीं मान्यता होईल ॥ सर्व संपत्ती घरास येईल । परंतु तें जाणिजे फोल । कणेंवीण कणसें जैशीं ॥ ७८ ॥ आशा तृष्णा नाहीं गेली । विषयवासना बहु वाढविली । सर्व क्रिया वृथा गेली । पढोनि काय प्रयोजन ॥ ७९ ॥ **श्लोक ॥ पुस्तकानि पठेद्यस्तु वाक्यार्थं च करोत्यपि । अमेध्यं भक्षितं तेन पठित्वा किं प्रयोजनं ॥ ४६ ॥ टीका**—पोथी पुस्तक वाचित । नित्य वाक्यविवरण करित । अमेध्य होय भक्षित । पटनें काय प्रयोजन ॥ ८० ॥ आपली नेणें शुद्धि । काय वाउगी वाढवूनि उपाधी । जन्ममरण न चुके कधीं ।

यातायात भोगणें ॥ ८१ ॥ धरूनि श्लोकसंगती । बोलिलों असे वचनोक्ति । जें समर्थ मुनी वदती । आधार त्यांच्या वचनाचा ॥ ८२ ॥ श्लोक ॥ उदकेन भवेत्पंकः स च तैनैव शुध्यति । मनः करोति वै कर्म मुच्यते मनसैव तत् ॥ ४७ ॥ टीका—उदकयोगें पंक जाहला । तोचि उदकें जाय धूतला । तैसा मनीं संकल्प उपजला । मनाचि करी त्याग त्याचा ॥ ८३ ॥ श्लोक ॥ मनः करोति कर्माणि पातकैर्लिप्यते मनः । मनश्चेद्धयून्मनो भूयान्न धर्मैर्नापि पातकैः ॥ ४८ ॥ टीका—मनें कर्में केलीं । पातकें मनेंचि भाविलीं । आत्मत्वीं दृष्टि जरी घाली । न पापपुण्य तया ॥ ८४ ॥ श्लोक ॥ कामनासहितं कर्म कुर्याद्यः कामसिद्धये । तदाऽसौ लिप्यते भागैर्निष्कामो नैव लिप्यते ॥ ४९ ॥ टीका—कामना धरूनि कर्म करी । फळ भोगी तदनुसारी । होऊनि निष्काम जो अंतरीं । न लिंपे नलिनीपत्र जैसें ॥ ८५ ॥ तीर्थें व्रतें कर्में करावीं । फळाशा कांहीं न धरावी । तुळशीरोप जैसें लावी । फळें त्याचीं निष्काम हे ॥ ८६ ॥ ज्ञानी सर्व कर्में करी । वर्तत असे संसारीं । जनरीतीचिया परी । दिसत असे सारिखा ॥ ८७ ॥ जैसे सतीचे भोग ॥ उपचार घेतसे चांग । मनीं न धरी तेथील संग । चित्त निश्चयीं गुंतलें असे ॥ ८८ ॥ जीव आत्मत्वीं प्रवेश करितां । सर्व मिथ्या

वाटे अनित्या । आत्मानुभव जाहालिया चित्ता । सर्व मनीं एकत्वें ॥८९॥ श्लोक ॥ **कार्पासेन भवेद्वस्त्रं कार्पासत्वं न मुंचते । आत्मा त्वसौ भवेज्जीवो जीवे ब्रह्मत्वमुच्यते ॥५०॥** टीका—कापसाचें वस्त्र होत । वस्त्रीं कापुसाचि असत । तेथें कर्तृत्व विणणी दिसत । एरवीं तंतु तोचि तो ॥ ९० ॥ आत्मा तोचि जाण जीव । जीव तोचि आत्मा स्वयमेव । अभ्यासें पावे ठाव । आपीं आपुला जाण पां ॥ ९१ ॥ त्रिगुणात्मक तोचि जाहला । नाना विस्तार हा रचिला । गुणपरत्वें निर्मिला । व्यापार सृष्टीं ॥ ९२ ॥ श्लोक ॥ **सत्त्वेन जायते धर्मः प्रपंचो रजसा तथा । तमोगुणाद्भवेत्क्रोधो गुणत्रयमिदं भवेत् ॥ ५१ ॥** टीका—सत्वगुणीं धर्म होत । रजोगुणीं प्रपंच निर्मीत । तमोगुणीं क्रोध असत । प्रळयरूप जो ॥ ९३ ॥ ऐसें गुणत्रयलक्षण । सर्वीं आत्मा एक प्रमाण । तदर्थीं दृष्टांत बोलती जाण । मुनिराज समर्थ जे ॥ ९४ ॥ श्लोक ॥ **एका च मृद्भांडमनेकरूपं गोक्षीरमेकं बहुवर्णधेनुः । सुवर्णमेकं बहुभूषणानि शरीरभेदः परमार्थ एकः ॥ ५२ ॥** टीका—मृत्तिका पाहतां एक । कुलाल पात्रें करी अनेक । परी मृत्तिकाची असे व्यापक । नामें घेतां बहुतापरी ॥ ९५ ॥ बहुवर्ण असतां गाई । दूध एकाचि वर्ण असे पाहीं । तैशी जाणिजे आत्मसोई । एकात्मता सर्व हे ॥ ९६ ॥

सुवर्ण अलंकार केले । सुवर्णेंचि शोभेसि आले । एकत्व नाहीं मोडिलें । सुवर्णाचि आटितां ॥ ९७ ॥ शरीरें भिन्न भिन्न जाहलीं । तेथें आत्मकळाची प्रगटली । एकपणें असे संचली । वस्तूचि ते ॥ ९८ ॥ श्लोक ॥ **पाषाणैरालयं बद्धं देवः पाषाण एव च ॥ ब्रूहि पंडित देवस्तु कस्मिन्स्थाने स तिष्ठति ॥ ५३ ॥ टीका**–अगा पाषाणाचें देऊळ केलें । दैवत पाषाणाचें स्थापिलें । सांगा पंडित विचारूनि वहिलें । देव वसे कोणें ठायीं ॥९९॥ श्लोक ॥ **आत्मलिंगं विष्णुरस्ति संदेहमत्रनाऽऽप्नुयात् । सर्वभूतस्वरूपं च पश्येदेकं विचक्षणः ॥ ५४ ॥ टीका**–आत्मलिंग विष्णु जाणिजे । संदेह मात्र वर्जिजे । सर्वभूतीं देखिजे । एकात्मता ॥ २०० ॥ न करितां आत्मविचार । व्यर्थ शिणे संसार । दृष्टी मुरडोनि माघार । आप आपणा न पाहे ॥ १ ॥ वाढवी मायेचा पसार । विचार न करी सारासार । देहींच देव असतां गव्हार । नेणेचि जाण तयासी ॥ २ ॥ श्लोक ॥ **स्वगृहे पायसं त्यक्त्वा भिक्षामिच्छति दुर्मतिः । शिलामृद्दारुचित्रेषु देवता बुद्धिकल्पिता ॥ ५५ ॥ टीका**–स्वगृहीं पायस जाहला । तो टाकूनि भिक्षेसी गेला । काय ह्मणावे अदैवाला । इच्छा करी दुर्मति ॥३॥ धन असे पुढें ठेविलें । ह्मणें कैसें चाले आंधळें । ऐशी इच्छा करोनि डोळे । आपले झांकी आपण ॥४॥

दैवें चिंतामणी सांपडला । धोंडा म्हणोनि झुगारिला । तैसा नरदेह गमाविला । आत्मलाभ न जाणतां ॥ ५ ॥ आत्माराम न जाणतां । पाषाण मृतिका काष्ठ पूजितां । बुद्धि करून दैवत कल्पितां । आत्मकळा प्राप्त होय ॥ ६ ॥ **श्लोक ॥ हृत्पद्मे परमं तत्त्वमादिमध्यांतवर्जितं ॥ आधारः सर्वलोकानामनाधारमविक्रियं ॥ ५६ ॥ टीका**—तद्हत्कमळीं परम तत्त्व । न कळे तयाचा अनुभव । आधारें असती सर्व जीव । अनाम अव्यय जो ॥ ७ ॥ काष्ठीं जैसा अग्नि असे । तो कोणा दृष्टी न दिसे । तेथें मथन करितां सहज प्रकाशे । अभ्यासयोगें ॥ ८ ॥ **॥ श्लोक ॥ कंटकाग्रं कृतं केन सिंहशार्दूलविक्रमे । मयूरे नर्तनं केन तेषां च सहजोद्भवं ॥ ५७ ॥ टीका**—सिंहा शार्दूलासी जाण । कंटकाग्रें येत स्फुरण । मयोर सहज नृत्यें हर्ष मान । आनंद घन देखोनियां ॥ ९ ॥ तैसें मन स्वरूप लक्षितां । आनंद होय उल्हासतां । ध्यासें होय तन्मयता । निजात्मरूपीं ॥ १० ॥ श्लोकीं दृष्टांत दीधला । तोचि आश्रयें असे चालिला । सर्व संशय जरी वाटेल मनाला । कपिलगीतेंत पाहिजे ॥ ११ ॥ प्रमेयमात्र जाणोनि । अर्थ काढिला असे शोधूनि । सद्गुरुकृपासामर्थ्येंकरूनि । यथामती ॥ १२ ॥ गंगेंत उदक भरिलें असे पूर्णपात्र । आपण घेई तें तृषाहरणमात्र । अनंत अपार विचित्र ।

माहिमा न कळे तियेचा ॥ १३ ॥ प्रेम धरूनि आवडी । आत्मसुखीं असावी गोडी । रिकामें नसावें अर्धघडी । स्वाहित जाणिजे आपुलें ॥ १४ ॥ तीव्र ध्यास असावा । तरीच पाविजे निजात्मठेवा । श्मशानवैराग्यभावा । धरितां नव्हे प्राप्त तो ॥ १५ ॥ ज्ञान सर्व कळतसे । परी अभ्यास न करी आळसें । अदृष्टावरी घालूनि कैसें । आत्मध्यास धरीना ॥ १६ ॥ आयुष्यधन नेमिलें । त्यांतही कांहीं वेंचलें । अखंड माप असे लागलें । रात्रंदिवस ॥ १७ ॥ भ्रांतिभरें कैसा भुलला । आपणासी आपण विसरला । नेणेचि आपुल्या स्वहिताला । त्यासी काय म्हणावें ॥ १८ ॥ जो धरी आवडी विषयांत । तो आपला आपण करी घात । त्यासि दंड नाहीं चालत । स्वाहितास जाण मुकला ॥ १९ ॥ हा बोध केला मनासी । जाणावें आपआपणासी । विकल्प न धरावा मानसीं । समर्थ श्रोतीं ॥ २० ॥ ॥ श्लोक ॥ भ्रमरः कीटकं न्यस्य नीडे स्वे चांतरं गतः । तत्रायं भ्रमरध्यानाद् भ्रमरत्वं प्रपद्यते ॥ ५८ ॥ टीका— तीव्र ध्यासावांचून । न होय आत्मज्योतिदर्शन । भ्रमरीं कीटक जाण । ध्यानें तद्रूपता पावतसे ॥ २१ ॥ पाहेपां पिसाळलेला श्वान । दंश करी दुसरिया लागून । तोचि भाव प्रगट होणें । सामर्थ्य आपुलें दाखवी ॥ २२ ॥ हा तो केवळ आत्माराम । जो सर्वसुखांचा

विश्रामधाम । निजध्यासीं जपतां नाम । आत्मनिजपद देतसे ॥ २३ ॥ निजध्यासावेगळें । आयुष्य वृथा असें वेंचलें । जवळ असोनि ठक पडलें । आपलेन दृष्टीं ॥ २४ ॥ दृष्टि अंध कैशी जाहली । कवण्या गुणें भूल पडली । आप आपणां न न्याहाळी । निजनयनीं ॥ २५ ॥ विषयीं लोलुप होऊन । अखंड करिशी तेंचि चिंतन । तारुण्य वेंचलें तरी तृप्त मन । न होय इच्छित अधिकोत्तर ॥ २६ ॥ विषय थोर घातक । भवदुःखा होय दायक । कां करितां डोळेझांक । असतां हे आपुले ॥ २७ ॥ विद्यावयसें कां नटा । आत्म संपत्ती न भोगितां होसी करंटा । यमपाश घाली हटा । जन्ममरणीं गुंतशी ॥ २८ ॥ अहंगर्वी न धरी ताठा । आत्मसुखीं होई लाठा । ब्रह्मगीता करोनि पाठा । अंतरध्वनी जाणोनी ॥ २९ ॥ होऊं नको विषय गोचिड । असतां जवळ दूध गोड । धरूनि परमामृताची चाड । आवअसावी अंतरीं ॥ ३० ॥ नरदेह पर्वकाळ आला । येथें जेणें आळस केला । निजात्मलाभ हातींचा गेला । पुन्हां नये मागुती ॥ ३१ ॥ जीवदशा हेंचि देइजे दान । निजात्मतीर्थें करी स्नान । तेणें होशील पावन । पापपुण्य वेगळा ॥ ३२ ॥ बोध होय मनासी । सहज तो मीपण नाशी । आपीं आपणा भेट कैशी । करूनि ठेवी निजपदीं ॥ ३३ ॥ येथें भय नसे

कांहीं तुमचें । जो विषयसुख मानी साचें । कारण जाणिजे त्याचें । बोलावया हेंचि असे ॥३४॥ येथें तुमचें आमचें नाहीं साचें । समूळ मूळ विनाशाचें । तें मीतूंपण कैचें । जाणिजे बापा ॥ ३५ ॥ होशी मायेचा गुलाम । न करिसी आत्मराजयाचा सम । जो जिवाचा असे आराम । आत्मराव ॥ ३६ ॥ कां पडला भ्रांति भ्रम । नेणशी हृदयींचा विश्राम । संसारी श्रमसी करूनि श्रम । एकला जाशी शेवटीं ॥ ३७ ॥ वचन मानिजे निष्ठुर । ऐसें बोलती श्रेष्ठ थोर थोर । तुह्मां संतांचाचि असे आधार । ह्मणोनि वाचा वदतसे ॥ ३८ ॥ न ह्मणिजे कठोर वाणी । लक्ष असे तुमच्याचि चरणीं । हृदयव्यापक होऊनी । वदवीत असां स्वामियां ॥ ३९ ॥ करणें तुमचें कृपेचें । तेंचि बीज होय साचें । बोली प्रमेय विस्ताराचें । चालिलें असे ॥ ४० ॥ पदपदांतरसंगती । न कळे पुराण व्युत्पत्ति । कृपा केली असे संतीं । हृदयभावो जाणोनियां ॥ ४१ ॥ आतां काय बोलों परिहार । तुह्मीं कृपेचे सागर । पशुमुखें विचार । केला असे वेदाचा ॥ ४२ ॥ मी केवळ तैसाच असें पशु । सद्गुरुकृपें बोले वाच्यांशु । एरवीं कपिलगीतेचा सारांशु । बोलिजे काय ॥ ४३ ॥ आतां असो हे वदंती । गुरुवचनीं विश्वासोनि चित्तीं । सोडोनियां हृदयग्रंथी । अभ्यासीं दृढ

असावें ॥ ४४ ॥ संसार न ह्मणावा गोड । ब्राह्मणें न ह्मणिजे उघड । अभ्यासें होय सुघड । निजतत्त्व आपुलें ॥ ४५ ॥ मायेनें केला उपकार । आपण होऊनी समोर । कळों नेदी विचार । ब्रह्म गूढ करोनि ठेवी ॥ ४६ ॥ गुप्त ठेवणें ठेविती । वरी तोंड बुजवूनि देती । मायेनें केलें तयारीतीं । आत्मधन आच्छादिलें ॥ ४७ ॥ ब्रह्म जरी उघड दाविती । तरी तयासी कोणी न पुसती । प्रत्यक्ष दिसतसे गभस्ती । भाव नाहीं तद्रूपीं ॥४८॥ येर ऐशीं जरी दैवतें । पूजिती भजती नानामतें । विश्वप्रकाश तेज जयातें । नमस्कार न करिती तयासी ॥४९॥ ऐसा जनाचा विचार । मिथ्या प्रपंच मानिती सार । खरे टाकोनि खोटे व्यवहार । करिती जाण सर्वदां ॥ ५० ॥ ब्रह्मज्ञान बहु बोलत । आत्मा न जाणती हृदयांत । पावोनि स्वरूपीं विश्रांत । एकांतस्थान न सेविती ॥ ५१ ॥ एक दैवतबळें सांगती गोष्टी । एक पडती सिद्धी कचाटीं । एक ते वृथा शब्द चावटी । वाचाळपणें बोलती ॥ ५२ ॥ आत्मप्राचिती बोलतां वचन । सुखी होती संतसज्जन । समजतां स्वस्वरूपखुण । संतुष्ट होती मानसीं ॥ ५३ ॥ कवित्वशक्ति कवित्व केलें । तरी काय आत्मत्व प्राप्त जाहलें । गुरुगम्य पाहिजे जाणिलें । खुण समजोनी मानसीं ॥ ५४ ॥ म्हणाल गुह्य गुह्य तें काय कैसें । सांगिजेल आतां अनायासें ।

कपिल बोलती उल्हासें । ऋषिसिद्धांप्रती ॥ ५५ ॥ विश्वास धरूनि तेथ । चित्तीं धारिला पाहिजे हेत । तयासीच होईल प्राप्त । आत्मस्वरूप जाणिजे ॥ ५६ ॥ श्लोक ॥ **चक्षुरग्रे स्थितं नित्यं विस्फुरंतं मणिं यथा । तं दृष्ट्वा व्यापकं देवं भवबंधात्प्रमुच्यते ॥ ५९ ॥** टीका–चक्षुअग्राच्या ठायीं । नित्य तयासी ध्यायीं । विस्फुरत माणिरूप पाहीं । तेथें दृष्टी पाहे देव ॥ ५७ ॥ होतां तयांचें दर्शन । सुटे भवबंधनापासून । पुन्हां नाहीं जन्ममरण । दर्शन घेतां तयांचें ॥ ५८ ॥श्लोक॥ **चक्षुरग्रे स्थिता छाया सा माया मूलरूपिणी । दृश्यादृश्यस्वरूपेण शिवसायुज्यकारिणी ॥ ६० ॥** टीका–चक्षुअग्रीं दिसे छाया । तेचि जाणा मूळमाया । दृश्यदृश्य स्वरूप तिया । शिवसायुज्यकारिणी ॥ ५९ ॥ मायेचा पडदा असे जाण । उघडूनि पाहिजे प्रकाशघन । नित्य करितां अभ्यास साधन । प्राप्त होय निश्चयें ॥ ६० ॥ ॥ श्लोक ॥ **चक्षुर्मध्ये स्थितं गुह्यमंगुष्ठपर्वमात्रकं । तदूर्ध्वंचापि पर्वार्धं तस्यांतःसूक्ष्मकं ध्रुवं ॥ ६१ ॥** टीका-चक्षूमध्यें गुह्य देख । अंगुष्ठपर्वमात्र ओळख । तदूर्ध्व जाण सम्यक । त्यांत जें सूक्ष्म असे ॥ ६१ ॥ सूक्ष्मांत जें सूक्ष्म । तेंचि जाण हृदयाविश्राम । निज नैष्ठिक धरूनि नेम । अखंड लक्ष लाविजे ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ **चक्षुर्दृष्टेः साक्षिभागोऽप्यवलोकनतत्परं ।**

प्रकाशते स्वयं ज्योतिर्नरस्तत्त्वत्र पश्यतु ॥ ६२ ॥ टीका—चक्षु दृष्टी साक्ष भाव । अवलोकिजे तोचि ठाव । प्रकाश दिसे स्वयमेव । साधकीं तेथें लक्षिजे ॥ ६३ ॥ श्लोक ॥ अचलं निर्मलं शांतं कूटस्थं तेज उच्यते । अमलं निर्मलं चैव शून्यं चापि निरंजनं ॥ ६३ ॥ टीका—अचल निर्मल जे ज्योत । काया जिचेनि शोभत । अमळ सोज्वळ देह होत । जयाचे योगसामर्थ्यें ॥ ६४ ॥ जें शून्य व्यापक निरंजन । पोटीं घालूनि असे गगन । जें जीवनाचें होय जीवन । प्राणिमात्राचें जें ॥ ६५ ॥ श्लोक ॥ शुद्धस्फटिकसंकाशं शुभ्रवर्णो मणिः खलु । तेजोराशिमयं ब्रह्म धार्यते आत्मलिंगकं ॥ ६४ ॥ टीका—शुद्ध स्फटिकवर्ण दिसे । माणि सोज्वळ शुभ्र भासे । तेजोराशी ब्रह्म प्रकाशे । प्राणलिंग आधार जें ॥ ६६ ॥ ॥ श्लोक ॥ सर्वांगसच्चिदात्मानं ज्ञानदृष्ट्या निरूपयेत् । अज्ञानचक्षुषः क्षेपाद्भांतं भानुमिवोषसि ॥ ६५ ॥ टीका—सर्वांग व्यापक । असत सच्चिदात्मक । प्रकाश ज्ञानजोत देख । ज्ञानचक्षु निरीक्षिजे तेथ ॥ ६७ ॥ निजात्मप्रभे अज्ञानचक्षु निक्षेपितां । दिव्य दिसे प्रकाशता । भासे मध्यें भानुस्वरूपता । तेज शुद्ध लखलखी ॥ ६८ ॥ श्लोक ॥ सुवर्णवद्दीप्तिमति ज्ञानाग्नौ परिदीपिते । जीवः सर्वमलान्मुक्तः

स्वर्णवद्दीप्यते स्वयं ॥ ६६॥ टीका–सुवर्णवर्ण दिसे दीप्ती । ज्ञानाग्नि उजळे ज्योती । जीव-मूळ नासोनि मुक्ती । परमपद पावावी ॥ ६९ ॥ दीपप्राय प्रभा दिसे । माया भ्रांती सर्व निरसे । सुखानंद बहु उल्हासे । पाहतांचि निजस्वरूप ॥ ७० ॥ **श्लोक ॥ बहिरंतः स्फुरज्ज्योती रत्नकुंभप्रदीपवत् । स्वप्रकाशं सदाज्ञानमेकरूपमनामयं ॥ ६७ ॥ टीका**– अंतर्बाह्य दिसे ज्योती । रत्नकुंभवत् भासे दीप्ती । स्वप्रकाश सदैव असती । ज्ञानकळा व्यापक जे ॥ ७१ ॥ रूपाचें जें निजरूप । मनाचें निजमन अरूप । रूपातीत असतें जें स्वरूप । व्यापून सकळ जीवमात्रीं ॥ ७२ ॥ **श्लोक ॥ गुह्याद्गुह्यं परं सूक्ष्मं चक्षुः स्थानेषु तिष्ठति ॥ तन्मूर्तिर्लक्ष्यतामंगे आपादतलमस्तकं ॥ ६८ ॥ टीका**–गुह्याचें निजगुह्य होत । चक्षुस्थानीं असे तिष्ठत । ते मूर्ती आणिजे ध्यानांत । आपादतळ मस्तकावरी ॥ ७३ ॥ **श्लोक ॥ मनसा भावयन्मूर्तिं तिष्ठेत्तां पूर्णतेजसं । सा मूर्तिश्चक्षुरग्रेषु तिष्ठत्येव न संशयः ॥ ६९ ॥ टीका**–साधकें ते मूर्ति न्याहाळावी । पूर्णप्रभा नेत्रीं पाहावी । ते खुण अनुभवीं जाणावी । संशय टाकूनि मानसींचा ॥ ७४ ॥ जें सर्व जीव चाळक । लोकत्रया होय पाळक । अंतर्बाह्य व्यापक । चराचर हें ॥ ७५ ॥ जें सकळ क-

ळेची कळा । सकळ जीवांचा जिव्हाळा । न कळे अगम्य जयाची लीळा । हरिहरादिकां नेणवे ॥ ७६ ॥ जयाचा न कळे अंतपार । जो सर्व सारांचा सार । अगमां निगमां अगोचर । आदिअंत नाहीं जया ॥ ७७ ॥ जो प्राणाचा प्राण । जो मुनिजनांचें ध्येय ध्यान । जो नयनांचा निजनयन । देहचाळक आत्मा ॥ ७८ ॥ जो आनंदाचा आनंद । जो सर्व सुखांचा मूळकंद । जो परिमळाचा परिमळ सुगंध । तोचि आत्मा हृदयीं वसे ॥ ७९ ॥ गुरूनें अधिष्ठान जें असे सांगितलें । तेंचि हृदयीं पाहिजे जाणिलें । गुरुकृपें नेत्रीं उगवलें । आपणामाजीं ॥ ८० ॥ ऋषिसिद्ध म्हणे मुनिश्रेष्ठा । प्रतापज्ञानवरिष्ठा । चुकविसी जन्ममरणकष्टां । संसारापासूनी ॥८१॥ **श्लोक ॥ ऋषिसिद्ध उवाच । सिद्धानां चैव सर्वेषां प्रणम्य कपिलं गुरुं । योगसिद्धं महच्छ्रेष्ठं ज्ञानं ज्ञेयं च ब्रूहि मे ॥ ७० ॥** टीका—नमन करूनि बोलत । कर जोडूनि विनवीत । ज्ञानज्ञेय विचार निश्चित । सांगिजे कृपा करूनियां ॥ ८२ ॥ कपिल म्हणती ऋषिसिद्धासी । तूं बहु विचक्षण गुणराशी । जेणें घडे परोपकाराशी । प्रश्न केला थोर हा ॥ ८३ ॥ **श्लोक ॥ कपिल उवाच । शृणुष्व ऋषिसिद्ध त्वं यदर्थमिह आगतः ॥ ततः सर्वं प्रवक्ष्यामि निःशेषमचलं तव ॥ ७१ ॥** टीका—ऐक सांगतों तुजप्रती ।

जेणें समाधान होय चित्तवृती । ते सर्व बोलेन वचनोक्ती । विशेष करूनि सांगेन ॥ ८४ ॥ ॥ श्लोक ॥ प्रणम्य शंकरं देवं परात्परमहेश्वरं । आत्मज्ञानप्रकाशेन प्रत्यक्षं तत्त्वमुच्यते ॥ ७२ ॥ टीका—नमन करूनि नमी शंकर । जो आदि गुरु ईश्वर । परात्पर परमेश्वर । अनाम अव्यय जो ॥ ८५ ॥ आत्मज्ञानाचा प्रकाश । प्रत्यक्ष कीजे तत्त्वोपदेश । जेणें होय आत्मसंतोष । तेंचि सर्व बोलती ॥ ८६ ॥ बहुमूर्ख जो असे । तयासी वस्तु कैशी दिसे । कैसेनि ती प्रकाशे । मंदबुद्धि अंधत्व जया ॥८७॥ श्लोक ॥ बहिर्गतः कोऽपि शिष्यो निवृत्तःशीघ्रमालयं । प्रतिवेशांधभुवनं द्रष्टं किंचिच्छशाकन ॥ ७३ ॥ टीका—बहिर्गत शिष्य जरी । आगत होय शीघ्र मंदिरीं । ऐकिजे तें नवल परी । सांगतों तुज दृष्टांत ॥८८॥ रत्नखचीत मंदिरीं । प्रवेशे आंत चक्षु असोनि काय करी । प्रकाश देखत ॥ ८९ ॥ श्लोक ॥ तत्रैवास्मिन् स्थिरीभूते अंधकारः प्रभा भवेत् । तदैव दृश्यते वस्तु स्वयं चक्षुश्च पश्यति ॥७४॥ टीका—स्थिर बुद्धि करूनि मानसीं । दृष्टीं पाहे निजवस्तूसी । तेव्हां सदृश वस्तु अवलोकिशी । स्वयं चक्षु देखती ॥९०॥ ॥ श्लोक ॥ अज्ञानपूर्णे हृदये तमःपूर्णे च मानसे । सततं वर्तमानं हि दृश्यते न च वस्तु वै ॥ ७५ ॥ टीका—अज्ञानत्व हृदयीं असे । अंधकार मानसीं प्रवेशे । अहर्निशीं व-

स्तु संचली असे । चंचळत्व नाहीं तिसी ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ पश्यता सुस्थिरीभूय वस्तु-
तत्सर्वमेव हि । हृदये त्वंधभुवने दृश्यते च निरंतरं ॥ ७६ ॥ टीका—अवलोकनें पाहतां
दिसे । पदार्थमात्र सर्व भासे । अंधभुवनीं प्रकाशे । वस्तु जाणे निरंतर ॥ ९२ ॥ श्लोक ॥
अकल्पितोद्भवं ज्योतिः स्वयंज्योतिःप्रकाशितं । अकस्माद्दृश्यते ज्योतिस्तज्ज्योतिः पर-
मात्मनि ॥ ७७ ॥ टीका—अकल्पित ज्योतिउद्भव । स्वयं प्रकाश स्वयमेव । हृदय निर्मळ
होतां अनुभव । मानसीं ज्योती प्रकाशे ॥ ९३ ॥ छाया तोचि प्रकाशती । जाणिजे दिव्य पर-
ज्योती । अकल्पित भासे दीप्ती । परमात्मीं जाण तें ॥ ९४ ॥ श्लोक ॥ आनंदकंदसं-
भूतं ज्ञाननालं सुशोभनं । त्राहि मां नरकाद्घोराद्दिव्यज्योतिर्नमोऽस्तु ते ॥ ७८ ॥
टीका—आनंदकंद जो बहळ । प्रकाश अद्भुत ज्ञाननाळ । पाहतांचि जो तोडी मूळ । भवव्-
क्षाचें यया ॥ ९५ ॥ ऐशी जे आत्मप्रभा । पोट गिवसून असे नभा । जे प्रकाशाची पूर्ण
शोभा । तया ज्योति नमन असे ॥ ९६ ॥ श्लोक ॥ विचाराष्टदलोपेतं वैराग्यं कुंकुमं
तथा ॥ विरक्तकर्णिकं शुद्धं चंद्रकांति समप्रभं ॥७९॥ टीका—विचार हेंचि जाण अष्टदळ ।
वैराग्य केशर सुपरिमळ । विरक्तकार्णिक शुद्ध निर्मळ । चंद्रकांती प्रभा असे ॥ ९७ ॥श्लोक॥

सच्चित्तदृश्यते रूपं परं ब्रह्मैव भावितं । हृत्पुंण्डरीकमध्ये तु सोमसूर्याग्निमण्डले ॥ ८० ॥
टीका—सच्चिदानंद पाहे रूप । परब्रह्म भासे स्वरूप । हृदयकमळीं उजळोनि दीप । पाहें प्रकाश स्वयंज्योती ॥९८॥ कमळ मध्यें सुनीळ । दिव्य तेजाचा कल्होळ । सोमसूर्याग्निमंडळ । प्रभा दिसे ॥९९॥ **श्लोक ॥ कल्पना तु तडित्प्राया ज्वालानां वन्हिरूपता । शिवदृष्ट्या ततो नित्यं क्षणं पश्येद्यथाविधि ॥८१॥** टीका—विद्युत्प्राय भासे कल्पना । वह्निरूपी ज्वाळा दिसती जाणा । शिवरूप आत्मदर्शना । यथाविधि पाहिजे ॥ ३०० ॥ यदर्थीं दृष्टांत असे बोलिला । संतीं पाहिजे श्रवण केला । गोड मानिजे बाळकबोला । मायबाप ह्मणोनियां ॥ १ ॥ बाळ बोले वेडें वांकुडें । परी तें सर्वांसी आवडे । जाणतियाचें तेणें पाडें । गोड न वाटे सर्वथा ॥ २ ॥ ऊंस वांकडा असे जरी जाण । गोडीस नसे वांकुडेपण । तैशी जाणिजे अनुभवखूण । व्यर्थ चावटी कासया ॥ ३ ॥ मन स्वरूपीं जडावया । पुनः पुन्हां सांगती उपाया । जावया निजा-न्मठाया । प्रवेश होय कैशापरी ॥ ४ ॥ **श्लोक ॥ चूते पूर्वं यथा सन्ति कट्वाम्लानि फलानि वै । पश्चात्तानि यथा यान्ति माधुर्यं च रसात्मताम् ॥८२॥** टीका—चूतवृक्षासी येतां फळें । लहान अंगीं कटु कोमल । तितुकीं न धरीती सकळ । विरळा जाणा रहातसे ॥ ५ ॥ तैसें

50471

उपदेश बहुत घेती । त्यांत विरळा श्रद्धाळू होती । तेचि अधिकारी असती । साधनपंथा ॥ ६ ॥ तैसें फळ वाढतां अम्ल फार । मग अम्लपण जाऊनि होय मधुर । मधुरत्वीं गोड थोर । मुरोनि जातें निजसेजें ॥ ७ ॥ **श्लोक ॥ चूतोऽन्तःकरणं ह्यत्र मानसं च तथा फलं । फलं कोमलमेतत्तु कटुम्लं हि भवेतथा ॥८३॥ टीका**—तैसें अंतःकरण वृक्ष निर्मळ । मन हेंचि जाणिजे फळ । आर्त हेंचि दैंठमूळ । कटु अम्ल प्रथम असे ॥ ८ ॥ **श्लोक ॥ मनः स्थिरं फलमिदं यदा पक्वं भवेत्तदा । माधुर्यं ब्रह्मरसतां प्राप्तं हंसैः सुसेव्यते ॥८४॥ टीका**—मन स्वरूपीं लागलें । तेंचि अम्ल फळासी आलें । कटुत्व अम्लत्व सर्व गेलें । अधिकारी होय स्वरूपीं ॥९॥ मधुरत्वें ब्रह्मरस । पक्व होय फळप्रकाश ॥ रस सेविती परमहंस । परब्रह्म फळाचा ॥ १० ॥ **श्लोक ॥ मनोवासनया बद्धं मुच्येन्निर्वासनं यदि । तदैव ब्रह्मरसतां याति तत्पीयते बुधैः ॥८५॥ टीका**—वासना हेचि बद्धता । निर्वासना तेचि जाण मुक्तता । मन पावे तदात्मता । ज्ञाती ब्रह्मरस सेविती ॥ ११ ॥ **श्लोक ॥ ब्रह्मरसः स्वादुतमो त्पद्मे पूर्ण आत्मनि । इंद्रैश्वर्यमतः क्षुद्रं का कथेतरभूपतेः ॥८६॥ टीका**—ब्रह्मरसाचा स्वाद । तो केवळ परमानंद । सर्व सुखांचा आनंदकंद । नये वाचे बोलावया ॥ १२ ॥ जे सर्व सुखांची गोडी । निजात्मधनाची जोडी । तेथें देती जे बुडी । स्वानंद डोहीं ॥ १३ ॥

धन्य जन्म तयाचा । तोचि अधिकारी होय मोक्षाचा । जो स्वाद घेत ब्रह्मरसाचा । येऊनियां नरदेहीं ॥ १४ ॥ सर्व धर्म तयासीच घडला । वेदशास्त्रें तोचि पढियेला । जन्म तयाचाचि सुफळ जाहला । नरनारायण तोचि ॥ १५ ॥ तृप्त होऊनि परमात्मीं । आपीं आप मिळतसे मिळणीं । पूर्णप्रकाशाची खाणी । प्रतापभास्कर जो जो ॥ १६ ॥ इंद्रादिपद गौरवा मानित तुच्छ सर्व । भौमादिराय तृणप्राव । अपमानीतसे ॥ १७ ॥ जो चिंतामणीमंदिरीं राहे । तो काय तृणझोपडी चित्तीं इच्छिताहे । परीस जयाचे हातीं आहे । तो काय पाहिल दरिद्रातें ॥ १८ ॥ जीवत्व टाकुनी शिवत्वासी । जो मिळे अविनाशपदासी । भोग भोगी आत्मविलासी । धन्य धन्य त्यासी ह्मणिजे ॥ १९ ॥ आत्मलाभ जयासी घडला । उपमा नाहीं त्या द्यावयाला । सर्व पदार्थ तोचि जाहला । निजात्मस्वरूपीं ॥ २० ॥ जन्माचें जाण हेंचि सार्थक । जो पाहे येऊनि आत्मकौतुक । नरदेह गेलिया न ये आणिक । फिरूनि जन्म दुर्लभ हा ॥ २१ ॥ **श्लोक ॥ विचारदर्पणे यो वै यत्नात्सूक्ष्मं विलोकयेत् । दृश्यते तत्र यद्रूपं नूनं तन्न स्वकात्पृथक् ॥ ८७ ॥** टीका—आत्मविचार—दर्पण । लक्षीं करावें अवलोकन । दिसतसे आप आपण । दुजें नाहीं जाणपा ॥ २२ ॥

जळीं चंद्र दिसे बिंबला । तरी काय तो दुसरा जाहला । मिथ्या भास मात्र भासला । एरवीं तोचि तो ॥ २३ ॥ द्वैत टाकूनि पाहतां । मी कोण कोठील विचारितां । आपीं आपण देखतां । आत्मा होय तोचि तो ॥ २४ ॥ घटाकाश मठाकाश ह्मणणें । तेथें निश्चयें आकाशचि जाणणें । बळें शेवटीं उपाधी मात्र बोलणें । व्यर्थ असे ॥ २५ ॥ घट जन्मतां आकाश नाहीं जन्मलें । घटभंगीं न होय भंगलें । जैसें तैसेंचि संचलें । जेथिंच्या तेथें ॥२६॥ तैसा आत्मा जाण व्यापक । सर्वभूतीं सम्यक । हृदयभुवनीं कौतुक । क्रीडा करी स्वच्छंदें ॥ २७ ॥श्लोक॥

हृदये दर्पणे पश्येन्मनस्तत्रावलोकयेत् । दृश्यते प्रतिबिंबेन स्वात्मरूपं न संशयः॥८८॥टीका—

हृदय जाणोनि गुरु आज्ञेनें।मन तेथें अवलोकनें।आत्मबिंब असे देखणें । पूर्ण निश्चयीं जाणपां॥२८॥

श्लोक॥आत्मत्वं दृश्यते तत्र ज्योतीरूपं निरंतरं । चित्तशुद्धिस्थिरत्वेन हृदि भानुः प्रकाशते॥

॥८९॥टीका—आत्मज्योति तेजाकार । दिसत असे निरंतर । चित्तशुद्धी करूनि स्थिर । हृदयीं भानुप्रभा दिसे ॥ २९ ॥ **श्लोक ॥ आत्मा विशुद्धचैतन्यस्वरूपः शाश्वतो विभुः । निर्विकारः स्वयंज्योतिः स्वभावार्क प्रकाशते ॥ ९० ॥ टीका—**आत्मा शुद्ध चैतन्यघन । स्वरूप शाश्वत जीवन । निर्विकार स्वयंज्योति जाण । स्वभाव अर्क प्रकाशे ॥ ३० ॥ श्लोक ॥ आका-

शे काशते सूर्यो गगने चंद्रमास्तथा । खमध्ये रोचते तारा ज्योतिश्चिद्व्योमसंस्थितं ॥ ९१ ॥ टीका—आकाशीं तिष्ठत असे सूर्य । गगनीं चंद्रप्रकाश होय । खमध्यें तारा दिसत होय । चिदव्योमीं ज्योतिरूप हें ॥३१॥श्लोक॥ दृश्यते सूर्यरूपं हि तदाकारं विचिंतयेत् । आत्ममध्ये प्रभारूपं नान्यत्किंचिद्विचारयेत् ॥ ९२ ॥ टीका—भानुरूप तेज जें दिसे । तें चिंतिजे दिव्यदृष्टीं मानसें । आत्मप्रभा शुद्ध प्रकाशे । हृदयीं तेंचि जाणिजे ॥ ३२ ॥ जें असे सर्वसाक्ष होऊन । योगियांचें जें निदिध्यासन । सर्व साधनांचें जें साधन । परम तत्त्व जें ॥ ३३ ॥ जें सृष्टीचा आकार । तें दिसतसे तेजाकार । निरंजन निर्विकार । पूर्ण जाण चैतन्य ॥ ३४ ॥ जें हृदयींचा विसावा । पाळण करितसे सर्व जीवां । उत्पत्ति स्थितिप्रळय ठावा । कारण होय जाणपा ॥ ३५ . ॥ जें आत्मधनाचें भांडार । योगियांचें निजात्मसार । आनंदजीवनसरोवर । जीवजळचराचें ॥ ३६ ॥ जें मूळमायेची विश्रांति । जें सर्व गतींची निजगति । ऋषि आदिदेव ज्यातें ध्याती । अखंडकारें निरंतर ॥ ३७ ॥ चित्तचतुष्टया जें नकळे । वेदश्रुती जेथें पांगुळे । शेषें वर्णितां झांकिले डोळे । शय्या होउनी राहिला ॥ ३८ ॥ जेथें मनबुद्धीं पांगुळे । तें केवि आकळिजे वाचाबळें । परी तयाचेच सामर्थ्यलीळें । वदें भाव ते-

थील हा ॥ ३९ ॥ श्लोक ॥ तज्ज्योतिर्हृदयस्थाने प्रत्यक्षं ब्रह्मक्षरं । पद्मगर्भे च यः पश्येत्स मुक्तो नात्र संशयः ॥ ९३ ॥ टीका—ऐसें जें शुद्ध ब्रह्म असे । तोंचि ज्योति हृदयीं प्रकाशें । प्रत्यक्ष दृष्टिगोचर भासे । निजनयनीं ॥ ४० ॥ पद्मगर्भाचें ठायीं । व्यापूनि असे तें पाहीं । पाहतां पुनरपि जन्म नाहीं । मुक्त होय संशय न धरीं ॥ ४१ ॥ ऋषिसिद्ध ह्मणे स्वामी माझिया । कृपासागरा निजात्मसखया । स्वात्मसुख विलासया । भोग भोगिसी स्वलीळें ॥ ४२ ॥ श्लोक ॥ ऋषिसिद्ध उवाच । त्वमेव भगवन् वेत्सि ज्योतीरूपं यथास्थितं । यज्ज्योतिर्हृदि पद्मेस्ति शाश्वतं ब्रह्म केवलं ॥ ९४ ॥ टीका—भगवान् बोधिती सर्व । यथार्थ ज्योति स्वयमेव । हृत्पद्मीं जाण अनुभव । शाश्वत ब्रह्म केवळ जें ॥ ४३ ॥ श्लोक ॥ हृदि पद्मे स्थितं ब्रह्म तत्कथं दृष्टिगोचरं । कुत्रास्ति हृत्पद्ममिदं कथं ज्योतिश्च दृश्यते ॥ ९५ ॥ टीका—हृत्पद्मीं ब्रह्म सार । तें दाविजे दृष्टिगोचर । कोणतें हृदयमंदिर । ज्योति कोठें प्रकाशे ॥ ४४ ॥ अथावीं जैसा पायउतार । उतरूनि पाविजे पैलपार । सोपा सर्वांसी सुखकर । उघड असे सर्वांसी ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ त्वं तत्सर्वं वदाऽस्माकं यत्तदध्दृयपंकजं । तन्मध्ये यज्ज्योतिरास्ते दिश ब्रह्म

महामुने ॥ ९६ ॥ टीका—तें सर्व सांगिजे मज । हृदयपद्मींचें बीज । आत्मज्योति निज-तेज । दर्शाविजे महामुनी ॥ ४६ ॥ कपिल म्हणती सिद्धा निर्मळा । तूं केवळ ज्ञानाचा पुतळा । प्रश्न करशी आत्मकळा । इच्छा धरूनि मानसीं ॥ ४७ ॥ जैशी गौतमें गंगा आणिली । ते सर्वां उपयोगा गेली । तैशी तुझी प्रश्नबोली । उपकार केला जनामाजीं ॥ ४८ ॥ ऐक सां-गतों शुद्धमन । पंचभूतादि देहीं स्थान । कैशीं असती काय लक्षण ॥ निजतत्त्व कवण तें ॥ ४९ ॥ बोलिलेंचि मागुती बोलिजे । अविट गोडी सेवितां जाणिजे । परमामृत बहु श्रेष्ठ जें । सर्वांसि होय सुखकारक ॥ ५० ॥ सेविलेंचि पुनरपि सेविजे । बोलिलेंच तैसें बोलिजे । हें तों कैवल्यसुख भोगिजे । तयासी कोण विटेल ॥ ५१ ॥ कोणे स्थळीं कोण चक्र असे । पंचभूतें मातृका कैशी प्रकाशे । सांगतों ऐक अनायासें । तुजलागुनी सविस्तर ॥ ५२ ॥

॥ श्लोक ॥ कपिल उवाच ॥ पादादिजानुपर्यंतं पृथ्वीस्थानं प्रतिष्ठितं । तत्रास्ति पद्म-मेकं च सर्वदेहेषु संस्थितम् ॥९७॥ टीका—पादादि जानुपर्यंत । पृथ्वीस्थान असे प्रतिष्ठित । तया स्थळीं पद्म एक असत । सर्वदेहीं संस्थित जें ॥ ५३ ॥ श्लोक ॥ जान्वादिनाभिपर्यंत-मपां स्थानं हि कथ्यते । आधारलिंगं नाभौ च वेदशास्त्रादिसंज्ञितं ॥ ९८ ॥ टीका—

जानूपासूनि नाभीपर्यंत । आपस्थान असे कथित । आधारलिंग तया स्थळीं वसत । वेदशास्त्र संज्ञा असे ॥ ५४ ॥ श्लोक ॥ त्रिस्थानेषु चतुर्दलाब्जमथ षट्पर्णैर्युतं पंकजम् । आस्तेऽन्यद्दशपर्णमब्जमथ वै पर्णेषु तेषां क्रमात् । आद्ये वर्णचतुष्टयं व, श, ष सेत्यन्यत्र षड्-वर्णकम् । बाद्यं लान्तमथापि वर्णदशकं डाद्यं च फान्तं स्मृतम् ॥ ९९ ॥ टीका–त्रिस्थानीं तीन पद्में सोज्वळ । चतुर्दल षड्दल दशदल । परम पवित्र निर्मळ । संज्ञा जाण तयांची ॥ ५५ ॥ वपासूनी सपर्यंत । आधारीं जाण चारी वसत । स्वाधिष्ठानीं साहा वसत । सांगतों खूण तयांची ॥ ५६ ॥ बकारापासूनी लकार । मात्रा असती निरंतर । स्वाधिष्ठानींचा विचार । जाणिजे जी ॥ ५७ ॥ दशदळीं दशमातृका । बीजें सांगतों आइका । डपासूनि फकारपर्यंत देखा । असती पद्में व्यापूनी ॥ ५८ ॥ तेथूनि ऊर्ध्व असती । ऐकिजे तयांची स्थिती । गुरु-कृपें सर्व जाणती । शास्त्रप्रचीति जाणोनियां ॥ ५९ ॥श्लोक॥ नाभ्यादि कंठपर्यंतमग्निस्थानं सुशोभितम् । तन्मध्ये पद्ममेकं हि हृदि स्थूलं च सज्ञितम् ॥ १०० ॥ टीका–नाभ्यादी कंठपर्यंत । अग्निस्थान सुशोभित । तयामध्यें पद्म असत । हृदयीं स्थूळ जाणिजे ॥ ६० ॥ ॥ श्लोक ॥ दलैर्द्वादशभिर्वर्णैर्युक्तमक्षरमव्ययम् । ककारादिठकारान्तैर्वर्तते सर्वदेहिषु ॥१॥

टीका—द्वादश दळें असती जया । माणिपूर चक्र ह्मणती तया । असे अक्षर अव्यया । तत्र स्थळीं जाणपां ॥ ६१ ॥ ककरादि ठकारपर्यंत । अक्षरें व्यापक असतीं तेथ । वर्ततीं सर्व देहा आंत । जाणिजे सकळ ॥ ६२ ॥ श्लोक ॥ **कंठादिभ्रुकुटिप्रान्ते वायुस्थानं तु तत्स्मृतम्।**
तालुमूले स्थितं पद्मं दलैः षोडशकैर्युतम् ॥ २ ॥ टीका—कंठादी भ्रूपर्यंत जाण । असतसे वायुस्थान । तालुमूळीं षोडशदळ प्रमाण । विशुद्धचक्र ह्मणती तया ॥ ६३ ॥ श्लोक ॥ **स्वराः षोडशकास्तत्र तदूर्ध्वं हृदि पंकजम् । एकं सूक्ष्मात्सूक्ष्मतरं चक्षुरग्रेषु शोभितम् ॥ ३ ॥** टीका—अकारापासोनि अःपावेतों । अक्षरें सोळा जाणिजे तो । स्वर षोडश असती हे तों । शास्त्रप्रचीति जाणिजे ॥ ६४ ॥ तालुहूनि ऊर्ध्व असे । हृदयीं सूक्ष्म जें असे । तया सूक्ष्मांत सूक्ष्म दिसे । पद्म जाण गुरुखुणें ॥ ६५ ॥ चक्षूअग्रींच्या ठायीं । लक्ष लावूनि तेथें पाहीं । मिळूनियां पदीं जाईं । नयनीं असे सुशोभित ॥ ६६ ॥ श्लोक ॥ **तदेव हृदयं नाम सर्वशास्त्रसुसंमतम् । अन्यथा हृदि किंचास्ति प्रोक्तं यत्स्थूलबुद्धिभिः ॥ ४ ॥** टीका—तेंचि हृदय जाणिजे । गुरुखुणें ओळखिजे । श्रुतीसाक्ष देखिजे । आपुले प्रचीती ॥ ६७ ॥ अन्यथा हृदय कीं ह्मणणें । तें जाणिजे स्थूळदृष्टीं बोलणें । जेथें आत्मत्वींची खूण जाणणें ।

तेंचि जाण मुख्य हृदय ॥ ६८ ॥ त्याचा कैसा कार्य वर्ण । सांगतों ते ऐक खूण । प्रत्यक्ष दिसतें जाण । भाव धरितां तत्क्षणीं ॥ ६९ ॥ श्लोक ॥ **रक्तं श्वेतं तथा कृष्णं नीलपीतादि शोभितम् । तन्मध्ये व्यापितं येन तज्ज्योतिर्ब्रह्म केवलम् ॥ ५ ॥** टीका—रक्त श्वेत आणि कृष्ण । नीळ पीत असतसे जाण । तयामध्यें असे व्यापून । ब्रह्म ज्योती केवळ तें ॥ ७० ॥ श्लोक ॥ **स ब्रह्मा स शिवो विष्णुः सोऽक्षरः परमः स्वराट् । सर्वं क्रीडंति तत्रैते तत्सर्वेंद्रियसंभवम् ॥ ६ ॥** टीका—ब्रह्मा शिव विष्णु जाण । सोहं अक्षर विराट् प्रमाण । तेथें क्रीडत स्वइच्छेंकरून । सर्वइंद्रियां चाळक जो ॥ ७१ ॥ श्लोक ॥ **आभ्रुवो ब्रह्मरंध्रान्तं स्थानमाकाशसंज्ञितम् सहस्रदलसंयुक्तं पद्मं तत्र विराजते ॥ ७ ॥** टीका—भ्रुवादी ब्रह्मरंध्रपर्यंत देख । आकाशस्थान संज्ञक । सहस्रदलकौतुक । पद्म जेथें विराजित असे ॥ ७२ ॥ श्लोक ॥ **सुषुप्तिकाले संप्राप्ते आत्मसौ पद्ममाश्रितः यथा भानूदये सर्वे तथा देहेषु चेष्टते ॥ ८ ॥** टीका—सुषुप्तिकाळींच्या समयीं । आत्मा असतसे ठायीं । पद्मपळीं क्रीडा करितसे पाहीं । स्वलीळें आपुलिया ॥ ७३ ॥ सूर्य अस्तमानीं जातां ॥ निद्रा व्यापित असे समस्तां । प्रातःकाळीं उदय होतां । सर्व क्रिया चालती ॥ ७४ ॥ सुषुप्ति निद्रा काळीं । आत्मा लीन होतसे

सहस्रदळीं । जागृत होतां इंद्रियें सकळीं ॥ चेष्टा होय स्वभावें ॥ ७५ ॥ आत्मा असे सर्व-साक्षी । जागृत निद्रा दोहीं पक्षी । तदंश होऊनि जीव लक्षी । निजधाम आपुलें ॥ ७६ ॥ जागृतीं ह्मणे मी जागा होतों । स्वप्नाअवस्थें स्वप्न देखतों । सुषुप्ति अवस्था मीच जाणतों । आपुल्या ठायीं ॥ ७७ ॥ अवस्था तो नव्हे जाणिजे ऐसें । आत्मप्रचीति पा-हिजे कैसें । गुणसंयोगें होतसे जैसें । तेचि ते जाण अवस्था ॥ ७८ ॥ गाढ मूढ निद्रा येतां जाण । उर्वशी व्याघ्र तत्समान । नाहीं दोहींचेंही भान । जवळ येतां नेणत ॥ ७९ ॥ जागृतीसी येतां जाण । गोड निद्रा लागली ह्मणे । तरी तो कोण ऐसा जाणणें । साक्षी नव्हे आत्मा तो ॥ ८० ॥ श्लोक ॥ **भ्रुवोर्मध्ये पद्ममेकं द्विदलं तच्च शोभितं । हंस-मक्षरसंयुक्तं वर्तते वायुमण्डले ॥ ९१ ॥** टीका—भ्रूंमध्यें असे पद्म । द्विदळ सुंदर सुगम । हंस अक्षर संयुक्त परम । वायुमंडळीं वर्तत ॥ ८१ ॥ श्लोक ॥ **तन्मध्ये त्वात्मज्योतिश्च शिखेव तु विराजते । नीवारशुकवत्तन्वी पीता भास्वत्यणूपमा ॥ १० ॥** टीका—तया-मध्यें आत्मज्योती । बिंदूरूप प्रकाश शक्ती । पीतवर्ण प्रभा दीसी । जाणिजे आत्मानुभवीं ॥ ८२ ॥ यदर्थी श्रुतीवचन । नीवारशुकवत्तन्वी संज्ञेनें । पीता भास्वत्यणूपमा ह्मणोन । वद-

तसे साक्षिरूप ॥ ८३ ॥ श्लोक ॥ तस्याः शिखाया मध्ये च परमात्मा व्यवस्थितः । गुरु-
मुखेन ज्ञातव्यः सोऽन्यथा नोपलभ्यते ॥ ११ ॥ टीका—तया शिखेच्या मध्यस्थ । परमात्मा
व्यवस्थित । गुरुमुखें घेईजे प्रचीत । आन उपाय नलगे भलते ॥ ८४ ॥ श्लोक ॥ अनेकज-
न्मसंस्कारात्सद्गुरुः सेव्यते बुधैः । संतुष्टः श्रीगुरुर्देव आत्मरूपं प्रदर्शयेत् ॥१२॥ टीका—
अनेकजन्मींचा संस्कार जरी असे । तरीच गुरुकृपें कळतसे । ज्ञानी समर्थ जाणती ऐसें ।
येरा सहज अगम्य ॥ ८५ ॥ गुरुकृपा घेतां संपादून । तरीच होईल आत्मदर्शन । कोटि के-
लिया दानपुण्य । न होय जाण आत्मप्राप्ती ॥ ८६ ॥ श्लोक ॥ कोटिसूर्यप्रतीकाशं चंद्रको-
टिसुशीतलं । यथोक्तं वेदशास्त्रैस्तद्ब्रह्मवेद्दृश्यं हि धीमताम् ॥ १३ ॥ टीका—सूर्यकोटीप्र-
काश सुनीळ । कोटिचंद्रांपरी होय शीतळ । उष्णशीत ग्रासोनि सोज्वळ । प्रकाश जाण
शुद्ध तो ॥ ८७ ॥ यथोक्त वेदशास्त्रें बोलती । आदित्यवर्ण श्रुति वदती । बुद्धिमंत तयातें
जाणती । आत्मत्वीं प्रवीण जे ॥ ८८ ॥ श्लोक ॥ आत्मज्योतिः प्रभावेण भान्ति सोमाग्नि-
भानवः । अन्तर्बहिश्च तत्सर्वं व्याप्नोति सकलं जगत् ॥ १४ ॥ टीका—आत्मज्योतीनें शो-
भत । सोमसूर्याग्निप्रभा भासत । पूर्ण चैतन्याचा गर्भित । आत्मस्वरूप तें ॥ ८९ ॥ अंतर्बा-

ह्य व्यापून । जनीं होऊनी जनार्दन । निर्गुणी होय निरंजन । तोचि तो जाणिजे ॥ ९० ॥ ॥ श्लोक ॥ एतदूर्ध्वं शून्यरूपं सहस्रदलमध्यगम् । अर्धमांत्र सुविज्ञेयं प्रणवेन च भूषितम् ॥ १५ ॥ टीका—तदूर्ध्व शून्यरूप असे । सहस्रदळमध्यस्थ जाण कैसें । अर्धमात्रा प्रणवप्रकाशें । कळेल तेथील अनुभव ॥ ९१ ॥ श्लोक ॥ व्याहृत्यादिक्रियाःसर्वा वर्तते हृदि पंकजे । मुख्यं स्थानमिदं ज्ञेयादात्मा तत्रैव तिष्ठति ॥ १६ ॥ टीका—व्याहृत्यादि क्रिया समस्त । हृत्पद्मीं सर्व वर्तत । मुख्य स्थान तेंचि निश्चित । आत्मा तेथें तिष्ठत असे ॥ ९२ ॥ जो सर्व सारांचें सार । जो सर्व सुखांचें माहेर । जयाचेनि सर्व व्यापार । अनेक जाण होताती ॥ ९३ ॥ तें ज्ञानरूप—सागरींचें रत्न । जें सर्व जीवांचें जीवन । जें सच्चिदानंदघन । ॐकारमूळ ॥ ९४ ॥ जयासी नाहीं पाठी पोट । अवघें सभर असे घनदाट । पंचभूतांचा भरोनिया घोट । अससीं आपीं आपलें ॥ ९५ ॥ जेथें नाहीं मीतूंपण । स्वसंवेद्य स्वयें जाण । जें जीवांचें जन्मस्थान । देखतां होईजे तद्रूप ॥ ९६ ॥ जो कर्ता न करविता । परी असे ज्याची सर्व सत्ता । जाणिजे तया हृदयस्था । आत्मारामा ॥ ९७ ॥ जें उन्मनीचें सौंदर्य । जें धृतीचें धैर्य । वेदशास्त्रींचें प्रमेय । विश्रामधाम ॥ ९८ ॥ श्लोक ॥ आत्मदर्शन-

मात्रेण जीवन्मुक्तो न संशयः । तस्मात्सर्व प्रयत्नेन कर्तव्यं स्वात्मदर्शनं ॥१७॥ टीका- तयाचें दर्शन घेतां । प्राणियासि नाहीं भवव्यथा । होय प्राप्त जीवन्मुक्ता । तदर्थी नाहीं संशय ॥ ९९ ॥ यंनिमित्तें साधनें करावी । नाना देवता तीर्थें फिरावीं । अनुष्ठानें आघवीं । करिती जाण यदर्थीं ॥ ४०० ॥ यज्ञ होमादि हवन । वेदशास्त्रादि करिती पठण । क्रिया धर्म सर्व जाण । आत्मप्राप्तीकारणें ॥ १ ॥ एकीं निरंजनें सेविलीं । एकीं सन्यासदीक्षा घेतली । तपादि साधनें केली । पावावया निजपदा ॥ २ ॥ सर्व प्रयत्न करावा । मुख्य आत्माराम दृष्टीं पहावा । आत्मप्रचीति अनुभवावा । गुरुप्रसादें ॥ ३ ॥ जवळी असोनि न दिसे । नयनासि ठक पडलें कैसें । भ्रांतिभरें होऊनि पिसें । आपीं आपणासी भुलले ॥ ४ ॥ कल्पतरूखालीं बैसला । दरिद्री इच्छीत भिक्षेला । काय करावें अदैवाला । कर्म असे बलवंत ॥ ५ ॥ सूर्य दिसे उगवला । उलकां नेत्रीं अंधार पडला । काय कीजे स्वभावगुणाला । अविद्येनें केलें ऐसें असे ॥ ६ ॥ ह्मणोनि संतांसी शरण जावें । त्याच्या वचनीं विश्वासावें । तरीच आत्मसुख पावावें । अन्यत्र उपाय यासी नाहीं ॥ ७ ॥ फिरतां न दिसे भूमंडळा । एरवीं करतळावरी आंवळा । किल्ली जाणतां आत्मकळा । उघडी असे साधकां ॥ ८ ॥ ए-

काग्र करूनि मन । गुरुवचनीं विश्वासोन । तेणें होईजे आत्मदर्शन । विश्वास जाण फल-दायक ॥ ९ ॥ ऐसें मुनीश्वर बोलती । ऋषिसिद्ध पुसे मागुती । तें ऐकावें समर्थ श्रोतीं । कृपा करूनी अवधान दीजे ॥ १० ॥ श्लोक ॥ सूत उवाच ॥ इत्युक्त्वा कपिलः श्रेष्ठः कृतार्थस्तेन संगताः । ऋषिसिद्धाश्च तेऽपाप आत्मरूपे प्रतिष्ठिताः ॥ १८ ॥ टीका—कपिलराज मुनिश्रेष्ठा । कृतकृत्यार्थ केलें वरिष्ठा । भवदुःखाचिया कष्टा । पासूनि सोडाविलें स्वामिया ॥ ११ ॥ श्लोक ॥ ऋ० सि० उ० ॥ हृदि पद्मे स्थितं ब्रह्म विस्तृतं कथितं त्वया । शरीरलक्षणं वेदसंख्यांच कृपया वद ॥ १९ ॥ टीका—त्वत्पद्मगुह्यज्ञान । वेदसंख्या देहल-क्षण । सांगिजे विस्तारेंकरून । तत्वज्ञान स्वप्रभो ॥ १२ ॥ कपिल ह्मणती शिष्यराया । प्राण-सखया ममात्मया । होत प्रश्नें आनंदें या । थोर जाण मानसीं ॥ १३ ॥ वेदसंख्या देह-लक्षण । सांगतों ऐक तेथील खूण । कोणे देहीं कोण कोण । कोण व्यापक कैशीं असती ॥ १४ ॥ श्लोक ॥ क० उ० ॥ आपादाच्छीर्षपर्यंतं मूर्तिरूपं प्रदृश्यते । अकारमातृकं ह्येत-त्ताम्रवर्णसुशोभितम् ॥ २० ॥ टीका—आपाद मूर्धपर्यंत । मूर्तिरूप असे दिसत । अकार-मातृका जाण तेथ । ताम्रवर्ण शोभतसे ॥ १५ ॥ श्लोक ॥ सर्वेंद्रियाणां व्यापार ऋग्वेदो

वर्णितस्तथा । विश्वाभिमानी संप्रोक्तो रजोगुणसमाश्रितः ॥ २१ ॥ टीका—सर्व इंद्रिय-
व्यापार । ऋग्वेद असे निरंतर । विश्वाभिमानी ह्मणती थोर । रजोगुणसमाश्रित ॥ १६ ॥
॥ श्लोक ॥ भूमितत्वं दृश्यरूपं स्थूलभोगस्तथैव च । विपरीतज्ञानयुक्तं तत्र वाग्वैखरी
मता ॥ २२ ॥ टीका—भूमीतत्त्व असे तेथें । स्थूळ भोग जाण निश्चित । विपरीत ज्ञान सं-
युक्त । वाचा जाण वैखरी ॥ १७ ॥ श्लोक ॥ प्रमाणं च तथा प्रोक्तं सार्धहस्तत्रयान्वितं ।
अवस्था जागृतिस्तत्र नेत्रे तेजो यतः स्थितम् ॥ २३ ॥ टीका—प्रमाण औट हस्त असे ।
अवस्था तेथें जागृती वसे । नेत्रस्थानीं प्रकाश दिसे । प्रत्यक्ष कारण जाणिजे ॥ १८ ॥ श्लोक ॥
पंचभूतात्मको देहः पंचविंशतितत्त्वकः । प्रत्येकं भूतमात्रं च शृणु सिद्ध महामुने ॥ २४ ॥
टीका—पांचभौतिक देहे निर्मिले । पाचांचे पंचवीस गुण जाहले । देहचतुष्टयीं व्यापिले ।
कैसे असती ऐक पां ॥ १९ ॥ पंचतत्त्वीं पंचवीस गुण । एकदेहीं असती व्यापून । ते ऐक
विस्तारेंकरून । तत्वसंख्या प्रमाण हें ॥ २० ॥ श्लोक ॥ उत्पत्तिर्जागरो बोधो व्यावृत्तिश्च
चतुर्थिका । कलाचतुष्टयं चैतज्जाग्रतीत्यभिधीयते ॥ २५ ॥ टीका—उत्पात्ति जागृती बोध ।
व्यावृत्ति जाण चतुर्थ शुद्ध । कळाचतुष्टय प्रसिद्ध । जागृत असती जाण पां ॥ २१ ॥ पांच

भूतांचे भाग । स्थूळीं केले असती विभाग । पंचपंचक प्रमाण चांग । गुण पृथक् जाणिजे ॥ २२ ॥ श्लोक ॥ कामः कोधस्तथा लोभो भयं मोहस्तथैव च । आकाशभागाः संप्रोक्ता ज्ञेयाश्चेमे मनीषिभिः ॥२६॥ टीका—लोभ काम आणि क्रोध । भय मोह करीत बद्ध । जयांचा पराक्रम अगाध । थोर जाण जगामाजीं ॥ २३ ॥ अगा हे पंच वैरी दुर्धर । जगामाजीं अति क्रूर । ज्ञानियासी झुंझार । पैज घेउनी करिती ॥ २४ ॥ त्यांची बहुत आहे ख्याती । हे तों ऐकलीच आहे वदंती । ब्रह्मरूपीं घेतां रती । तेही सुख पावती ॥ २५ ॥ सर्व आहे मनाचा विकार । मनीं लक्षितां परात्पर । होय आत्मसाक्षात्कार । तेही होती तद्रूप ॥ २६ ॥ एक देव विषय करावा । आत्मरस नित्य सेवावा । मग सर्व इंद्रियें समभावा । तद्रूपीं मिळती ॥ २७ ॥ काम क्रोध सर्वीं वसती । आणि ज्ञानियाच्या ठायींही असती । भर्जितबीजन्यायरीति । असती जाण तये स्थळीं ॥ २८ ॥ बीज भाजूनि पेरिलें । तें न जाये जेंवीं उद्भवलें । तेंवीं चित्त नव्हे भंगलें । ज्ञानियाचें जाण पां ॥ २९ ॥ त्रिगुणांच्या उर्म्या येती जाती । परी तेथें असे शमदमसंपत्ती । तें जाण सहज आवरती । ज्ञानबोधें निश्चळ ॥ ३० ॥ ज्ञानियासी राग जरी आला । नच जाय घात कोणाचा केला । जो आत्मरंगें रंग-

ला । तयासी ते काय करितील ॥ ३१ ॥ ह्मणा ज्ञानियासी राग आला । तरी त्रिगुणात्मक देह असे निर्मिला । तया कैसा जाय वर्जिला । अधिकारी तेथींचा ॥ ३२ ॥ चंद्राबिंब उदकीं हालत । वायुवेगें पसरत । परी मुख्य बिंब नाहीं चळत । स्थिर असे सहजत्वीं ॥ ३३ ॥ तैसा ज्ञानिया जाणिजे । जो काम क्रोधीं न लिंपिजे । बोलणें लागलें सहजें । आकाशगुण जाण हे ॥ ३४ ॥ कथा वाढेल पुढती । हे जाण आकाशगुणख्याती । अनायासें आली वचनोक्ति । प्रमेयमात्र कारण ॥३५॥ ज्ञानी जे असती समर्थ । तयांसीच कळे येथींचा मथितार्थ । येरा न कळे भावार्थ । जाण येथींचा सर्वथा ॥ ३६ ॥ वायुभागलक्षण । स्थूळीं असती व्यापून । ऐकिजे तयांची खूण । बोलिले असती जे ॥ ३७ ॥ **श्लोक ॥ प्रसरणं चंचलत्वं गमनागमनं तथा । भ्रमणाकुंचनं पंच वायुभागा इति स्मृतम् ॥ २७ ॥ टीका**—प्रसरण आणि चंचलत्व । आयागमन तिसरा स्वभाव । भ्रमणाकुंचन पंचममेव । वायुभाग जाणिजे ॥ ३८ ॥ तेजगुण व्यापक । ऐकिजे तयांचें कौतुक । स्थूळदेहीं पंचक । कैशापरी असती ॥ ३९ ॥ **श्लोक ॥ निद्रा भोगो रतिश्चैव क्षुधा तृषा तथैव च । भागा आलस्यमित्येव स्थूले पंच प्रशंसिताः ॥२८॥ टीका**— निद्रा आणि भोगजाती । क्षुधातृषा जे लागती । आळस येतसे सहजस्थिती । पंच गुण

तेजाचे ॥ ४० ॥ आपतत्त्वाचा विचार । ऐकिजे होउनी सादर । व्यापूनि असती शरीर । स्थूळाकारीं ॥ ४१ ॥ श्लोक ॥ श्लेष्मा शुक्रं तथा रक्तं मूत्रं मेदस्तु पंचकम् । जलभागास्तु भो विप्र इत्येवं संप्रकीर्तिताः ॥ २९ ॥ टीका—श्लेष्मा शुक्र आणि रक्त । मूत्र मेद पांचवें होत । गुण जाणणें हे तेथें । आपतत्त्वाचे असती ॥ ४२ ॥ पृथ्वीगुणांचें माहिमान । देहीं वसती कैसे जाण । ऐकिजे तयांचें प्रमाण । यथाक्रमें बोलिजे ॥ ४३ ॥ श्लोक ॥ रोमत्वङ्मांसनाड्यो वै अस्थीनीति तथा मताः । पथ्वीभागा इमे पंच विज्ञेयास्तु मनीषिभिः ॥ ३० ॥ टीका—रोम त्वचा आणि मांसा । नाडी अस्थी जाण अशा । भूतत्त्वाच्या प्रकाशा । पंच गुण निर्मिले ॥ ४४ ॥ श्लोक ॥ इदं पंचगुणाख्यानं सविभागं सुविस्तृतम् । एकैकस्य च भूतानां ज्ञातव्यं तु मनीषिभिः ॥ ३१ ॥ टीका—ऐसें पंचगुणांचें आख्यान । यथाभाग यथागुण । पंच पंच सांगितले जाण । व्यापक होउनी आसिजे ॥ ४५ ॥ श्लोक ॥ इत्युक्तः स्थूलविस्तारस्तारकं नवरूपकम् । व्यापकं सर्वदेहानां दृश्यते चर्मचक्षुषा ॥३२॥ टीका—ऐसा स्थूळाचा विस्तार । सांगितला असे सविस्तर । तारकरूप नवप्रकार । व्यापक असती सर्वदेहीं ॥ ४६ ॥ हे देहीं जाणिजे स्थित । सर्वीं असे वर्तत । चर्मचक्षूसी दिसत ।

स्थूळ देहीं ॥ ४७ ॥ श्लोक ॥ अथ सूक्ष्मशरीरं तद्वर्णव्यक्तिं तथैव च । स्थानं कर्म क्रियाः सर्वाः स्वस्थचित्तेन त्वं शृणु ॥ ३३ ॥ टीका—सूक्ष्म शरीराचें विवरण । वर्णव्यक्ती-लक्षण । स्थान कर्म क्रिया सर्व जाण । स्वस्थचित्तें श्रवण कीजे ॥ ४८ ॥ श्लोक ॥ अपंचीकृतभूतेभ्यो लिंगदेहः स उच्यते । स्थानं कण्ठप्रदेशस्तु गुणः सत्वः प्रकीर्तितः ॥ ३४ ॥ टीका— अपंचीकृत जे असत । लिंगदेह नाम उचित । स्थान कंठ देहीं वसत । सत्वगुण जाण तेथें ॥ ४९ ॥ श्लोक ॥ उकारमातृका तत्र स्वप्नावस्थाऽभिधीयते । तत्राऽन्यथाज्ञानमास्ति वायुतत्त्वं प्रतिष्ठितम् ॥३५॥ टीका—उकारमातृका जेथें असे । स्वप्नावस्था जाण वसे । अन्य-था ज्ञान प्रकाशे । वायुतत्त्व असे तेथें ॥ ५० ॥ श्लोक ॥ शुक्लवर्णात्मकं रूपं वाक्तथा मध्यमा स्मृता । यजुर्वेदः स विज्ञेयो मनो वैकारिकं स्मृतम् ॥ ३६ ॥ टीका—शुभ्र असे शुक्लवर्ण । वाचा मध्यमा प्रमाण । यजुर्वेद असे जाण । मन वैकारिक तेथींचें ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ अंगुष्ठमात्रं संप्रोक्तं साभिमानं तु तैजसम् । प्रविविक्तं च भोगाख्यं शरीरं सूक्ष्मकं स्मृतम् ॥ ३७ ॥ टीका—वपु अंगुष्ठमात्र असे । साभिमानी तैजस प्रकाशे । प्रवि-विक्त भोगा भोगितसे । शरीर सूक्ष्म जाण तें ॥ ५२ ॥ श्लोक ॥ यद्यं भावं समापन्नं साद्द-

श्यं तेन तस्य वै । मनो वैकारिकं सर्वं स्वप्नावस्थाचतुष्टये ॥ ३८ ॥ टीका–लिंगदेहींचा स्वभाव । सादृश्य दावी भाव । सत्य मिथ्या स्वभाव । स्वप्नीं जाण भासत ॥ ५३ ॥ तेथें मन असे वासनात्मक । होय तेथींचें वैकारिक । जागृती देखे जें जें कौतुक । बीज तेंचि स्वप्नासी ॥ ५४ ॥ जन्मजन्मांतरींचा शेष । नानापरीचे भासती भास । वासनात्मक बीज सारांश । कारण असे लिंगदेहीं ॥ ५५ ॥ श्लोक ॥ **बुद्ध्यंतःकरणे चैव मनश्चित्तमहंकृतिः । आकाशभागा विज्ञेयाः पंचैवेमे मनीषिभिः ॥ ३९ ॥** टीका–अंतःकरण मन बुद्धि चित्त । अहंकार पांचवा निश्चित । आकाशभाग जाण असत । लिंगदेहीं पांच हे ॥ ५६ ॥ श्लोक ॥ **व्यानः समानोदानौच प्राणापानौ तथैव च । एतद्वै पंचकं प्रोक्तं वायुभागस्य पण्डितैः ॥ ४० ॥** टीका–व्यान समान उदान । प्राण आणि अपान । वायुभाग असती जाण । पंचवायु व्यापक ॥५७॥श्लोक॥ **श्रोत्रं त्वक्चक्षुषी जिव्हा घ्राणं पंचममेव च । तेजोभागा इमे ज्ञेयाः सूक्ष्मदेहेषु चारिणः ॥ ४१ ॥** टीका–श्रोत्र त्वचा चक्षु घ्राण । रसनादि पंच प्रमाण । हे तेजाचे भाग लक्षण । सूक्ष्मदेहीं तिष्ठती ॥ ५८ ॥ श्लोक ॥ **वाक्पाणिपादौ शिश्नंच गुदं वै पंचमं स्मृतम् । अपां पंच विभागास्तु इमे सन्ति प्रकीर्तिताः ॥ ४२ ॥** टीका–वाचा पाणी पाद शिश्न । गुद तें पं-

चम जाण । आपगुण असती लीन । देहीं तेथें जाण पां ॥ ५९ ॥ श्लोक ॥ शब्दः स्पर्शश्च रूपं च रसो गंधस्तथैव च । एतत्तु पंचकं तत्र पृथ्वीभागस्य प्रोच्यते ॥ ४३ ॥ टीका– शब्द स्पर्श रूप रस । पांचवा तो गंधांश । हे जाणिजे पृथ्वीअंश । भाग असती लिंगदेहीं ॥६०॥श्लोक॥ पंचभिः पंचभिर्ह्येतच्छरीरं लिंगसंज्ञितम् । यत्स्थानं कण्ठदेशश्च यच्च सूक्ष्मतरं स्मृतम् ॥ ४४ ॥ टीका–तत्त्वपंचपंचक । लिंगदेहीं जाण संज्ञिक । स्थान कंठदेशीं अवलोक । तनू सूक्ष्म जाणिजे ॥ ६१ ॥ श्लोक ॥ स्थूलदेहस्य मध्यस्थः श्वेतवर्णविराजितः । जीव क्रीडती तत्रैव तदूर्ध्वं हृदि सूक्ष्मकम् ॥ ४५ ॥ टीका–स्थूळदेहीं मध्यस्थ । श्वेतवर्ण विराजित । तेथें जीव असे क्रीडत । तदूर्ध्व त्हृदय असे ॥ ६२ ॥ श्लोक ॥ शरीरं कारणं चास्ते पंचविंशतितत्त्वकम् । गुणरूपे तथा वर्णस्थानकर्माणिदैवतम् ॥ ४६ ॥ टीका– सांगों देहे कारण । पंचवीस तत्त्वांचें मंडण । गुणरूप आणि वर्ण । स्थान कर्म दैवत ॥ ६३ ॥ श्लोक ॥ तत्सर्वं कथयिष्यामि स्वस्थचित्तेन संशृणु । कारणं त्हृदयस्थाने तमोगुणसमुद्भवम् ॥ ४७ ॥ प्राज्ञोऽभिमानी तत्रस्थो भोग आनंद एव च । मकारमातृका यत्र अवस्थातु सुषुप्तिका ॥ ४८ ॥ टीका–सविस्तारें सांगों तुजप्रती । ऐकें सावधान क-

रोनि वृत्ती । कारण देहींच स्थिति । सांगेन ऐक सुजाणा ॥ ६४ ॥ तमोगुण तेथें वसे । प्राज्ञ अभिमानी तयाचा असे । भोग आनंद भोगीतसे । मकार मातृका तेथींची ॥ ६५ ॥ अवस्था जाण सुषुप्ती । जे गाढ मूढ निद्रा ह्मणती । नाहीं स्मरण पडे विस्मृति । केवळ जे अज्ञानदशा ॥ ६६ ॥ श्लोक ॥ अज्ञानं तेजसस्तत्त्वं कृष्णरूपं च दृश्यते ॥ देह पर्वार्धमात्रो हि पश्यन्ती वाक्च संस्मृता ॥ ४९ ॥ सामवेदस्तु विज्ञेयो हृदि पद्मे सुशोभितम् । तेजोमयं मण्डलं च वर्तते सर्वदेहिनाम् ॥ ५० ॥ टीका—अज्ञान तेज-तत्त्वदर्शन । रूप अज्ञान तेंचि कारण । तेथींचा जाणिजे कृष्णवर्ण । पर्वार्ध जाण देह असे ॥ ६७ ॥ वाचा तेथें पश्यंती असे । सामवेद वसतसे । हृदयपद्म शोभिवंत दिसे । वर्तत जाण सर्व देहीं ॥ ६८ ॥ तेजोमय मंडळ । प्रकाश असे सोज्वळ । सुषुप्ती आनंद असे बहळ । होत जाण ते ठायीं ॥ ६९ ॥ अज्ञान ह्मणणें हेंचि कारण । तेथें नाहीं जीवपण । वृत्तीसी नाहीं आठवण । विरोनि जाय आनंदीं ॥ ७० ॥ तेथींचाही साक्षी आत्मा असे । तोचि सर्व जाणतसे । अज्ञानरूपीं बीज सूक्ष्म वसे । तेणें होय सावध ॥ ७१ ॥ अज्ञान बीज नासतें । तरी समाधिसुख तेंचि होतें । अभ्यास साधनें किमर्थ तेथें । कासया करावीं लागतीं ॥७२॥ अमा-

वास्ये चंद्र जैसा । अंधकार दिसे सर्व कसा । परी बीजरूप सूक्ष्मकळेचा कसा । भाव असे तेथें पाहीं ॥ ७३ ॥ सुषुप्तीच्या कळा चारी । ऐकिजे त्यांची नवल परी । वेद समर्थ वैखरी । मुनिराजयाची ॥ ७४ ॥ श्लोक ॥ मरणं विस्मृतिर्मूर्च्छा निद्रा च तमसावृता । कलाच-तुष्टययुता सुषुप्तीत्यभिधीयते ॥ ५१ ॥ टीका–विस्मृति आणि मरण । मूर्च्छा निद्रा चतुर्थ जाण । सुषुप्तिकेचें लक्षण । तमोगुणीं वर्ततसे ॥ ७५ ॥ श्लोक ॥ अवकाशो विस्मृतिश्चाऽऽवरणं निरावरणम् । प्रमाणत्वमिमे भागा आकाशस्य प्रकीर्तिताः ॥ ५२ ॥ टीका–कार-णीं गुण आकाश । विस्मृति आणि अवकाश । आवरण तृतीय भागांश । निरावरण प्रमाणत्व पांचवें ॥ ७६ ॥ श्लोक ॥ भ्रांति शंका शोषणं च शिथिलीकरणं तथा । धीरत्वमिति पंचै-व वायुभागाः प्रकीर्तिताः ॥ ५३ ॥ टीका–भ्रांती शंका शोषण । धीरत्व शिथिलीकरण । वायुभाग असती जाण । कारणदेहीं ॥ ७७ ॥ श्लोक ॥ गूढरूढकृतघ्नत्वान्यविचारश्चतुर्थकः । सक्लेशत्वमिमे पंच तेजोभागाः प्रशंसिताः ॥ ५४ ॥ टीका–गूढ रूढ कृतघ्न । अविचारत्व चतुर्थक जाण । सक्लेशत्व पांचवें प्रमाण । तेजभाग कारणीं ॥ ७८ ॥ श्लोक ॥ मृदुत्वं शोष-णत्वं च हलाहलत्वमेव च । क्लेदनं धारणत्वं च जलभागाः प्रशंसिताः ॥ ५५ ॥ टीका–

मृदुत्व शोषणत्व । हळाहळत्व तिसरें तत्त्व । क्लेदन आणि धारणत्व । पंचभाग आपाचे ॥७९॥ ॥ श्लोक ॥ मूढत्वं च बलित्वं च लज्जावत्त्वं तृतीयकम् । पिंडीकरणमेवंहि काठिण्यं पंचमं स्मृतम् ॥ ५६ ॥ एवं हि पंचकं प्रोक्तं पृथ्वीभागस्य कोविदैः । ह्येवं कारणं ज्ञेयं शरीरंतु तृतीयकम् ॥५७॥ टीका—मूढत्व आणि बळ जाण । लज्जा पिंडीकरण कठिण । पंचम जाणिजे लक्षण । पृथ्वीभाग असती ॥ ८० ॥ कारणदेहाचा विस्तार । सांगितला असे सविस्तर । गुरु वदवी तैसें उत्तर । वाचा बोले तदाज्ञेकरूनी ॥ ८१ ॥ श्लोक ॥ एतदूर्ध्वं तु देहेषु महाकारणमुच्यते । स्थानमैश्वरमाख्यातं जीवत्वं तत्र लीयते ॥ ५८ ॥ तत्सर्वं शृणु भो विप्र विस्तृतं कथयाम्यहम् । शुद्धसत्वगुणं प्रोक्तं प्रत्यगात्माभिमानिनम् ॥ ५९ ॥ स्थानं मूर्धेति विज्ञेयं तथा भोगावभासकम् । तुर्यावस्थाह्यर्धमात्रा विवेकज्ञानमाश्रिता ॥ ६० ॥ टीका—याहूनि ऊर्ध्व महाकारण । हृदय असे परम पावन । विश्रांतिसुखाचें स्थान । आनंदमय जें ॥ ८२ ॥ महाकारण देहीं अनुभव । जो सर्व सुखांचा ठाव । ज्ञानी जाणती तेथींचा भाव । अनुभवेंकरूनि ॥ ८३ ॥ तीन देह जाणोनि । जो लीन होय महाकारणीं । तोचि घेत स्वानंदधणी । आपीं आपुल्या ठायीं ॥ ८४ ॥ हें आहे गुरुगम्य । ब्रह्मभुवनीं जें निजरम्य । अ-

नुभवावांचूनि अगम्य । शब्दज्ञानीं नेणवे ॥८५॥ स्थान ईश्वर विख्यात । जीव असे क्रीडत । तें तूं ऐक कौतुक । मनासी श्रवण करूनि ॥ ८६ ॥ तेथें असिजे शुद्धसत्वगुणीं । प्रत्यगात्मा होय अभिमानी । स्थान जाणिजे मूर्धीं । भोगावभास तेथिंचा ॥८७॥ तूर्या अवस्था तेथींची । जी साक्षिणी होय सर्वांची । लहरी सच्चिदानंदाची । आनंद उल्लासत ॥ ८८ ॥ जे सर्वांची जीवनकळा । जिचेनि भोगिजे स्वात्मसोहळा । आत्मत्वाचा जिव्हाळा । तेचि जाण दाखवी ॥ ८९ ॥ जिचेनि होय प्रकाश । दावित आत्मत्वीं सौरस । नाना क्रीडा विलास । भोगवी जे आत्मत्वीं ॥ ९० ॥ सर्व तें जे चेष्टवी । शुद्ध माया जे लाघवी । तेहि इंद्रियांतें चाळवी । सामर्थ्य शक्ति जाणते ॥९१॥ जहालिया तुर्यादर्शन । स्वानंदभोगीं करी क्रीडन । स्वर्गादि पदें तुच्छ मानून । सुख भोगी आत्मत्वीं ॥ ९२ ॥ ज्ञानगोष्टी बहु कथीत । आत्मा ह्मणती त्रिपुटींत । निर्गुण निरंजन अव्यक्त । देहीं वचनीं बोलती ॥ ९३ ॥ अभ्यासीं दृढ नव्हती । कैसेनि होय अनुभवप्राप्ती । शब्दज्ञानी बोलतां व्युत्पत्ति । प्राप्त नव्हे आत्मकळा ॥ ९४ ॥ साखर गोड आहे बरवी । परी जिव्हेसी न कळे अनुभवीं । तरी ते व्यर्थ चावटी आघवी । जंववरी न कळे अनुभव ॥ ९५ ॥ चाटू सर्व

पक्कान्नीं फिरत । परंतु चवी नसे तो जाणत । तैसें अनुभवेंवीण होत । जवळी असोनि प्राप्ती नाहीं ॥ ९६ ॥ जो कां दिवटी धरी हातीं । त्याच्या प्रकाशें सर्व चालती । ते असे जयाचे हातीं । तोचि ठेंचा खातसे ॥ ९७ ॥ बोलावया हेंचि कारण । अभ्यास करावा दृढ-निश्चयें जाण । जाऊनी संतासी शरण । स्वहित आपुलें करावें ॥९८॥ अभ्यासें सर्व घडे । विष खातां पचनीं पडे । मेरूशिखरीं चढों पडे । अभ्यासपंथी चालतां ॥ ९९ ॥ तुर्येचें करितां विवरण । सहज आलें विचारण । श्रोतीं न ठेवावें दूषण । आज्ञा तुमची बोलवी ॥ ५०० ॥ येथें बोध मनासीच होत । समजणें आपीं आपणांत । दुजें आणावें कोण तेथ । वस्तु पाहतां एकचि होय ॥ १ ॥ महाकारणाचें विवरण । राहिलें असे कथन । ऐकिजे समर्थ कृपा करून । बोलले समर्थ महामुनी ॥ २ ॥ अर्धमात्रा असे तेथ । विवेकज्ञान समाश्रित । महाकारणीं वसत । सांगेन ऐका सर्वहीं ॥ ३ ॥ **श्लोक ॥ दृश्यरूपं वायुतत्त्वं नीलवर्णं विराजते । देहो मसुरमात्रस्तु परा वाणी ह्यथर्वणः ॥ ६१ ॥** टीका—दृश्यरूप वायुतत्त्व । नीळवर्ण असे भाव । देह प्रमाण मसूरमात्र स्वयमेव । परावाचा अथर्वण ॥ ४ ॥ **श्लोक ॥ महाकारणदेहोऽयं वर्तते वायुमण्डले । कला चाष्टदला प्रोक्ता महाकारणसंज्ञिता ॥ ६२ ॥**

टीका-महाकारण देहे । वायुमंडळीं असें पाहे । कळा अष्टदल तों हें । देहें जाण चतुर्थ असे ॥५॥ श्लोक ॥ वैराग्यं च मुमुक्षुत्वं मात्मत्वं तत्त्वदर्शनम् । कलाचतुष्टयं चैव तुर्यावस्थाऽभिधीयते ॥ ६३ ॥ टीका—वैराग्य आणि मुमुक्षुत्त्व । तत्वदर्शन आत्मत्व । कळाचतुष्टयस्वभाव । तुर्या अवस्था भाग हे ॥ ६ ॥ श्लोक ॥ असंगत्वं च पूर्णत्वं व्यापकत्वं तृतीयकम् । सर्वबीजमखण्डत्वमिदमाकाशपंचकम् ॥६४॥ टीका—पूर्णत्व असंगत्व । व्यापकत्व सर्वबीजत्व । आणिक अखंडत्व । आकाशांश महाकारणीं ॥७॥श्लोक॥ अच्छेद्यत्वमजत्वं च परात्परत्वनैर्मल्ये । अजरत्वमिमे पंच वायुभागाः प्रशंसिताः॥६५॥टीका—अजत्व अच्छेद्यत्व। परात्परत्व निर्मळत्व । पांचवें तें अजरत्व । वायुभाग तेथें जाणपां ॥८॥श्लोक॥ ऊर्ध्वपदमदाह्यत्वं प्रकाशत्वं तथैव च । चैतन्यं च त्वनर्घ्यत्वं तेजोभागाः प्रकीर्तिताः ॥ ६६ ॥ टीका—अदाह्यत्व ऊर्ध्वपद प्रकाश । चैतन्य अनर्घ्यत्व पंचांश । तेज तत्त्वाचा सारांश । असे जाण चतुर्थ देहीं ॥ ९ ॥ श्लोक ॥ अक्लेद्यविश्वजीवत्वे ज्योतिरसत्वमेवच । कारुण्यममृतत्वंच ह्यपां भागास्तु पंच वै ॥ ६७ ॥ टीका—अक्लेद्यत्व जगज्जीव । रसरूपत्व अमृतत्व । पांचवें तें करुणत्व । आपभाग जाणिजे ॥ १० ॥ श्लोक ॥ अशोष्यत्वं कारणत्वं पावनत्वमिति

स्मृतम् । आधारत्वं समृद्धत्वं पृथ्वीभागाः प्रशंसिताः ॥६८॥ टीका—अशोष्यत्व कारणत्व। पावनत्व समृद्धित्व। पांचवें जाण आधारत्व। पृथ्वीभाग महाकारणीं ॥ ११ ॥ श्लोक ॥ विस्तरेण हि संप्रोक्तमंशतत्त्वं तु यद्भदेत् । तदेव सर्वतत्त्वेषु महाकारणमुच्यते॥ ६९॥ टीका— विस्तारें करूनि सांगितलें। अंशतत्त्व निवेदिलें। पंच पंच असें बोलिलें। महाकारणीं संज्ञित ॥ १२ ॥ श्लोकाचा भाव जाणोन। केलें असे विवरण। यथामती गुरुआज्ञेकरून। बोलवी तैसें बोलिलों ॥ १३ ॥ शास्त्र प्रमेय कठिण। काव्य व्याकरणादि नाहीं पठण। परी आत्मसंधानीं हेतु पूर्ण। म्हणोनी केली कर्मणूक ॥ १४ ॥ श्लोक ॥ देहमध्ये महाश्रेष्ठो नारीकेलफलाम्बुवत् । आन्तरादान्तरः प्रोक्तः सर्वत्राऽऽत्मा समाश्रितः ॥ ७० ॥ टीका— देहामध्यें महाश्रेष्ठ जाण। अंतरांत अंतर असे लहान। नारिकेलफलवस्तु प्रमाण। गूढ असे बीज जें ॥ १५ ॥ अवघा पाहतां एकचि नारळ। सर्व अंगीं एकचि फळ। परी अंतरीं असे गोड़ खोबरें जळ। गूढत्व असे गर्भ त्याचा ॥ १६ ॥ वान्तर सर्व फळें खात। नारळ १७ हातींचे टाकूनि देत। न कळे येथील भावार्थ। म्हणोनियां अव्हेरी ॥ १७ ॥ तैशीं नाना दैवतें करी। आत्मा आहे हा न कळे अंतरीं। ज्याचेनि असे सर्व व्यवहारीं। तयासी जाण

विसरला ॥ १८ ॥ आप आपणा कैसा भुलला । मी कोण हा विचार नाहीं केला । जीव असे गुंतला । मायाभ्रांतीं ॥ १९ ॥ म्हणे माझा हा संसार । रात्रंदिवस करितसे घोर । कैसा मंदमती अविचार । न करी कांहीं स्वहित जो ॥ २० ॥ टाकूनि गंगेचें जिवन । धांवत असे मृगजळालागून । दुःख भोगी हिंपुटी होऊन । आपला आपण व्यर्थ हा ॥२१॥ अमृत टाकूनि घेतली कांजी । ऐसा जन्मोनि काय पाजी । भूमिभार होवोनि सहजी । विचरे पशुवत् प्राणी तो ॥ २२ ॥ आहा कैसी माय व्याली । नव्हती कां वांझ जाहली । व्यर्थ नरतनू गमाविली । सार्थक नाहीं जन्मोनि ॥ २३ ॥ वय मात्र वायां गेलें । अयुष्यधन गमाविलें । आत्मत्व नाहीं साधिलें । वृथा जन्म गमाविला ॥ २४ ॥ नरदेहासारिखें निधान । सांपडलें चौऱ्यायशीं लक्ष फिरोन । काकतालीयन्यायें अवचितें जाण । हातासी आलें बहु-प्रयत्नें ॥२५॥ येथें जेणें आळस केला । जन्म त्याचा निर्फळ जाहला । अलभ्य लाभ गमाविला । भवदुःख भोगीतसे ॥ २६ ॥ जाण देह क्षणभंगुर । जाईल न लागतां उशीर । देहीं बुद्धि धरोनि सार । किमर्थ म्हणतीं संसार ॥२७॥ जैसा येसी तैसा जासी । संसार स्वप्न जाण मानसीं । मिथ्या होय न ये हातासी । दर्पणींचें धन जैसें ॥ २८ ॥

दारिद्री स्वप्नीं राजा झाला । राज्यभोग भोगूं लागला । जागृतीं येतां भेटला । दारिद्रपणा तयासी ॥ २९ ॥ स्वप्नीं लाभ हानी जाहली । दोन्ही मिथ्या बोलतां बोलीं । जागृती होतां मिथ्या भासली । संसारीं सुख दुःख तयापरी ॥ ३० ॥ संसारीं जो जागा झाला । तो न मानी सुखदुःखाला । प्रारब्धयोगें भोग भोगिला । वर्तें जाण तदनुसार ॥ ३१ ॥ असोनियां देहांत । उदासीनपणें वर्तत । शेतीं राखण जैसें ठेवित । साक्षमात्र करोनियां ॥ ३२ ॥ षड्रस पक्कान्न वाढियलें । त्यांत विष असे पडलें । तें जाणतां जेविलें । होईल जाण कैशापरी ॥ ३३ ॥ तैसें अनित्य हें भासतां । मग काय बाधें शके ममता । असोनी जाण अलिप्तता । पर्वत आसिजे संसारीं ॥ ३४ ॥ बहु दृष्टांत बोलतां । वाढेल जाण ग्रंथकथा । मागें समर्थ बोलिल्या अर्था । तेचि प्रीति जाणिजे ॥ ३५ ॥ नारीकेलफल दृष्टांतीं । तेथूनि चालली वचनोक्ति । गुरु सूत्र हालविती । तैसें हाले सूत्र हें ॥३६॥ वावडी लांब जरी गेली । सूत्र ओढितां तेथेंचि आली । सर्व जाण तयेची किल्ली । प्रमाण असे दोरचि तो ॥ ३७ ॥ मर्कटें नारळ टाकिलें । गुह्य अंतर न जाणिलें । तैसें विषयलंपट आंधळें । आत्मफळ आव्हेरी ॥ ३८ ॥ सर्वांहूनि श्रेष्ठ बीज । गुह्याचें परम गुज ।

आत्मा तेथें क्रीडत सहज । तदाश्रयें जाण पां ॥ ३९ ॥ चहूं देहांचें लक्षण । स्थूळ सूक्ष्म कारण महाकारण । सांगितलें विस्तारेंकरून । गुरुआज्ञें यथामती ॥ ४० ॥ श्लोक ॥ त्रिपुरक्रीडया बाह्ये जीवेत्याख्यं स गच्छति । जहदजहद्भावात्तु सैष जीवः सदाशिवः ॥७१॥ टीका—स्थूल सूक्ष्म कारण । देहत्रयीं क्रीडन । नाम जीव हें पावोन । वर्तत असे सहज-स्थिति ॥ ४१ ॥ अहंदेहभाव जाण । जीव तोचि शिव होय आपण । टाकितां अज्ञान का-रण । तोचि होय परमात्मा ॥ ४२ ॥ श्लोक ॥ त्रिपुरक्रीडतश्चान्तो ह्यवस्था तून्मनी ततः । शब्दश्च जायते तत्र लक्षणा च तृतीयका ॥ ७२ ॥ टीका—अंतरीं त्रिपुटी क्रिया करूनी । अवस्था भोगिजे उन्मनी । निःशब्द होय तये स्थानीं । लक्षणत्रय जाण हें ॥ ४३ ॥ देहे चतुर्थ परमपावन । सांगितलें महाकारण । जीवशिवांचें समाधान । विश्रामधाम सुखमय ॥ ४४ ॥ तत्त्वमसि विज्ञान । जें गुरुगुह्य परमपावन । ब्रह्मभुवनस्थान । कैवल्यरूप ॥ ४५ ॥ जेथें वाचेसी मौन पडे । वेदांसी होय कानडें । मन पाहों जातां बुडे । विसरे मागील आठ-वण ॥ ४६ ॥ जें आपआपणां विसरे । मीतूंपण जेथें झुरे । चित्तचतुष्टय विरे । कांहीं नाहीं ऐसें जें ॥ ४७ ॥ जें सर्व तेजांचें तेज । सर्व बीजांचें जें बीज । गुजांचें होईल निजगुज ।

परमतत्त्व जाणिजे ॥ ४८ ॥ होय आनंदाचा आनंद । अमृताचा होत स्वाद । सर्व सुखांचा सुखकंद । योगी रमती अखंड जेथें ॥ ४९ ॥ शब्द आलीकडेच राहिला । परी अनुभव तयासीच मानवला । अबोलीं बोलती बोला । पावोनियां निजप्राप्ती ॥ ५० ॥ शब्दीं थोर उपकार केला । मार्ग दाउनी आपण निमाला । निमोनि असे उरला । कौतुक थोर लाघव हें ॥ ५१ ॥ गडद अंधारीं वस्तु पडली । ते कैशी जाय हातीं सांपडली । दीपप्रकाशें दृष्टीस भासली । यथार्थ जाण निश्चयें ॥ ५२ ॥ वस्तु हातीं सांपडतां । दीपीं सहजचि होय स्थिरता । तैसें शब्दें दावूनि वस्तुतां । आपण राहे उगला ॥ ५३ ॥ मग बुद्धीसी ठक पडे । तें शब्दीं कैसें सांपडे । ऐशी आशंका जरी तेथें घडे । ऐकिजे विचार तयाचा ॥ ५४ ॥ कवण एक अंधारीं बैसला । पाही आपुल्या अवयवांला । कांहींच न दिसे तयाला । गडद सर्व पडिलें असे ॥ ५५ ॥ परी आपलेपणा नाहीं विसरला । मी आहें हा भाव राहिला । तैसा शब्दें रीग केला । मिळोनि जाण उरतसे ॥ ५६ ॥ मीठ जळीं विरालें । तरी क्षारत्व नाहीं गेलें । तैसें ज्ञप्तिमात्र उरलें । तेंचि तें बोलावया ॥ ५७ ॥ आठवीं नाठवीं असतें । समाधिविधानीं भासतें । कांहीं न होऊनि जें उरतें । वस्तु जाण घनदाट ॥ ५८ ॥ काय सांगिजे

कौतुक । अनुभवी जाणती लोक । येरां ऐकतां पडे ठक । काय कैसें ह्मणोनियां ॥ ५९ ॥ फुटकीया भांडियांत । रांधिलें गोडी परमामृत । चाखों जाऊं ह्मणतां तेथ । जीव जात शिव होऊनी ॥ ६० ॥ राउतावरी बैसे घोडें । ऐसें आहे जें कांहीं कोहडें । तोचि जाण ब्रह्मगिरीं चढे । निजात्मशूर जाण जो ॥ ६१ ॥ प्रणव-कमान ओढून । दोन्ही सोडी लक्षूनि बाण । एकचि घायेंकरूनि जाण । ठाव तेथें उरों नेदी ॥ ६२ ॥ अचुक संधान लाविलें । अलक्षीं लक्ष भेदिलें । द्वैत जाण उडविलें । सहजीं सहज तेथें हें ॥ ६३ ॥ विषय कटक बुडविलें । षड्वैरी धरूनि आणिले । सहज पंथीं लागले । सेवक होऊनि तिष्ठती ॥ ६४ ॥ बोध-हस्ती चालविला । प्रेममदें जो मातला । ध्याननिशाणें शोभला । आत्मगौरव अळंकारीं ॥ ६५ ॥ प्रकाश चवरें वरी झळकत । विद्युत्प्राय भासत । विवेक शुद्ध अंकुश असत । अभ्यास पाउलीं चालणें ॥ ६६ ॥ बैसोनि आनंद चौरडौलीं । डुल्लत असे निजात्मडोलीं । उन्मनी मदिरा असे भक्षिली । निजात्मभुलीं भुलला ॥ ६७ ॥ अनुहतभेरी वाजती । ध्वनी गगनीं उठती । दश नादादि गर्जती । थोर घोष ॥ ६८ ॥ राजयोगी राज्य करी । बैसोनि निजपदावरी । सत्ता एकचि अवधारी । छत्र होय एक तें ॥ ६९ ॥ सहज सुखें क्रीडा करी । भोगी

तुर्या परम सुंदरी । सच्चिदानंद घेत लहरी । आपीं आपणा जाणिजे ॥ ७० ॥ सुख भोगणें भोग्यता । हेही तेथें नसे योग्यता । द्वैतपणाची वार्ता । विरोनि जाय तये स्थळीं ॥ ७१ ॥ जाणें येणें आत्मया नाहीं । तो अखंड असे ठायींचा ठायीं । साक्षीमात्र होऊनि देहीं । वर्तत असे स्वच्छंदें ॥ ७२ ॥ आकाश असे व्यापून । सर्व पदार्थ मात्र जाणोन । लिप्त नव्हे सहसा जाण । असोनियां सर्वांत ॥ ७३ ॥ आकाशासी कांहीं लावूं जातां । वेडावे तोचि लाविता । आत्मा तैसा कोणेही पदार्था । लिप्त न होय जाण पां ॥ ७४ ॥ आकाशासी नाहीं येणें जाणें । तेथींचें तेथेंच असे अखंडपणें । सर्व पोटीं घेऊनि असणें । व्यापकत्व जाणिजे ॥ ७५ ॥ दीप घरीं उजळला । तयासी पदार्थ पुशिला । कवण कवण्या व्यापारीं असे रहाटला । काय हें तो जाणतसे ॥ ७६ ॥ प्रकाशें तयाचेचि चाले । चोर साव दोन्ही समत्वेंचि मानले । आत्मत्वें तैसेंच व्यापिलें । साक्षीमात्र जाणिजे ॥ ७७ ॥ सागरीं तरंग जन्मले । कितीएक जाहले गेले । न कळती तयाचे उमाळे । वायुवशें होत जाती ॥ ७८ ॥ उदका वेगळे तरंग होती । परी तेचि तयासी न जाणती । हेंचि आश्चर्य वाटे चित्तीं । कौतुक केवढें मायेचें ॥७९॥ आत्मा तोचि जीव होय । आपली आपण न जाणे सोय । येवढें कौतुक सांगों

काय । मायालाघवी तोचि तो ॥ ८० ॥ जीवासी जन्म मरण लाविलें । कर्म अकर्म करूनि दाविलें । पाप पुण्य गांठीं असे बांधिलें । कचाट केलें नसतेंचि ॥ ८१ ॥ मोक्ष बद्धता दाखविली । स्वर्गनर्कद्वारें निर्मिलीं । मायाभ्रांती गोंविली । उमज न पडे आपुला ॥ ८२ ॥ मी कोण हें कळेना । विस्मृति पडली असे मना । बद्ध मी ह्मणोनि वासना । गुंतत असे आपण ॥ ८६ ॥ आधींच हा मुक्त आहे । बद्ध उगाच ह्मणत पाहे । शुक नळिके गुंतोनि राहे । तयापरी होतसे ॥८४॥ जैसें डोळां पडळ आलें । तें डोळियांसीं आड झालें । दृष्टी असतां मंदत्व पडलें । न दिसे पदार्थ वस्तु ॥८५॥ श्लोक ॥ तत्त्वमसीति विज्ञानं देहेऽस्मिन्नु चतुर्थके ॥ गुरुमुखेन ज्ञातव्यं ह्यन्यथा प्राप्यते कथम् ॥७३॥ टीका—तत्त्वमसिविज्ञान । चतुर्थ देह संस्थान । गुरुकृपेवीण न कळे खूण । कांहीं केलिया सर्वथा ॥८६॥ अविद्यापडळ जें आलें । तेणें ज्ञानदृष्टीसी अंधत्व झालें । गुरुकृपा अंजन घालितां गेलें । अंधतिमिर अज्ञान हें ॥८७॥ श्लोक ॥ तस्मात्सर्वप्रयत्नेन कर्तव्यं त्वात्मदर्शनम् । अहं देहो जीव इति धीः सर्वैस्त्यज्यतामियम् ॥७४॥ टीका—सर्व प्रयत्नांतें करून । मुख्य करावें आत्मदर्शन । टाकूनि अहंदेहीं अभिमान । जीव तोचि शिव आहे ॥ ८८ ॥ सर्व देहीं वर्तत । अहंबुद्धि जीव ह्मणत । अहं सोहं टाकितां

तेथ । आत्मा होय तोचि तो ॥ ८९ ॥ जो आपआपणिया जाणत । जेथें नसे द्वैताची मात । एकपणाचा हाही अंत । जाय तेथें विरोनी ॥ ९० ॥ ऐसें जें कां आहे । गुरु-कृपावशें तें प्राप्त होय । एरवीं न कळे तेथील सोय । नाना उपायीं शीणतां ॥ ९१ ॥ सद्-गुरूसी शरण रिघावें । जन्ममरणदुःख चुकवावें । पूर्व वैराग्य अंतरीं धरावें । मिथ्या जा-णोनी मायिक ॥ ९२ ॥ श्लोक ॥ **चतुरशितिलक्षेषु योनियंत्रेषु गच्छतः । प्राप्तं ते मानवं जन्म भवेदानीं सुखात्मकः ॥ ७५ ॥ टीका**—चौऱ्यायशीं लक्ष योनी । बहुत फेरे फिरोनी । शेवटीं प्राप्त मनुष्ययोनी । महाभाग्यें प्राप्त होय ॥ ९३ ॥ अतःपर मागुती । नको येणें गर्भ-वास प्रती । ऐसें जाणोनि गुरुचरणाप्रती । मिठी घालिजे सद्भावें ॥ ९४ ॥ संदेह दूर दव-डूनी । विश्वास धरूनि गुरुवचनीं । अभ्यास करितां प्रतिदिनीं । आत्मज्योती प्रकाशे ॥ ९५ ॥ श्लोक ॥ **साक्षात्कारात्स्थिरं चित्तं जायते लीनमात्मनि । तदैव जायते जन्तो-र्जन्ममृत्युविनाशनम् ॥ ७६ ॥ टीका**—साक्षात्कार जाहलिया । चित्त स्थिर होय निजात्म ठाया । सच्चिदानंद पावोनि लया । विरे तेथें आपण ॥ ९६ ॥ मनासी झालिया प्रचीति । ध्रुव निश्चय अढळ चित्तीं । भोगूनियां निर्गुणीं रती । आत्मभुवनीं क्रीडे जरी ॥ ९७ ॥

धरूनियां आत्मानुसंधान । स्वरूपीं स्थिर करूनियां मन । पाहतां दिव्य प्रकाश पूर्ण । नाहीं पार तया सुखा ॥ ९८ ॥ अनंत योनींपासून । तोचि चुकवी दुःख दारुण । पुनरपि नाहीं आयागमन । यातायात न भोगी ॥ ९९ ॥ तयाचाचि जन्म सुफळ झाला । तोचि सर्व शास्त्र पढियेला । अष्टांग योग अभ्यासिला । सर्व त्यानें ॥ ६०० ॥ जेणें आपआपणीयातें पाहिलें । तेथें अनंत पुण्यांचें फळ आलें । आत्मस्वधन सांपडलें । धन्य जगीं तोचि तो ॥ १ ॥ नर नारायण तोचि ह्मणावा । सर्व सुखांचा मिजातमठेवा । आनंदाचा वोलावा । त्रिविध ताप निववी ॥ २ ॥ तयाचें करितां वर्णन । वाचेसि पडतसे मौन । आत्मा तोचि परिपूर्ण । व्यापक असे सर्वत्र ॥ ३ ॥ आत्मसाक्षात्कारीं जीव । पाहतां तोचि सदाशिव । दवडितां देहे अहंभाव । तोचि जाण जगदात्मा ॥ ४ ॥ जैसा मिठाचा रवा । पाहूं जातां समुद्रठेवा । विरूनि आपुलिया देहभावा । होऊनि राहे तेवढा ॥ ५ ॥ ऐसें कपिल सांगतां । परम आनंद जाहला चित्ता । कृपा केली दीननाथ । पतितालागोनी जाणा ॥ ६ ॥ ऋषिसिद्ध ह्मणे मुनिश्रेष्ठा । पूर्ण ज्ञानिया वरिष्ठा । सकळ देखणीयांचा द्रष्टा । तूंचि होसी स्वामिया ॥ ७ ॥ श्लोक ॥ देहनिर्णयस्थाने च वर्णव्यक्तिस्तथैव हि । प्रमाणं सर्वतत्त्वानि वर्णि-

तानि त्वया गुरो ॥ ७७ ॥ टीका—सांगितलें देहानिर्वाण । स्थान वर्ण व्यक्ति प्रमाण । सर्व तत्त्वनिरूपण । केलें कथन विस्तारें ॥८॥ श्लोक ॥ गुरूक्तिश्रवणेनैव जीवबुद्धिर्विलीयते । आत्मवत्सर्वभूतानि यस्य तस्यात्मदर्शनम् ॥ ७८ ॥ टीका—श्रवणीं पडतां गुरुवचन । होतें आत्मयाचें दर्शन । जीवबुद्धिवर्जित जाण । शिव होय निश्चयें ॥ ९ ॥ आत्मवत् सर्व भूतें जाणोन । पाहे सर्व समसमान । तत्क्षणींच देवदर्शन । होय क्षण न लगतां ॥ १० ॥ ॥ श्लोक ॥ शरीरं वेदसंख्यं च ज्ञात्वा तव प्रसादतः । आकाशे ह्यर्धभागे च मण्डलं वायुसंज्ञकम् ॥ ७९ ॥ पद्मं च द्विदलाकारं चक्षुर्नामेति कथ्यते । तन्मध्ये सर्वसारं च ज्ञात्वा धन्योऽस्मि भो मुने ॥ ८० ॥ टीका—शरीर वेदसंख्या प्रमाण । प्रसादरूप बोधिलें जाण । सांगितलें योगलक्षण । आत्मप्राप्तीलागोनी ॥ ११ ॥ आकाश अर्धभाग मेळीं । वसतसे वायुतत्त्वमंडळीं । पद्मयुक्त असे द्विदळीं । चक्षुनाम वदती तया ॥ १२ ॥ तयामध्यें सर्व सार । तें केलें दृष्टिगोचर । महामुनी कृपासागर । निववियिलें त्वां निजात्मसुखीं ॥ १३ ॥ चक्षुअग्रीं गुह्य असे । लक्षांशीं जो प्रकाशे । गुरुकृपामुखें जाणतां कैसें । प्रत्यक्ष न होय गोचर ॥ १४ ॥ ऐसें जें गुह्य उत्तम । भेटविलें पवित्र परम । जें सर्वांचें विश्रामधाम । परमतत्व

जें ॥१५॥ कृपाघना ज्ञानमूर्ती । सर्व मनाची पुरविली आर्ती। चित्तीं एक आशंका वर्तती । कृपा करोनि सांगिजे जी ॥१६॥ कपिल कामधेनु समर्थ होत । तेथें वत्स होउनी धडका हाणित । तेणें अधिक पान्हा दुणावत । प्रेमा जाणोनि ऋषिवत्सा ॥ १७ ॥ कल्पतरूखालीं बैसला । तो पदार्थ पाविजे इच्छिला । गुरुकल्पनेचि जाय पुरविला । फळ मोक्षादिक सर्वही ॥ १८ ॥ जैसा मेघ वर्षोनि राहिला । परी मागें ओलावा असे उरला । तैसा सुनी समर्थ वदोनि गेला । गुह्य ज्ञान परम जें ॥ १९ ॥ बोलणें सर्व जाहलें । परी कैसें राहिजे उगलें । ह्मणोनि प्रश्नोत्तर होय बोलिलें । आवडी थोर प्रेमाची ॥ २० ॥ जैसा तीर लक्ष्य भेदूनी पुढें जाय । तैसा बोल बोलूनी उरतसे होय । गर्भअंध लक्षण प्रमेय । पुसतसे ऋषिसिद्ध ॥ २१ ॥

॥श्लोक॥ जात्यंधानां दृष्टिमध्ये फलपुष्पाद्युपाधितः। आत्मनो दर्शनं न स्यादनात्मानो हि ते किमु ॥ ८१ ॥ टीका—जयासी नाहीं नयन । गर्भांध असे होऊन । तयासी कैसें होय आत्मदर्शन । मध्यें पडदा असे तयासी ॥ २२ ॥ नेत्रीं पडळ वडस वाढती । फुलें पडोनि अंधत्व पावती । तयाची होय कैशी गती ॥ आत्मा काय ह्मणिजे तया ॥ २३ ॥ **श्लोक ॥**

गमनादि क्रियास्तस्य जायंते तत्कथं वद। अनात्मा स तु नो वाच्यस्तस्य ज्योतिः

क्व वर्तते ॥ ८२ ॥ टीका—व्यापारादि क्रिया सर्व । वर्तती त्याचा अनुभव सांगा स्वामी । अभिनव । कैसें आहे तयाचें ॥ २४ ॥ अनात्मा ह्मणतां न ये त्याशी । सांगा तयाची वाट कैशी । तो पावे आत्मसाक्षात्काराशी । कैशियापरी स्वामिया ॥ २५ ॥ कोठें तयासी असती ज्योति । तयाची कैशी काय गती । सांगा स्वामी सुखघनमूर्ती । मुनिराज समर्था ॥ २६ ॥

॥श्लोक॥ चतुर्देहसमायुक्तं सर्वतत्त्वैःसुमिश्रितम् ॥ पंचप्राणसमायुक्तं वपुस्तस्य कथं चरेत् ॥८३॥ टीका—त्यासीहि चारी देह असती । तत्त्वीं तत्त्वें मिश्रित होती । पंचप्राण क्रिया वर्तती । कैशियापरी जाणिजे ॥ २७ ॥ श्लोक ॥ एवं च प्राप्तं संदेहमेतं छिन्द्धि ह्यसंशयम् । वाचा मुंजुलया देव मनः शांतिर्यया भवेत् ॥ ८४ ॥ टीका—ऐसा संदेह असे चित्तीं । छेदिजे स्वामीवचन शास्त्रोक्ति । वाचा मंजरी बोलोनि विनंती । करी स्थिर करोनि मन ॥ २८ ॥ ऐसें ऋषिसिद्ध ते बोलतां । कपिल महामुनी होय सांगता । तें ऐकावें समर्थ श्रोतां । स्थिर करोनि मनासी ॥ २९ ॥ श्लोक ॥ क० उ० ॥ अमुं प्रश्नं महाश्चर्यं पूर्वं कोऽपि न पृष्टवान् । ऋषिसिद्धगणाःसर्वे श्रोतुमिच्छन्ति तत्त्वतः ॥ ८५ ॥ टीका—कपिल ह्मणती ऋषिसिद्धासी । प्रश्न केला बहु आश्चर्यासी । पूर्वी कोणीं केलें नाहीं ये प्रश्नासी । तें तुवांचि

विचारिलें ॥ ३० ॥ बहु होशी विचक्षण । पुससी परोपकाराकारणें । सर्व जाणसी लक्षण । दीनजनां तारावया ॥ ३१ ॥ ऋषि सिद्धगण गंधर्व सर्व । चित्तीं इच्छिती सदैव । धरूनियां पूर्ण सद्भाव । आत्मप्राप्ती कारणें ॥ ३२ ॥ श्लोक ॥ **इति ज्ञात्वा प्रवक्ष्यामि विना किञ्चिद्धि-वंचनात् । श्रोतुं संम्यक् स्वस्थबुद्धया चित्तमेकग्रतां नय ॥ ८६ ॥** टीका—निज हृदयगुज जें । सांगेन तुज सहज । वचन न करितां परम जें । कथिन तुज ऋषिश्रेष्ठा ॥ ३३ ॥ सुसम्यक् स्वस्थबुद्धी । करूनियां चित्तशुद्धी । एकाग्र मन करितां सिद्धी । आत्मप्राप्ति होतसे ॥ ३४ ॥ श्लोक ॥ **गर्भाधत्वे दृष्टिमध्ये कारणं पुष्पपटलम् । संप्रोक्तं हि त्वया शिष्य क्व तद्देहत्रयं गतम् ॥ ८७ ॥** टीका—गर्भाधाचें लक्षण । पडळ पुष्पादि कारण ॥ नेत्रीं न होय लक्षसंधान । देहत्रय असती कोठें ॥ ३५ ॥ श्लोक ॥ **तस्यात्मा क्व नु तिष्ठेत्स व्यापारं कथमाचरेत् इत्येव प्रश्नो युष्माकं मत्तस्तत्रोत्तरं शृणु ॥ ८८ ॥** टीका—तयाचा आत्मा कोठें तिष्ठत । होय कैसी आत्मप्राप्ति । व्यापारादि क्रिया होत । कैशियेपरी सांगिजे ॥ ३६ ॥ ऐसा मज पुशिला प्रश्न । ऐकें वाक्य ध्रुवनिश्चय करून । तुजप्रती मी सांगेन । भाव निश्चयें जाण पां ॥ ३७ ॥ आत्मा नाहीं आंधळा । तयासी सर्वांगीं असे डोळा । देखणा

डोळियाचा सकळा । व्यापक असे सर्व देहीं ॥ ३८ ॥ श्लोक ॥ धात्रा ह वै सृष्टिरियमस्ति स्थावरजंगमा । प्रारब्धस्यानुमारेण निर्मिता पांचभौतिका ॥ ८९ ॥ टीका—ब्रह्मयानें सर्व सृष्टि निर्मिली । स्थावरजंगमादि केली । पाचभौतिक रचना जाहली । प्रारब्ध असे प्रमाण हें ॥ ३९ ॥ श्लोक ॥ जलजाश्च नवलक्षयोनयो बहुनामकाः । जलूका नाम तत्राऽऽस्ते नेत्रकर्णविवर्जिता ॥ ९० ॥ श्रवणं दर्शनं तस्या आहारगमनादयः । जिव्हात्वग्भ्यां च युक्तायां भवंत्यष्टेंद्रियैः सह ॥ ९१ ॥ टीका—जळीं नवलक्ष योनी असती । तयांचीं नांवें अनेका रीतीं । भिन्न भिन्न शरीरें जन्मती । अनेक परीचीं ॥ ४० ॥ जळूका नांवें उदकीं असती । तयांसी नेत्र कर्ण नसती । ऐकणें अहारादि क्रिया होती । कौतुक असे तयाचें ॥ ४१ ॥ जिव्हा त्वचा असे युक्त । तयाचें सामर्थ्य असे तेथ । इंद्रियें अष्ट वर्तत । सामर्थ्य असे श्रेष्ठ याचें ॥ ४२ ॥ श्लोक ॥ एवं सर्पो विना कर्णं पाणिपादौ तथैव च । श्रवणं कुरुते दृष्ट्या गच्छति ह्युरसा पि सः ॥९२॥ टीका—सर्पासी पाणी पाद कर्ण नाहीं । नेत्रचि श्रवण तयासि पाहीं । भुजंग उरीं गमन करीतसे पाहीं । सर्व कारण कर्ता याचें ॥ ४३ ॥ श्लोक ॥ स्थावराणां लतादीनां ज्ञायते बंधनं खलु । त्वगिंद्रियबलं श्रेष्ठं तेष्वा-

स्ते केवलं तु वै ॥ ९३ ॥ टीका–स्थावर वृक्षलतादिक । पाषाणरूप बंधन तयांसी देख । इंद्रिय त्वचा सामर्थ्य अधिक । थोर असे ते ठायीं ॥ ४४ ॥ श्लोक ॥ प्रत्यहं वृद्धिक्षीणत्वे फलपुष्पे तथैव च । देहोऽस्ति तेषां सर्वेषां सूक्ष्मादिः सर्वकर्मणाम् ॥ ९४ ॥ टीका–आहार वृद्धि क्षीण । फळ पुष्पादि होत जाण । कार्य क्रिया आणि कारण । सर्वी असे व्यापिलें ॥ ४५ ॥ सर्वी सर्व समसमान । स्थूल सूक्ष्मादि असे व्यापून । आत्मत्वीं नाहीं दुजेपण । आकाश जैसें सर्वत्र ॥ ४६ ॥ सूर्य जैसा घटांतरीं । व्यापक असे जयापरी । तैशी वस्तु जाण निर्धारीं । सर्वी सर्वगत असे ॥ ४७ ॥ उदय अस्तु सूर्याचे ठायीं । आत्मया नित्य उदयो पाहीं । प्रकाश अंधारीं सारिखाचि होई । पाठी पोट नाहीं तया ॥ ४८ ॥ सर्व देहीं वर्तत । वर्तोनि अलिप्त असत । सगुण निर्गुण तोचि होत । लीलाविग्रही ॥ ४९ ॥ श्लोक ॥ स्थूलस्यान्तः सूक्ष्मभूतं तथा च प्राणपंचकम् । गर्भांधस्याखिलं त्वस्ति कथं तज्ज्ञायतेऽबुधैः ॥ ९५ ॥ टीका–स्थूळदेहा अंतरीं । सूक्ष्म देह असे भीतरीं । पंचप्राण निर्धारीं । असती तेथें ॥ ५० ॥ गर्भअंधाचें लक्षण । दुष्कृती कैशी जाणे खूण । चक्षु असोनि काय कारण । ज्ञान-ही नाहीं ॥ ५१ ॥ श्लोक ॥ नेत्रस्थाने स्थिते देहे वर्णव्यक्तिस्तु वर्तते । साभिमानं तृती-

यं च व्यापाराः स्थूलदेहवत् ॥९६॥ टीका–नेत्रस्थानीं देहीं असती । भूतात्मक वर्णव्यक्ती । साभिमानी तृतीय होती । व्यापार करिती स्थूळापरी ॥ ५२ ॥ श्लोक ॥ आंतरे त्रिपुरक्रीडां कुर्वन् व्याप्नोति देहिनः तथात्मा संस्थितोंऽधस्य देहे तस्येति लक्षणम् ॥ ९७ ॥ टीका– अंतर त्रिपुर क्रीडा करीत । व्यापक सर्व देहीं वसत । तैशी जाण आत्मास्थित । गर्भअंधलक्षण ॥ ५३ ॥ अंतर्दृष्टीलक्षण । तेंचि मुख्य असे कारण । बाह्य दृष्टी नव्हे प्रमाण । अंतर्लक्ष जाणणें ॥ ५४ ॥ दिव्यदृष्टीचें देखणें । तेंचि आत्मरूप पाहणें । चर्मचक्षू न जाणती खुणे । तेथींचिया जाण पां ॥ ५५ ॥ मनाचें मनपण जेथें नुरे । जीवाचें जीवपणही विरे । तेथें दृष्टि कैशी शिरे । तया स्वरूपीं सांग पां ॥ ५६ ॥ निजध्यास चित्तीं असतां । तेणेंचि होय तदात्मता । मुख्य भाव निश्चय धरितां । कृपा करी हृदयस्थ ॥ ५७ ॥ तो असे सर्वांग देखणा । तयासी नाहीं द्वैत जाणा । कोण करी गणना । तया स्वरूपाची ॥ ५८ ॥ दृष्टीसी जो देखवी । वाचेसी जो बोलवी । सर्वां क्रिया जो चालवी । इंद्रियांचिया ॥ ५९ ॥ वेद जयाचेनि बोले । सूर्य जयाचेनि चाले । लोक चौदा देहीं निर्मिले । सामर्थ्यें जाण जयाचिया ॥ ६० ॥ हृदयीं क्रीडा तोचि करी । जो असे सर्वांतरीं । गर्भ अंधासी हो अव्हेरी । ऐसें

होऊं न शके ॥ ६३ ॥ श्लोक ॥ दृष्ट्यालापादिव्यापारा वृक्षादिषु भवंतिहि । जलमध्ये स्थितं पद्ममाकाशे भानुरस्ति च ॥ ९८ ॥ टीका—दृष्टी वाक्यादि व्यापार होत । लतावृक्षादिकीं वर्तत । तेथें कारण मात्र होत । तोचि जाण प्राप्तिकर ॥ ६२ ॥ जळीं असतसे कमळ सूर्य योजनें लक्ष मंडळ । तयाचेनि वेधें सूपरिमळ । प्रीत असे मानसीं ॥ ६३ ॥ सखा दूरदेशीं असे । चित्त अखंड तेथें वसे । तेथील सुवार्ता ऐकोनि उल्हासे । मानस जाण जयापरी ॥ ६४ ॥ धेनु चरे वनांतरीं । हेतु गुंतला असे वत्सावरी । तैसा अनंत वेधें हृदयांतरीं । परस्पर वेधक ॥ ६५ ॥ श्लोक ॥ मित्रदर्शनसंतोषात्पद्मजालं विकाशते । सूर्यकान्ताख्यपुष्पं च तस्याभिमुखमाटति ॥ ९९ ॥ टीका—मित्रदर्शनें संतोषत । पुष्प जाण विकासत । जयासी ह्मणती सूर्यकांत । होय सन्मुख भानुप्रती ॥ ६६ ॥ श्लोक ॥ दृष्टिशब्दादि वृक्षाणां नेति शंका वृथा कृता । रंभाप्रसुतिकाले तु शब्दस्तस्याः प्रशस्यते ॥ २०० ॥ टीका—दृष्टी वाचा नाहीं ह्मणत । लतावल्ली या वृक्षजात । यदर्थी परिहार निश्चित । ऐका मुनिराज बोलती ॥ ६७ ॥ रंभा प्रसूतकाळीं । होत शब्द आरोळी । तस्मात् जाणिजे तये स्थळीं । असती पंचभूतें व्यापक ॥ ६८ ॥ श्लोक ॥ इंद्रियं हींद्रियं धृत्वा सर्वकार्ये प्रवर्तते । गर्भा-

धस्य तथा ज्ञानं प्रोक्तं ज्ञेयं विचक्षणैः ॥ १ ॥ टीका—इंद्रिय इंद्रियां आश्रित । क्रिया कर्म वर्तत । तैसें गर्भअंधासी जाण निश्चित । ज्ञान जाणिजे विचक्षणीं ॥ ६९ ॥ श्लोक ॥ पश्चात्प्रारब्धभोगेन देहान्तरं भविष्यति । सर्वेंद्रियसमायुक्तः स्वस्थदेहं स आप्नुयात् ॥ २ ॥ टीका—प्रारब्धभोगानुसार । वर्तत असे शरीर । जैसा असे पूर्वसंस्कार । तैसा भोग भोगवी ॥ ७० ॥ प्रारब्ध लागलें जिवापाठीं । तें न सुटे करी हिंपुटी । जन्ममरण आटाआटी । भोगवी सर्व अदृष्ट ॥ ७१ ॥ सुखदुःखादि भोग । ते घडवी प्रारब्धयोग । न सुटे तयांचा संग । अहंजीवासी लागला ॥७२॥ एक प्रारब्धयोगेंकरून । होय संतति संपत्ति धनधान्य । आरोग्य काया होऊन । शरीर असे सोज्वळ ॥ ७३ ॥ स्त्री असे अनुकूल । धर्मार्थकामीं बहु कुशल । मोक्षादि सर्व फल । प्राप्त होय इच्छितां ॥ ७४ ॥ एक सिंहासनीं राज्य करी । एक केवळ दरिद्री भिकारी । एक करी बहु स्त्रिया सुंदरी । लग्न न होय एकाचें ॥ ७५ ॥ एकासी बहु पुत्र होती । एकासी नाहीं संतति । एक बहु हिंपुटी होती । एक सुखी सहज तों ॥७६॥ एक आंधळें पांगळें । एक तें होय जावळें । ऐशीं निपजती कर्मबळें । पूर्व कर्मानुसार ॥७७॥ एक मुकीं एक बहिरीं । एक जामुनीं एक कुर्हीं । ऐशीं जन्मती कर्मानुसारीं । प्रारब्धयोगें

जाण पां ॥ ७८ ॥ पूर्व कर्म पुण्य असे चांग । तरी पाविजे उत्तमांग । इंद्रियें सर्व अव्यंग । होऊनि शरीर जन्मत ॥ ७९ ॥ प्रारब्ध कोणा न सुटत । हरिहरब्रह्मादिकां भोगवीत । तेथें नरपामराचें काय गणित । सूर्यापुढें खद्योत जैसा ॥ ८० ॥ रामकृष्णादि अवतार । नळ पुण्यश्लोकादि युधिष्ठिर । प्रारब्धें घडविला विचार । तदनुसार वर्तती ॥ ८१ ॥ शुक नग्न ब्रह्मचारी । नारद हिंडे दारोदारीं । जनक स्त्रियांसी राज्यभोग करी । प्रारब्ध कारण विचित्र हें ॥ ८२ ॥ ज्ञानियांशीं प्रारब्धसंग । जैसा स्फटिकीं रंग । भासोनि अलिप्तता चांग । न मोडे जाण तयाची ॥ ८३ ॥ अग्नीस नाहीं पोळणेपण । तैसें ज्ञानियांसी पापपुण्य । परी लोहयोगें पिटण । करिती जाण तयासी ॥ ८४ ॥ लोहार लोह तापवित । अग्निरूप तें धगधगित । घणाचे घायें पीटित । अग्नीची दिसे ॥ ८५ ॥ परी घाय बसती लोहासी । वाढणें मोडणें घडे त्यासी । तैसें कर्म ज्ञानियासी । अलिप्तपणें वर्ततसे ॥ ८६ ॥ अहंबुद्धि अज्ञान । दुःख भोगी दारुण । ज्ञानियासी सुखदुःख समान । एकात्मता जाणोनी ॥ ८७ ॥ आत्मा सर्वत्र एक असत । तेथें नाहीं द्वैताची मात । अनुभवीं जाणतां एकचि होत । सर्वीं सर्व व्यापक ॥८८॥ सूर्याचे गांवीं अंधार नाहीं । तैसें आत्मबिंबीं दुजें नसे पाहीं ॥ ब्रह्मादि मशकदेहीं । व्यापक

असे समसमान ॥ ८९ ॥ शक्तिपरत्वें सामर्थ्य असे । अधिक न्यून निर्मिलें भासे । आत्मत्वीं पहातां एकचि दिसे । वस्तुमात्र सर्वत्रींही ॥ ९० ॥ श्लोकपद तों मागेंच राहिलें । शब्दरहस्य असे चालिलें । आधारें तयाचेचि जाय बोलिलें । बीजापासाव विस्तार जैसा ॥ ९१ ॥ मूळ वृक्षाचें एकचि असत । डाहाळियां उजू वांकुडियां जात । परी वृक्षाचि एक होय निश्चित । आधार सर्व तयाचा ॥ ९२ ॥ गर्भअंधलक्षण । तयासी जन्मांतराचि कारण । तदनुसार आचरणें । वर्तत असती तयांची ॥ ९३ ॥ उत्तम देह पावणें । हें तों जन्मांतर लेवणें । तदनुसार करणें । होय जाण तयाचें ॥ ९४ ॥ श्लोक ॥ मध्येंऽधदृष्टेराघातात्तथाऽप्यात्मत्वतः खलु । अंतर्दृष्ट्या यथा ज्ञानी तथांधो जहि संशयम् ॥ ३ ॥ टीका—मध्यें आघात दृष्टीसी असे । तेणें चर्मचक्षूसी न दिसे । अंतर्दृष्टीं जाणतां भासे । गर्भअंधासी यापरी ॥९५॥ यदर्थीं संशय न धरी । महावाक्यशस्त्रें छेदन करी । सर्व देखणा आत्मा निर्धारी । तेथें कायशी आशंका ॥ ९६ ॥ श्लोक ॥ शंभौ तृतीयकं नेत्रमग्निरूपं प्रतिष्ठितम् । दग्धोऽनंगस्तु वै येन ज्ञाननेत्रं तदेव च ॥ ४ ॥ टीका—ईश्वरासी तृतीय नेत्र जाण । तेथें अग्नि प्रज्वळे दारुण । जेणें काम केला दहन । विख्यात असे सर्व शास्त्रीं ॥९७॥ प्रगट असे भुवनत्रयीं । ज्ञानचक्षु तोचि

पार्हा । गुप्त असें सर्वांठायीं । ज्ञानदृष्टीं जाणणें ॥ ९८ ॥ मुख्य ज्ञान कारण । जेणें कळे निजात्मखुण । येर तें वृथा चावटपण । आत्मजिव्हाळा जेथें नसे ॥ ९९ ॥ स्वरूपीं ज्ञान अज्ञान नाहीं । एक वस्तु होय पाहीं । जाणणें नेणणें तेथें पाहीं । उरलें नसे शुद्धस्वरूपीं ॥ ७०० ॥ कौतुकार्थ बोलणें । हें आत्मयाचेंचि करणें । मागें बोलिलीं असती लक्षणें । यदर्थी जाणिलीं पाहिजे ॥ १ ॥ त्रिनेत्र सदाशिवाचा । तोचि देखणा दृष्टीचा । दिव्य प्रभा प्रकाश जयाचा । व्यापूनी असे आलिप्त ॥ २ ॥ **श्लोक ॥ शरीरं वेदसंख्याकं तत्त्वानि शतकं तथा । भस्मीभूतशरीरस्य वर्णरूपे कुतस्तदा ॥ ५ ॥ टीका**—वेदसंख्या देह असती । तत्त्व शत व्यापक होती । बहुधा ऋषी मतें बोलती । अनेक तर्क घेऊनि ॥३॥ श्लोकींचें पद पाहावें । समर्थी दूषण ठेवावें । तुमच्या कृपाजळवोलावें ॥ निजात्मफळ प्राप्त होय ॥४॥ तुमचे कृपेचें बोलणें । न होय तुमचे कृपेविणें । स्वात्मसुख न बाणे । वाचाळपणें न बोलतां ॥ ५ ॥ पद पाहणें हे वचनोक्ति । बोलावयासि नाहीं समर्थ शक्ती । पूर्वीच केली असे विनंती । यदर्थीं जाण समर्थ हो ॥६॥ संस्कृती नसतां गती । काय होईल पदव्युत्पत्ती । परंतु कृपा केली तुम्हीं संतीं । तें काय वृथा जाईल ॥ ७ ॥ आतां ऐकिजे देहकथन । जें अनित्य अशाश्वत जाण । तयासि

कैचें रूप गुण वर्ण । क्षणभंगुर जाणिजे ॥ ८ ॥ जैसा उदकाचा तरंग । तत्क्षणीं होत भंग । तैसा जाण देहसंग । शाश्वत होय त्या न्यायें ॥ ९ ॥ विजेचा उदय होत । तोचि अस्तमान निश्चित । तयापरी तेथींचें शाश्वत । मानिजे का ॥ १० ॥ पाहतां नर्कमूत्राची सांठवण । शेवटीं मृत्तिका कृमी होती जाण । अथवा रक्षा भस्मभूत होऊन । जात जैसें संचित ॥११॥ नाम रूप तयासी । कोठें काय आहे पहावयासी । चित्तीं न धरी संदेहासी । कल्पना हे व्यर्थ तों ॥ १२ ॥ श्लोक ॥ अनंगोऽदेहरूपोऽपि व्याप्नोति सकलं जगत् । उत्पत्तिः सर्व-जंतूनां वर्धतेऽहर्निशं ततः ॥ ६ ॥ टीका—अनंग नाम मदनासी । परी व्यापूनि असे सर्व जनांसी । उत्पत्ति करूनि सकळ जीवांसी । मदन आपण क्रीडत ॥ १३ ॥ श्लोक ॥ तदा रूपशरीरादि तेन किंचिन्न दृश्यते । क्रिया कर्मगुणः सर्वे भवंत्यास्मिंस्तथाऽपि च ॥७॥ टीका—तद्रूप चक्षु देखणा असे । आघात चर्म पडळ आलें भासे । तेणें पदार्थ कांही न दिसे । गर्भअंधासी पैं ॥ १४ ॥ क्रियावस्था गुण सर्व । वर्तत असती स्वयमेव । सर्व देहीं व्यापक शिव । सूर्य जैसा घटांतरीं ॥ १५ ॥ श्लोक ॥ विश्वव्यापी चांतरात्मा सर्वदेह स्य विद्यते । प्राणादिसर्वतत्त्वानि तिष्ठंति च यथास्थितम् ॥ ८ ॥ टीका—तयासी अंत-

मुख आत्मा । विश्वीं वर्ते जो विश्वात्मा । क्रीडा करीत परमात्मा । सर्व देहीं व्यापक ॥१६॥ प्राणादि सर्व तत्त्वें पाहीं । यथापूर्व तिष्ठती देहीं । सर्व क्रिया चालत पाहीं । तयाचिया शरीरीं ॥ १७ ॥ श्लोक ॥ रूपावलोकनमात्रं व्यापकं ध्रुवमस्य न । चलनस्पर्शनज्ञानं तत्राऽऽस्तेऽसंशयं बुध ॥ ९ ॥ टीका—रूप अवलोकन मात्र करितां । दृश्य ध्रुव निश्चयें न होय तत्त्वतां । चलन स्पर्शन ज्ञान होय जाणतां । होत सर्व निश्चयें ॥ १८ ॥ श्लोक ॥ सोपाधित्वाद्दृष्टिमध्ये वर्णत्रयं न दृश्यते । तत्त्वे तत्त्वं समाश्रित्य तिष्ठत्यखिलदेहिषु ॥१०॥ टीका—अंधत्व दृष्टीसी असे । वर्णत्रय न प्रकाशे । तत्वीं तत्व आश्रयें वसे । सर्व देहीं जाण पां ॥ १९ ॥ श्लोक ॥एवमस्तीह वृत्तांतो वृथा प्रश्नकृतो वचः । प्रश्नद्वयं ह्युर्वरितं स्वस्थ शृणु मुनीश्वर ॥ ११ ॥ टीका—सर्व सांगितला वृत्तांत । वृथा प्रश्न करी येथ । एक सम्यक् दृष्टांत । सांगेन सकळिकेतें ॥ २० ॥ दृष्टांत द्यावयासी नाहीं । परी आर्त उरतूसे पाहीं । आत्मसुखासी भुलोनि राही । ह्मणोनि वैखरी उल्हासे ॥ २१ ॥ पाळणा जैसा हालविला । हालवूनि हात ओसरला । परी किंचित् झोंक होय उरला । तैशा रीती जाण पां ॥ २२ ॥ बोलावया हेंचि कारण । पुनः पुन्हां तेंचि कथन । मनाचें होय समाधान । अधि-

काधिक ऐकतां ॥ २३ ॥ करितां विषयीक चावटी । गोड बहू लागती गोष्टी । हे तों आत्म-
कथा गोमटी । वीट काय येइजे ॥ २४ ॥ आतां भानुसोम दृष्टांतीं । श्रीमुनी बोलती श्लो-
कांतीं । तें कृपा करोनि संतीं । परिसिजे परिसलेंचि ॥ २५ ॥ **श्लोक ॥ सृष्टेरुत्पत्तिकाले तु**
भानुसोमौ च निर्मितौ । आकाशे भ्राम्यतो नित्यं लोकोपकृतिकारणात् ॥१२॥ टीका—
सृष्टि उत्पत्तीकारण । सोमसूर्यादि करी निर्माण । आकाशीं करिती भ्रमण । लोकोपकारा-
कारणें ॥ २६ ॥ **श्लोक ॥ पर्जन्यकाले संप्राप्ते मेघाडम्बरतः खलु । तथा मण्डलमदृश्यं**
का हानिर्नाम वै तयोः ॥ १३ ॥ टीका—आलिया पर्जन्यकाळ । लोपत भानुशशिमंडळ ॥
अभ्रें आच्छादिलीया केवळ । हानी काय तये स्थानीं ॥२७॥ आड आभाळ जें कां आलें ।
तें तयाचियाच प्रकाशें जाणिलें । दीन चरित्र नसे भंगलें । असे जाण शाश्वत ॥ २८ ॥
चंद्रसूर्याचि उपमा । आत्मत्वीं योजितां नये कामा । उदयो अस्तूचिया नामा । नाहीं तेथें
विटाळ ॥ २९ ॥ आत्मानुभव जयासी जाहला । तरी नवजाय कधीं अस्तावला ॥ निजात्म-
२० लाभ लाधला । गुरुप्रसादेंकरूनि जो ॥ ३० ॥ सूर्यासी अस्तमानाचें आडनांव । ह्मणोनि
आत्मत्वीं उणीव । तयासी पाहतां शून्याचा ठाव । नुरोचि शके ॥३१॥ अंधारें सूर्य काय लोपे ।

निशाशून्य सर्व जेथें हरपे । प्रकाश शुद्ध दिव्यस्वरूपें । असताचि असे ॥३२॥श्लोक॥ कल्पान्ते सोमभान्वोश्च जायते न च दर्शनम् । किंचित्कालं स्थिता मेघा नश्यंत्यपि च कालतः ॥ १४ ॥ टीका—कल्पांतीं भानु मेघमंडळ । व्यापूनि घेतसे सकळ । न पडे दृष्टीसी निर्मळ । तेज होय मंद पैं ॥ ३३ ॥ तोहि किंचित् काळें वोसरे ॥ निजरूपीं दृष्टी संचरे । तो काय तया अंधारें । लोपला जाय ॥ ३४ ॥ श्लोक ॥ तथैव भ्रान्तिनाशे हि चतुर्देहा विनाशिताः । एवं पटळपुष्पादेर्विचारो वर्णितो मया ॥ ॥ १५ ॥ टीका—चारी देह ऐशियापरी । भ्रांती निवारीता दुरी । देखतसे प्रकाशलहरी । ज्ञानदृष्टीं जाण पां ॥ ३५ ॥ पटलपुष्पग्रंथीचा विचार । सांगितला असे सविस्तर । ऋषिसिद्ध होशी तूं चतुर । जाणोनि राहिजे मानसीं ॥ ३६ ॥ श्लोक ॥ पूर्वजन्मकृतं पापं व्याधि रूपेण दृश्यते । स्थूलेषु गजचर्मादि ग्रंथिरूपादिकं तथा ॥ १६ ॥ टीका—पूर्वजन्मीं अकर्म केलें । तैसें फळ प्राप्त झालें । व्याधिरूप होऊनि जडलें । कर्म जाण स्थूळदेहीं ॥ ३७ ॥ सर्वांसि प्रारब्ध निर्मिलें । तदनुसार कर्म चाललें । स्थावर जंगमादिक व्यापिलें । न सुटे जाण कोणासी ॥ ३८ ॥ श्लोक ॥ विकाराद्रुधिरस्यैव वर्णहान्यादिजायते ।

औषधापचनेनैव पूर्ववद्देहसंभवः ॥ १७ ॥ टीका–विकार रुधिराचे सर्व । वर्णहीन होती अवयव । पूर्वकर्मानुसार जीव । जन्म पावे संचितें ॥ ३९ ॥ पातक असे जरी सरलें । तरी औषध जाय उपाइलें । पूर्वस्थिति होय निर्मिलें । देह जाण मागुती ॥ ४० ॥ श्लोक ॥ नेत्रे विकाराज्जयेत पुष्पं च पटलादिकम् । देहत्रयसमाधारे तत्र हानिः कथं तदा ॥ १८ ॥ टीका–नेत्रीं झाले विकारिक । प्राप्त पुष्पादि संज्ञिक । देहत्रय आश्रय देख । वर्णहानी कैशी तया ॥ ४१ ॥ श्लोक ॥ अंजनादिप्रयोगस्तु कर्तव्यस्तत्र बुद्धिभिः । यथापूर्वं भवेद्दृष्टिः सूक्ष्मात्सूक्ष्मस्य दर्शने ॥ १९ ॥ टीका–करितां अंजनादि क्रिया । सर्व कर्तव्य निश्चय तया । यथापूर्व दृष्टी होऊनियां । सूक्ष्मात सूक्ष्म पहातसे ॥ ४२ ॥ श्लोक ॥ स्थूलेषु प्राप्यते व्याधिस्तत्रोपायं समाचरेत् । सूक्ष्मेषु जायते रोगाश्चिकित्सा क्रियतां ततः ॥ २० ॥ टीका–स्थूळाच्या ठायीं व्याधि प्राप्त । सूक्ष्मीं रोग निपजत । तयांसि नाना उपायें निवारित । परस्परें चिकित्सक ॥४३॥ देहे आरोग्य होय । मन स्थिर स्वस्थ जाय । सहज लागे स्वरूपसोय । निजध्यासें तयासी ॥४४॥ श्लोक ॥ उभयोरुपचारेण शरीरे स्वास्थ्यमुद्भवेत् । शरीरारोग्यतः सर्वं जायते सुखमयं तदा ॥ २१ ॥ टीका–शरीरीं रोग व्याधी । तरी न

होय योगसिद्धी । ह्मणून घेईजे औषधी । तेणें देह अरोग होय ॥४५॥ देहाचेयोगें साधन । सर्व घडतसे जाण । करितां शुद्ध आचरण । कैवल्य प्राप्त होतसे ॥ ४६ ॥ ग्रहणकाळीं सूर्याला । ह्मणती ग्रहांनीं ग्रासिला । तरी काय या बोलाला । सत्य मानिजे ॥ ४७ ॥ तो शुद्ध प्रकाशें असत । कल्पनाचि भाव तेथें कल्पित । ज्योतिषी बोलती शास्त्रार्थ । वर्म पाहिजे जाणिलें ॥ ४८ ॥ भ्रांतिअंधारें नासे । चैतन्य सर्व प्रकाशे । बोधभानु उगवतां दिसे । आत्मप्रभा तयाची ॥ ४९ ॥ श्लोक ॥ पश्वादीनां च दृष्ट्यादि सर्वं यद्यपि वर्तते । तथाऽपि नाऽऽत्मनो ज्ञानमेवं द्वैतप्रियस्य वै ॥ २२ ॥ टीका–पशु पक्षी आदिकरून । तयांसी असती नयन । परी न कळे देहपणाची खूण । नरदेहावांचून ॥ ५० ॥ नरदेह परम उत्तम । दुर्लभ आणि पवित्र परम । पावोनि न जाणती आत्माराम । गर्भअंध तेचि ते ॥५१॥ गर्भअंध त्यांहूनि बरा । न पाहे दृष्टी रूपपसारा । नेत्रींच असतसे थारा । सर्व देखणीयांचा ॥ ५२ ॥ वस्तु पहातां दृष्टीशीं । चित्त लागे तयापाशीं । तोचि ध्यास असे मानसीं । धरी जैसा त्यापरी ॥ ५३ पतंग दृष्टीसीं पहातां दीप । अधिकाधिक घाली झेंप । पाहूं जातां तयाचें स्वरूप । जळोनि जाय तत्काळ ॥ ५४ ॥ विषयीं जो अति लंपट । न कळे साधन

स्वहितवाट ॥ तोचि गर्भअंधळा जाण स्पष्ट । असोनि लोचन किमर्थ ते ॥ ५५ ॥ गर्भअं-धासी चर्मचक्षु नसती । परी ज्ञानचक्षु न प्रकाशती । डोळे असोनि मंदमती । काय करणें व्यर्थ ते ॥ ५६ ॥ कोडियाचें गोरेपण । कां निर्लासिकाचें सुंदरपण । इंद्रियभ्रष्टाचा आचार प्रमाण । जयापरी मानिजे ॥ ५७ ॥ जैसें कां वृंदावन फळ । बाहेर चांगलें अंतर वोंगळ । भूमिपुत्राचें नाम मंगळ । ह्मणणें जैसें वाचेशीं ॥ ५८ ॥ अजागळींचे स्तन । दूध नसे नि-ष्कारण । परी तयाचें नामाभिधान । स्तन ऐसें बोलती ॥५९॥जन्म निरर्थक तयाचा । भूमी-भार जाणिजे साचा । बोलों जातां कंटाळे वाचा । अभक्त ह्मणोनि जाणिजे ॥ ६० ॥ नर-देहासारिखें गोमटें । हातीं लागलें अवचटें । स्वहित न करी ते करंटे । हतभाग्य होय ज-न्मोनी ॥ ६१ ॥ त्याहूनी पशू उत्तम । भेदाभेद न कळे वर्म । द्वैत अद्वैताचें नाम ॥ नेणता जाण वेदशास्त्र ॥ ६२ ॥ आचार अनाचार नाहीं । पापपुण्यादि न कळे कांहीं । संसारचिंता न करिती पाहीं । घोर दारुण अखंड हा ॥ ६३ ॥ नरदेहीं संसारचिंता । न सुटे दरिद्रिया भाग्यवंता । इंद्राची संपत्ती जरी असतां । तरीही इच्छा वाढे अनेक ॥ ६४ ॥ दरिद्री दरिद्रें चिंताक्रांत । भाग्यवंता नसे विश्रांत । धनसंपत्तीची थोर चिंता । घोर वागवी दारुण

॥ ६५ ॥ पशू चिंता न करिती । आजउद्यांची खंती । ऋतुकाळीं भोग देती । हा सदगुण तयांचा ॥ ६६ ॥ यावत्प्राणपर्यंतवरी । मानव बुडतसे चिंतासागरीं । माझीं लेंकुरें मज माघारीं । काय खातील बापुडीं ॥ ६७ ॥ ऐशी भुली दारुण । न करी आपली आठवण । पुढें गति होईल कोण । ऐसें कांहीं न उमजे ॥ ६८ ॥ आहार निद्रा मैथुन । पशु मानवां समसमान । नरदेहीं आत्मज्ञान । अधिक असे पाहतां ॥ ६९ ॥ आत्मज्ञानावांचून । पशूहूनि तो जन्महीं हीन । निरर्थक होय पावोन । श्रम केला मातेसी ॥७०॥ तेंचि तें किती बोलावें । स्वसुख जरी प्राप्त व्हावें । आत्मानुसंधानी लावावें । मन अखंड निजध्यासीं ॥७१॥ विषय घातक जाणोन । अखंड कीजे आत्मचिंतन । स्वरूपीं लावूनियां मन । निजात्मध्यासीं असावें ॥७२॥ मनासी न द्यावी विषय गोडी । टाकावी संकल्पविकल्पाची खोडी । स्वधनधनाची जे जोडी । सार्थक हेंचि जन्माचें ॥ ७३ ॥ विषय घातक हें सर्वांसी कळतें । परी पुनःपुन्हां भोगितां तयातें । विषयलंपट होऊनिच ते । गोड तेचि मानिती ॥ ७४ ॥ ह्मणाल विषयांवांचोनि जिवाचें । कैशापरी प्राण वांचे । ऐसें मनीं न मानिजे साचें । विषय कीजे भगवंता ॥ ७५ ॥ एक मन स्वरूपीं लावितां । आनंद होय परम चित्ता । तेथें विषयानंदाची

कोण कथा । अमृतापुढें कांजी जैशी ॥ ७६ ॥ ज्ञानीही विषय भोगिती । परी भोगोनि अलिप्त म्हणविती । तयांची कैशी आहे रीती । सांगेन ऐका श्रोते हो ॥ ७७ ॥ सांगेन म्हणणें हें बोलणें । तुमचेचि कृपासामर्थ्यें म्हणें । जेथें नुरिजे मीतूंपणें । तेथें काय परिहार हा ॥ ७८ ॥ आज्ञा जाहली सद्गुरूची । म्हणोनि इच्छा बोलावयाची । एरवीं नखी नलगे जेथें मनाची । तें वाचें काय बोलिजे ॥ ७९ ॥ परी आत्मलीळा कुसरीं । जैशी समुद्रलहरी वे आपणावरी । स्वइच्छा क्रीडा करी । अनेकरूपीं ॥ ८० ॥ शब्दलहरी चालली । मागील कथा अंतरली । संतीं विषय भोगून अलिप्तता जाहली । कैशापरी जाणिजे ॥ ८१ ॥ जिव्हा विषयरस सेवित । अज्ञान तेथें बहु आवडी धारिती । संत नामामृतें सेवन करित । ब्रह्मार्पणभावें ॥ ८२ ॥ समयीं उचित जें मिळालें । तेंचि होय स्वीकारिलें । कदान्न अथवा चांगलें । ऐसें न म्हणे कदापि ॥ ८३ ॥ प्राणाचिया रक्षणार्थ । मिळे कोणीही पदार्थ । स्वीकारोनि क्षुधा निवारित । कारण मात्र जाणोनि ॥ ८४ ॥ संतांचे श्रवण आणि नयन । इच्छिती सत्वगुणदर्शन कीर्तन । अज्ञाना देखणें ऐकणें मान । पापदृष्टी जाणिजे ॥ ८५ ॥ इंद्रियाची चालत क्रिया सर्व । असे समसमानत्व । परी तयाचा अनुभव । हातवटी मुख्यजाणिजे ॥ ८६ ॥ साधूंसी

नसे द्वैतभाव । एकत्वें पहातसे सर्व । जाणोनिया आत्मानुभव । संतुष्ट असे मानसीं ॥८७॥ तयांचा विषय भगवंत । अखंड चरणीं असे चित्त । इंद्रियें सर्व तेथें गुंतत । मना आधीन जाण तें ॥ ८८ ॥ सर्व मनाचा विकार । मनेंचि थोर वाढविला संसार । संकल्पविकल्पांसी थार । कारण होय हेंचि पां ॥ ८९ ॥ तें मन स्थिर केलें । मग जें जाय देखिलें भाविलें । तें आत्मत्वेंचि जाय मानिलें । विषय होती ब्रह्मरूप ॥९०॥ अज्ञानाचें मन होय चंचल । विषय पाहतां करी तळमळ । झोंबलासे काय इंगळ । तेणें तृप्त सर्वदां ॥ ९१ ॥ कामदृष्टीं स्त्रिया पाहणें । श्रवणीं चावटी डफगाणियादि ऐकणें । हास्तपादादिक व्यवहार करणें । पापरूप जाणिजे ॥ ९२ ॥ मन एकचि होय जाण । ज्ञानअज्ञानासी कारण । दूध उत्तम परी व्याळ-मुखीं अन्न । विष होउनी मारीत ॥ ९३ ॥ मन तेंचि परब्रह्म । जाणत असे निजवर्म । त्द्दय-यस्थ जो आत्माराम । भेटवीं तद्रूप होउनि ॥ ९४ ॥ मन लक्षी परात्पर । स्वरूपीं पावे साक्षात्कार । टाकूनियां द्वैत विचार । रमवितें जें आत्मत्वीं ॥ ९५ ॥ मन आत्मत्वीं मिळतां । सर्व देखे एकात्मता । दुजेपणाची तेंथें वार्ता । आतळों नेदी ॥ ९६ ॥ **श्लोक ॥ चिदात्मा सर्वदेहेषु ज्योतिरूपेण व्यापकः । तज्ज्योतिश्चक्षुरग्रेषु गुरुनेत्रेण दृश्यते ॥ २३ ॥** टीका—

चिदात्मा सर्व देहीं असे एक । ज्योतिरूप प्रकाशक । ते ज्योति चक्षुअग्रीं देख । गुरुने-
त्रीं लक्षिजे ॥ ९७ ॥ श्लोक ॥ स मुक्तो यो विजानाति वेदवेदान्तनिश्चितम् । मथित्वा
सर्वशास्त्रं यत्पार्वती प्रतिबोधितम् ॥ २४ ॥ शंकरेण प्रसन्नेन तथा वस्तु प्रदर्शितम् ।
ज्योतीरूपं स्वरूपं यत्तस्मान्माया न वै पृथक् ॥ २५ ॥ टीका—तोचि मुक्त सर्व लोकीं ।
सर्वशास्त्र जाणोनि विवेकीं । वेदवेदान्त अवलोकी । वर्तत असे स्वच्छंदें ॥ ९८ ॥ तयासी
सर्व तीर्थें घडलीं । नाना दैवतें त्यानेंचि पुजिलीं । जयासी आत्मकळा लाधली । तोचि जा-
णिजे भगवंत ॥ ९९ ॥ दृष्टान्त मागें जो घेतला । तो पुनरपि वाचेशीं जरी आला । तरी
श्रोतीं न पाहिजे अव्हेरिला । उच्छिष्ट म्हणोनियां ॥ ८०० ॥ बोलिलेंचि लागे बोलावें ।
आवडी येत असे स्वभावें । उच्छिष्ट म्हणोनि अवमान न करावें । कृपा करोनि स्वामिया
॥ १ ॥ माक्षिका मोहळ करिती । तेथें मुखें रस सेविती । तोचि उच्छिष्ट श्रीमंत भक्षिती ।
देव आदि करूनियां ॥ २ ॥ बोलावया काय कारण । कविसामर्थ्य लक्षण । दृष्टांत पुन-
२१ रपि न आणितां जाण । समर्थ बळें पुनरुक्ती ॥ ३ ॥ हें केवळ आत्मकथन । येथें द्वैत न
धरिजे जाण । व्युत्पत्तीचें नाहीं प्रयोजन । मुनी समर्थ बोलती असें ॥ ४ ॥ श्रोतियांसी

केली विनंति । कृपा कीजे मज दीनाप्रती । ऐकिजे पुढील वचनोक्ति । चालली असे स्वभावें ॥ ५ ॥ पार्वतीप्रती शंकर । बोधित असे निजात्मसार । प्रेमभावें देखोनि थोर । आत्मदृष्टी दर्शवीत ॥ ६ ॥ स्वरूपीं जन्मली माया । शरीरीं असे जैशी छाया ॥ सागरीं उठे लहरिया । आपीं आपल्या अंगावरी ॥ ७ ॥ सुवर्णाचे अळंकार । बहु निपजती प्रकार । वस्तूवांचोनि निर्धार । दुजा नसे पाहतां ॥८॥ अळंकारीं घडामोडी जाहली । परी वस्तू असे आत्मत्वीं संचली । ते जन्मली ना मोडली । संचली असे अखंडत्वें ॥ ९ ॥ माया आणि स्वरूपासी । भिन्नता नाहीं तयासी । हें वर्म जाणतां मानसीं । तोचि होत जीवन्मुक्त ॥ १० ॥ अविद्येचा आड आहे पडदा । काढितां आत्मा असे सर्वदा । पावोनियां निजात्मपदा । सच्चिदानंद भोगिती ॥ ११ ॥ सद्गुरूकृपें हें कळत । वांचूनी न कळे हा मथितार्थ । धन्य धन्य जे गुरूच्या चरणीं विनीत । सार्थक जन्म तयांचा॥ १२ ॥

॥ श्लोक ॥ अभेदाद्गुरुशिष्याणां सर्वत्रैक्यं प्रदृश्यते । गुरुशिष्यस्वरूपेण क्रीडति स्वेच्छयेश्वरः ॥ २६ ॥ टीका—गुरुशिष्य ऐसें ह्मणे । हें तों कौतुकार्थ असे बोलणें । सर्वत्र एक असे देखणें । वस्तुमात्र जाणिजे ॥ १३ ॥ गुरुशिष्यस्वरूपाच्या ठायीं । आत्मा एकचि क्रीड-

तसे पाही । व्यापक असे सर्व देहीं । समत्वें समसमान ॥ १४ ॥ येथूनि गुरुशिष्यप्रश्न । जाहलें असे सर्व कथन । ईश्वर पार्वती संवादन । सविस्तर निवेदिलें ॥ १५ ॥ किंचित राहिलें असे बोलणें । वाद्य वाजूनि जेवीं उरणें । नाद असे सूक्ष्मपणें । तयापरी जाणिजे ॥ १६ ॥ त्रिवार ऐसोंचि जाय बोलिलें । किंचित बोलणें असे उरलें । काय कीजे मन सुखावलें । पुनरपि मागुती उरतचि असे ॥ १७ ॥ जैसा मित्र जातां बोळवीत । पुनःपुन्हां मागुती फिरोनि पाहात । तेथें लागलीसे बहु प्रीत । ह्मणोनियां पहातचि असे ॥ १८ ॥

॥ श्लोक ॥ **तत्वं पार्थस्य कृष्णेन ह्युद्धवस्य हितेन च । ब्रह्मादिसनकादीनां हंसरूपेण बोधितम् ॥ २७ ॥**

टीका—कपिल ह्मणती ऋषिसिद्धासी । तुज सांगितलें तत्त्वविचारासी । जैसें पार्थाप्रती हृषीकेशी । बोधीत असे गीतार्थ ॥ १९ ॥ उद्धवाप्रती भागवतीं । हित सांगितलें बहुतां रीतीं । ब्रह्मादिसनकादिकां हंसगतीं । बोध हंसरूप धरोनियां ॥ २० ॥

श्लोक॥ **दत्तात्रेयादिसिद्धानां नवनाथैस्तथैवच । शंकरो गुरुरूपेण ब्रह्माभिज्ञेन बोधितः ॥ २८ ॥**

टीका—दत्तात्रेयादि समर्थ । सिद्ध नवनाथ जाण प्रसिद्ध । शंकर आदिगुरु करीत बोध । आत्मतत्त्व निश्चय ॥ २१ ॥

श्लोक ॥ **सीतावियोगकाले तु रामस्योक्तं शिवेन वै । परशु-**

रामस्य तत्तत्त्वं दत्तात्रेयेण बोधितम् ॥ २९ ॥ टीका–सीतावियोगकाळीं । श्रीरामाप्रती सांगे चंद्रमौळी । अनेक ऋषिगणमेळीं । उपदेशिजेला बोध जो ॥ २२ ॥ परशुरामासी श्रीदत्तात्रय । पूर्व यथाक्रम संप्रदाय । उपदेश केला निजतत्त्व सोय । दावूनियां तद्रूपीं ॥ २३ ॥ श्लोक ॥ अन्ये च बहवो भक्ता मुक्ता गुरुकृपावशात् । तथा न ते भेदयुक्ता मूर्खा देहाभिमानिनः ॥ ३० ॥ टीका–अनेक भक्त म्हणविती । आत्मकळा जरी नेणती । तरी न चुके पुनरावृत्ती । गुरुकृपा नाहीं तया ॥ २४ ॥ व्यवहारीं सर्वदा कष्टती । भेदबुद्धि कल्पिती । मूढ मूर्खत्वें न जाणती । हृदयस्थ आत्मा ॥ २५ ॥ कोशकीटक जाणा । तें कोंडून घे आपणा । तैसा धरोनि अहंपणा । देहबुद्धि कोंडितां ॥ २६ ॥ जैसें स्वातीचें जळ । शुक्तिका घेतां होय मुक्ताफळ । तोंचि सेविती व्याळ । विष होय मारक ॥ २७ ॥ तैसे अहंबुद्धि जे धरिती । तयांसि कैसी होय आत्मप्राप्ती । उपदेश केलिया न धरी चित्तीं । खडकीं वृष्टि जयापरी ॥ २८ ॥ आत्मा एक सर्वत्र असत । परी गुणपरत्वें क्रिया निपजत । व्यापूनि होय अलिप्त । आकाश जैसें सर्वांसी ॥ २९ ॥ आकाशासी काळें लावूं जातां । तोचि माखे तत्त्वतां । तैसा आत्मा कोणाही पदार्था । लिप्त नसे तयापरी

॥ ३० ॥ श्लोक ॥ देहस्यान्तर्गतो ह्यात्मा देहमध्ये प्रदर्शितः । तस्माद्देहात्मको नाम प्रख्यातः सर्वलौकिकैः ॥ ३१ ॥ टीका—देहांतरीं आत्मा नांदत । अंतर्बाह्य व्यापूनि असत । नामरूप देहासी होत । नामरूपातीत जो ॥ ३१ ॥ प्रख्यात जाण सर्वलोकीं । सत्ताधारक तोचि तो कीं । चंद्र जैसा उदकीं । बिंबोनि होय निराळा ॥ ३२ ॥ श्लोक ॥ आत्मेति चाक्षरो नाम क्षररूपं शरीरकम् । ॐमित्येकाक्षरं ब्रह्म कथं तद्देहधर्मभाक् ॥ ३२ ॥ टीका—आत्मेति अक्षरो नाम । शरीर क्षररूप निकाम । तें कैसें होय उत्तम । अशौच अमंगळ जें ॥ ३३ ॥ हा अस्थि मांस शोणित । आंत नरक मूत्र सांठवत । तें कैसें होय शुचिष्मत । दुर्गंध सुटे पाहतां ॥ ३४ ॥ ॐमित्येकाक्षरं ब्रह्म परम । आत्मा होय स्वयंप्रकाश उत्तम । तयासी नाहीं देहसंबंधधर्म । लावितो जाण मूर्ख ते ॥ ३५ ॥ श्लोक ॥ ॐकारसदृशं रूपं देहात्मेति प्रगीयते । पंचभूतात्मको देहो भूतात्मा नाम कथ्यते ॥ ३३ ॥ टीका—ॐकार नाम सदृश रूप । जो रूपातीत होय अरूप । पंचभूतीं व्यापक स्वरूप । भूतात्मा म्हणती तया ॥ ३६ ॥ श्लोक ॥ तारकं देहरूपाख्यं प्रत्यक्षं वर्णितं मया । नवप्रणवसंयुक्तं नवरूपं तु तारकं ॥ ३४ ॥ टीका—तारक देहरूप प्रख्यात । प्रत्यक्ष दाविलें तुज निश्चित ।

नवप्रणवसंयुक्त । तारकरूपें सर्व हीं ॥३७॥ श्लोक॥ काशीपुरीनिवासी स विश्वनाथो जगद्गुरुः।
देहान्ते चोपदिशते दक्षिणे कर्णसंपुटे ॥ ३५ ॥ टीका–काशीपुरीवासी ईश्वरु । जो विश्व-
नाथ जगद्गुरु । देहांतीं करूनि प्राणियां उपकारू । दक्षिणकर्णीं उपदेशी ॥ ३८ ॥ श्लोक ॥
केनापि न कृतः प्रश्न ईदृशो भुवनत्रये। तत्र सर्वं मयाऽऽख्यातं गुह्याद्गुह्यतरं महत्॥ ३६॥
टीका–कपिल ह्मणती ऋषिसिद्धासी । तुवां थोर उपकार केला जनांसी । भुवनत्रयीं या
प्रश्नासी । केला नसे जाणपां ॥ ३९ ॥ जो आत्मानुभव निर्मळ । शुद्ध प्रकाश सोज्वळ ।
तुज सांगितला प्रांजळ । सविस्तारें करूनियां ॥ ४० ॥ आपलें मुख पहावया उपाय। दुसरा
न चले तेथें काय । एक दर्पणचि जरी होय । तरीच पाहिजे स्वमुख ॥ ४१ ॥ तैसें आत्मरूप
पहावया । आरसाचि जाणिजे रूप पहावया । भाव धरितां निजात्मठाया । पाविजे जाण
तात्काळ ॥ ४२ ॥ हें आत्मज्ञानाचें भांडार फोडिलें । जें आत्मभाविक तयांसचि होय लाधलें।
येरां अभाविकां न जाय साधिलें । अनधिकारी म्हणोनि ॥ ४३ ॥ हें वाढविलें परमामृताचें
ताट । येथें रस सेविती जे आत्मनिष्ठ । राजयोगी सर्व वरिष्ठ । तेचि जाण अधिकारी
॥ ४४ ॥ जें अंतरींचें गुह्य परम । तें म्यां तुज सांगितलें वर्म । जें आत्मतत्त्व सुगम । उघड

तुज दाविलें ॥ ४५ ॥ मुनिराज ऐसें बोलतां । परम आल्हाद जाहला चित्ता । आनंदाची लोटे सरिता । विरोनी जात तद्रूपीं ॥ ॥४६॥ श्लोक ॥ सू० उ० ॥ **ऋषिसिद्धगणाः सर्वे साष्टांगं च ववंदिरे । वयं कृतार्था इत्युक्त्वा अहंभावविवर्जिताः ॥३७॥** टीका—ऋषिसिद्धगण आदिकरूनि । साष्टांगीं प्राणिपात नमुनी । कृतकृत्यार्थ ह्मणोनि । विनविती मधुर वचनोक्तीं ॥ ४७ ॥ अहंभावविवर्जित । होऊनि परम विरक्त । निजात्मसुखीं विरोनि जात । द्वैतभाव उरेना ॥ ४८ ॥ कर जोडूनि विनविती । जय जयाजी कृपामूर्ती । मोक्षलक्ष्मी संपत्ती । वोपिली आम्हां ॥ ४९ ॥ केली आनंदघनाची वृष्टी । पावन केली सकल सृष्टी । प्रत्यक्षाकार दाऊनि दृष्टी । निवाविलें त्वां परमसुखीं ॥ ५० ॥ ॥ श्लोक ॥ **त्वत्प्रसादेन संप्राप्तं साक्षाद्दर्शनमात्मनः । दर्शितं तव नेत्रेण अनिर्वाच्यो भवाम्यहम् ॥ ३८ ॥** टीका—स्वामी तुझिये कृपें करून । प्राप्त जाहलें निजात्मधन । आत्मसाक्षात्कारीं दर्शन । केलें स्वामी कृपादृष्टीं ॥ ५१ ॥ अंजन घालोनिया डोळां । भोगविला निजात्मसोहळा । अद्भुत प्रकाशाची कळा । दाविली त्वां निजनयनीं ॥ ५२ ॥ अनिर्वाच्य जें बोलतां । बोलेंचि दाविलें तया पदार्था । काय सांगावी तेथील

वार्ता । अनुभवेंचि जाणावी ॥ ५३ ॥ श्लोक ॥ मुहुर्मुहुश्च यः स्तौति सहर्षं गद्गदस्वरः । स मुक्तः सर्वलोकेषु ब्रह्मसायुज्यमाप्नुयात् ॥ ३९ ॥ टीका–पुनःपुन्हां बोले वचन । हर्षें सद्गदित होऊन । अहो अष्टभावादि उत्पन्न । अष्ट देहभाव दिसती ॥ ५४ ॥ तोचि मुक्त सर्व लोकीं । ब्रह्मसायुज्यता पावोनि सुखी । आपीं आपणा अवलोकी । गुरुखुणा जाणोनियां ॥ ५५ ॥ श्लोक ॥ राजराजेश्वरो योगः शेषमार्गः प्रशस्यते । यः पठेत्सततं भक्त्या स मुक्तो नात्र संशयः ॥ ४० ॥ टीका–राजराजेश्वर योग । जो करी आत्मत्वीं भोग । जाणिजे जो शेषमार्ग । साधून कीजे सद्भक्ति ॥ ५६ ॥ भक्ति करोनी पठन करितां । तयासि पावे निजात्मता । मुक्ति पावोनि सायोज्यता । निजात्मपद पावती ॥ ५७ ॥ येथोनि कपिलगीतेची टीका ॥ समाप्त जाहली असे देखा । संतचरणीं निवेदिलें कौतुका । आवडी करोनि आपुले ॥ ५८ ॥ समुद्राचें जळ घेऊन । त्यासीच कीजे अर्घ्यदान । तैसेंचि तुमचें तुह्मासि केलें निवेदन । आत्मारामसमर्थीं ॥ ५९ ॥ मी तों केवळ अज्ञान । तुमचे कृपेस्तव बोलिलों ज्ञान। न कळे श्लोकींचें पदव्याख्यान । आज्ञा बोलवी तुमची ॥ ६० ॥ वेदशास्त्र पाहूं जातां । आयुष्य थोडें जीविता । तत्प्रियभाव जाणोनि चित्ता । सारासार जाणिजे ॥ ६१ ॥ अज्ञान

बाळकाचे बोल । माता ह्मणे परम अमोल । ऐसेंचि होय कृपेचें नवल । सद्गुरु माय संतोषे ॥ ६२ ॥ गुरुमाता कृपाळू देख । तयेचेचि कृपेचें तें कौतुक । करूनियां अलोलिक । आत्मत्व चोजवी ॥ ६३ ॥ वदवितां तूं श्रीगुरु । मी वृथाफुंद कां धरूं । बाहुली नाचवी सूत्रधारू । तैशीच नाचती तदिच्छा ॥ ६४ ॥ हृदयस्थ जो आत्माराम । तोचि वाचेशीं बोले नाम । तेथें मीपणाचें काय काम । किमर्थ ह्मणणें वाचेशीं ॥ ६५ ॥ बालकौतुक माता करी । तीच भोगी प्रेमलहरी । अद्भुत तियेचे कृपेची थोरी । बोलतां वाचे न वर्णवे ॥ ६६ ॥ वाचा तेचि बोलवी । क्रिया चालवी आघवी । जीवदशा दवडूनि शिवीं । मेळवीतसे कृपाळू ॥६७॥ मातेची उपमा श्रीगुरूसी देणें । हें तों तेथें दिसतसे उणें । तिचें देहसंबंधीं करणें । कळवळा मात्र जाणिजे ॥ ६८ ॥ तैशी नव्हे गुरुमाय । जे चुकवी जन्ममरणघाय । दाउनी निजात्म सोय । सोहळे करी आत्मत्वीं ॥ ६९ ॥ निरालंबीं पाळणा । लांबवूनि चिद्गगना । सत्रावियेचा पान्हा । पाजीत असे जी ॥ ७० ॥ अनुहाताच्या लहरें । गाणें गात मंजुळ स्वरें । थापटूनि निजात्मबोधसारें । समाधि शेजे निजवी ॥ ७१ ॥ परम निजेचें सुख कौतुक । जेथें निद्रा ना जागर देख । ऐसें जें कां परमसुख । भोगवी आपुले स्वलीळें ॥ ७२ ॥ तियेचें

उतराई काय होईजे । पदार्थ पाहतां सर्व अशाश्वत जे । म्हणोनि मौनेंचि जाणोनि नमिजे । अंतरध्यानीं आपुले ॥ ७३ ॥ ऐसा हा गुरुशिष्य सोहळा । सद्गुरुचि जाणे येथींचा जिव्हाळा । तोचि बोलवी अज्ञानबाळा । सामर्थ्य होय तयाचें ॥ ७४ ॥ बहु रसाळ हें बोलणें । जें सुखास होय पारणें । गुरु लेववी आत्मलेणें । शिष्यबाळकालागूनी ॥ ७५ ॥ मज नाहीं घडली गुरुसेवा । परम अपराधी असें देवा । परी न कळे जन्मांतर ठेवा । कृपा केली कैशापरी ॥ ७६ ॥ गुरुसेवेचा महिमा । जो पावो मोक्षधामा । ग्रंथीं वर्णिलासे प्रेमा । ज्ञानेश्वर-एकनाथीं ॥ ७७ ॥ भागवत श्रीज्ञानेश्वरी । ग्रंथ समर्थ महीवरी । नावा असती भवसागरीं । तारावया श्रेष्ठ ज्या ॥ ७८ ॥ आणिकही ग्रंथ बहुत । विवेकसिंधुआदि करूनि होत । तेही तरणोपाय निमित्त । केले असती समर्थीं ॥ ७९ ॥ गुरु कृपाळू सर्वसाक्षी । दीन जनासी न उपेक्षी । प्रपंच परमार्थ दोहीं पक्षीं । समर्थभावें वर्तत असे ॥ ८० ॥ अनाम अरूप अचळ । जेथें मन बुद्धि विरे सकळ । तेथें वाचेचा काय कीजे गोंधळ । अनिर्वाच्य स्वरूप जें ॥ ८१ ॥ शब्द तोचि बोलविता । तेथें कृपा केली ऐसें म्हणतां । व्यर्थचि अंगाशीं अहंता । कां आणावी ॥ ८२ ॥ म्हणोनि मौनेंचि तया नमन । न राहे जेथें नामि-

तां मन । हेंचि नमनाचें लक्षण । अनुभवासिद्ध जाणिजे ॥ ८३ ॥ तूं अचळ अढळ निर्मळ । परम पवित्र सोज्वळ । नाहीं तुझ्या ठायीं मळ । प्रकाशघन बोधभानु ॥ ८४ ॥ तुज होतां उत्तीर्ण । पदार्थ पाहतां न दिसे कवण । शरीरादि सर्व नाशवंत जाण । येथें काय अर्पावें ॥ ८५ ॥ मन तुज अर्पावें । तरी चित्तचतुष्टयें विरे आघवें । म्हणोनि मौनें तुज जाणावें । जाणतेपण टाकूनी ॥ ८६ ॥ पुनःपुन्हां वाचा बोलत । गुरुनमनीं फार हेत । बोलणेंचि अबोलणा गीत । ऐसें असे करणें तुझें ॥ ८७ ॥ श्रीकपिलगीतेचा महिमा । न कळे स्वरूपाची जिचे सीमा । नाहीं द्यावया उपमा । दुसरी नसे योजितां ॥ ८८ ॥ हे प्रत्यक्ष ज्ञानवल्ली । स्वयंप्रकाशें फुलें फुलली । मोक्षफळें फळा आलीं । आत्मानुभवियांलागोनी ॥ ८९ ॥ हे जाण पंच अध्यायी । जे निजात्मसुखाची सोई । पावावी निजपदाच्या ठायीं । भाव जाणतां अंतरींचा ॥ ९० ॥ पंचतत्त्व निर्मळ । तोचि होय पंच अध्याय केवळ । व्यापक होऊनि सकळ । जनालागीं विस्तारली ॥ ९१ ॥ त्यांत पांचवा अध्याय अलौकिक । शरीरीं जेवीं श्रेष्ठ मस्तक । शिवालयीं कळस जैसा सम्यक । तैसा जाण पंचम ॥ ९२ ॥ कपिलगीतासागर । चिद्रत्नाचा असे थोर । मुक्त मुक्ताफळें सुंदर । असती आंत अमोलिक ॥ ९३ ॥ त्यांत गुरु-

वचनें बुडी दिधली । मतीस आलीं ते घेतलीं । वरकड पदपदांतरें असती राहिलीं । अनाठव अपार ह्मणोनियां ॥ ९४ ॥ पदपदांतरीं असे ज्ञान । न कळे गुरुकृपा महिमान । अंतरंग जाणतां खूण । बाहिर्मुख निरर्थक ॥ ९५ ॥ येथें जाणीव नेणीव सकळ । बोल बोलतां होय पांगुळ । तेथें अहंपणाचा विटाळ । लागों न शके ॥९६॥ ऐकिजे गुरुसंप्रदायक्रम । सद्गुरु श्रीहरी पूर्णाश्रम । महावाक्यादि उपदेश परम । बीज हृदयीं पेरिलें जें ॥ ९७ ॥ तेंचि पुढें विस्तारिलें । आत्मारामीं फळ प्राप्त झालें । बाळामुखीं घातलें परमामृत जीवन ॥९८॥ मनासी प्रचीति जे जाहली । ते आपआपणासीच जाणवली । ते न ये बोलतां बोली । शब्दसिंधु आटलिया ॥ ९९ ॥ मुख्य सांप्रदायलक्षण । श्रीआदिनाथ दत्तात्रेयापासून । विस्तार जाहला असे जाण । दशनामादि करूनियां ॥ ९०० ॥ श्रीआदिगुरु दत्तात्रेय । तेथूनि उपदेश क्रम होय । पूर्णानंदीं सामाये । ब्रह्मतेज स्वरूप जो ॥ १ ॥ तेथूनि कृपाघन मेघ । नारायणस्वरूपीं सामावे वोघ । योगानंदस्वरूपीं सैंध । वृष्टि करी स्वानंदें ॥२॥ तेथूनि आत्मारामीं जीवन । पावोनि कैवल्यप्राप्ती जाण । परमामृतरस सेवून । तृप्ति होय आत्मत्वीं ॥ ३ ॥ तयाचें कृपाउच्छिष्ट शेष सेवून । बाळकासी होय परम समाधान । तें वाचें बो-

लतां पडे मौन । त्रिपुटी हारपे जेथें ॥ ४ ॥ आदि कृपा ये मायेची । तेचि दुर्गा कुळस्वामिणी आमुची । राशीनपुर मूळपीठींची ।अर्धमात्रा ह्मणती जे ॥ ५ ॥ ग्रंथ जाहला तये स्थळीं । प्रमोदाब्धी वर्षाकाळीं । आषाढ शुक्ल द्वादशी गुरु समेळीं । टीका समाप्त कपिलोक्ती ॥ ६ ॥ शके सोळाशें बहात्तर । शालिवाहन शककर्तार । कपिलगीता टीकासार । होय सामर्थ्यें सद्गुरूचिया ॥७॥ वृत्ति भूमिका ग्राम अचरें । वसतसे प्रेमसिंधूचिया तीरें । तेंचि मिराशी अधिष्ठान अचरें । जाणिजे आपुलें संतहो ॥ ८ ॥ तेथें बिंदू सदाशिव । नांदत असे स्वयमेव । रामेश्वर सद्गुरुराव । समर्थ थोर त्रिभुवनीं ॥ ९ ॥ श्लोक ॥ ऋषिसिद्धकपिलयोर्वाक्यममृतबिंदुवत् । मुक्तिकामः पिबेद्यो वै स मुक्तो नात्र संशयः

इतिश्रीपद्मपुराणे सिद्धांतसारे कपिलऋषिसंवादे राजराजेश्वरयोगकथनं नाम पंचमोऽध्यायः ।

ॐतत्तत्त्वं सोहं रामः सोहं तत्त्वम् ॥ ॐतत्त्वमसि रामायनमः ॥ ॐ तत्त्वं रामोसि ॥ शरीरं च भवेदात्मा अंतरात्मा भवेन्मनः ॥ परमात्मा भवेच्छून्यं मनो यत्र विलीयते ॥ ॐतत्सत्ब्रह्मार्पणमस्तु ॥ ७ ॥ समाप्तेयं कपिलगीता ॥ शं भूयात् ॥ टीका—श्रीकपिलगीता महिमान । समाप्त जाहलें असे आख्यान । तें ऐकोन संत सज्जन । सुखी होती अनु-

भवीं ॥ १० ॥ जे भाव धरूनि ऐकती । जे वाचिती ध्याती अर्थ जाणती । तयांसी होय मोक्षप्राप्ती । संशय चित्तीं न धरिजे ॥ ११ ॥ इतिश्रीपद्मपुराणे सिद्धांतसारे कपिलमुनिऋषि-सिद्धसंवादे हरिदासआचरेकरोपनामभक्तविरचितकपिलगीताटीकायां पंचमोऽध्यायः संपूर्णः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

हा ग्रंथ पुणें पेठ शनवार मेहुणपुरा येथें जगद्धितेच्छु छापखान्यांत छापिला. तारीख ३१ मार्च सन १९१० शके १८३१ (आवृत्ति ३ री)

समाप्त.

श्री पांडुरंग समर्थ.

श्री तुकाराम महाराजांच्या अभंगाची

सार्थ गाथा.

लेखकः—हरिभक्तिपरायण विष्णुबोवा जोग.

भाविक जनांस श्री तुकाराम महाराजांच्या अभंगाचें यथार्थ ज्ञान व्हावें ह्मणून मराठी सोप्या भाषेंत अभंगाचा अर्थ लिहिला आहे. आजपर्यंत अर्थासह अभंगांची गाथा छापून प्रसिद्ध झालेली नाहीं. ह. भ. प. विष्णुबोवा जोग हे सांप्रदायीक वारकरी पंथाचे असल्यामुळें श्रीतुकाराम महाराजांच्या अभंगाचें भाषांतर कसें झालें असेल याची कल्पना प्रत्येक भाविक वारकऱ्यास होईल सबब त्याचें वर्णन करण्याची अवश्यकता नाहीं. या गाथ्याचे २ भाग केले आहेत. पहिल्या भागांत २०९१ व दुसऱ्या भागांत २०६० अभंग अर्थासह व ४०७ क्षेपक अभंग अर्थाशिवाय छापले आहेत आरंभीं श्री तुकाराम महाराजांचें अल्प चरित्र जोडलें आहे. छपाई सुवाच्य, कागद टिकाऊ आणि बाइंडिंग कापडी पुट्ठ्याचें मजबूत केलें आहे. पहिल्या भागाची पृष्टसंख्या ६९८ व दुसऱ्या भागाची ८५६ एकूण १५५४ पृष्ठें झालीं आहेत. पुस्तकाच्या मोठेपणाच्या मानानें

स्वस्तपणाची कमाल केली आहे.

दोन्ही भाग मिळून किंमत रुपये सव्वादोन.

टपाल व व्ही. पी. खर्च मिळून ८ शिवाय पडतील.

मिळण्याचीं ठिकाणें:—रावजी श्रीधर गोंधळेकर जगद्धितेच्छु छापखाना पुणें सिटी.

म्यानेजर हिंद—एजन्सी माधवबाग मुंबई.

हा ग्रंथ
केशव रावजी गोंधळेकर यांनीं पुणें येथें
आपल्या जगद्धितेच्छु छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केला.
ता. ३१ मार्च सन १९१० शके १८३१
आवृत्ति ३ री.

॥ इति कपिलगीता समाप्तः ॥

V 891.461 E 50471
Ach/kap
AUTHOR Acharekar, Haridas
TITLE Kapilgita.

Date Due

V 891.461
Ach/kap
50471

